ई/३५९

# इस्लामी संस्कृतीचें

# क्रांतिकार्य

लेखक

**मानवेंद्रनाथ रॉय**

अनुवादक

**श्रीनिवास व्यंकटेश नवाते**

बी.ए., एल्‌एल्‌.बी.

प्रकाशमंडळ

ई/३५७

# इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य

(Historical Role of Islam चा अनुवाद)

लेखक
**मानवेंद्रनाथ रॉय**

अनुवादक
**श्री. त्र्यं. नखाते,**
बी. ए., एल्‌एल्. बी.

जुलै १९३८ ] [ किं. १२ आणे

प्रकाशक
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर,
५२९ सदाशिव पेठ, पुणें २

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते,
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें २

# अनुवादकाचे चार शब्द

भाई मानवेंद्रनाथ रॉय ह्यांच्या Historical Role of Islam या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद वाचकांस सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचें यंत्र स्वतः कुशलतेनें चालविणाऱ्या हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांपैकीं रॉय हे एकटेच होत. या दृष्टीनें रॉय यांची योग्यता हिंदी राजकारणांत अद्वितीय आहे. या त्यांच्या व्यापक कार्यापेक्षांही त्यांनीं हिंदी तत्त्वज्ञानांत सुसंगति लावून दाखवून जें कार्य केलें आहे तें अधिक चिरस्थायी आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राजकारणांत आवश्यक अशी विचारक्रांति घडविण्याचें कार्य त्यांनीं जें केलें तेंही महत्त्वाचें आहे. सध्यां 'इंडिपेंडंट इंडिया' हें साप्ताहिक व त्यांचीं इतर पुस्तकें यांच्या द्वारां ते आपलें तत्त्वज्ञान प्रकट करीत आहेत. त्यांत त्यांची गाढ विद्वत्ता, शास्त्रांचा खोल अभ्यास व बुद्धिवादाची परिसीमा दिसून येते.

त्यांचे सर्व राजकीय विचार सर्वांना मान्य होण्यासारखे आहेत असें नाहीं. किंबहुना सध्यां तर त्या बाबतींत पुष्कळच मतभेद होण्यासारखा आहे. परंतु त्यांचे विचार त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनाही विचारणीय वाटावेत असेच आहेत. विशेषतः तत्त्वबोधात्मक असे त्यांचे प्रबंध अत्यंत मननीय असे आहेत. अशा विचारप्रवाहांचें वारें महाराष्ट्र वाङमयाच्या वाटिकेंत वाहूं लागलें तर तेथील लतावृक्षादिकांना अभिनव चैतन्य प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि सध्यां तर अशा नवजीवनाची आवश्यकता अधिकच आहे.

विशेषतः Historical Role of Islam या पुस्तकांत इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य अत्यंत तर्कशुद्ध रीतीनें मांडलें असल्यामुळें या

विषयाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टीच आपणांस मिळाली असें मला वाटलें; व सध्यांच्या हिंदुमुसलमानांच्या तेढीच्या वेळीं सुशिक्षित जनतेला या दृष्टीचा लाभ होईल तर फार बरें असें वाटलें; म्हणून हौसेनेंच अनुवाद करावयाचा ठरविलें. अनुवाद झाला; पण त्याच्या प्रकाशनाची सोय? "प्रकाश मंडळा" चे चालक माझे स्नेही रा. दयार्णव कोपर्डेकर यांनीं तो अनुवाद प्रकाशांत आणावयाचें ठरविलें व त्यांच्याच चिकाटीमुळें तो प्रकाशित होऊं शकला. या पुस्तकाचें हस्तलिखित लिहिण्याचें काम माझे स्नेही रा. ए. व्ही. जोशी यांनीं करून दिलें, त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

हें पुस्तक प्रकाशित करण्यास ती. पां. के. शिराळकर, एम्. एल्. ए. यांनीं उत्तेजन व साहाय्य दिलें ह्याबद्दल त्यांचेही मी मनापासून आभार मानतों.

त्याचप्रमाणें तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दलही त्यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतों.

मुद्रणाच्या बाबतींत रा. दाते यांनीं जी कुशल तत्परता दाखविली तीबद्दल तर मला सानंद अचंबा वाटत आहे.

१९६।७४ सदाशिव पेठ,<br>पुणें, ता. १५-७-३८

श्रीनिवास व्यं. नखाते

( १ )

ग्रीस, रोम, इराण व चीन यांचीच नव्हे तर हिंदुस्थानची पुरातन संस्कृतिही अधोगतीच्या मार्गाला लागली होती. त्यामुळें सर्व बहुजन समाज अगतिक व अवश झाला होता. त्या स्थितींतून त्याला वर काढण्यासाठीं क्रांति घडवून आणण्याचें यशस्वी कार्य इस्लामी धर्मानें केलें आहे; आणि त्यामुळेंच इस्लामी धर्माचा प्रभाव व यश आश्चर्यावह ठरलें आहे.

(२)

देव-धर्म रक्षणासाठीं परजलेली महंमदी तरवार निव्वळ देव-धर्म रक्षण करूनच थांबली नाहीं. तिनें नव्या समाजशक्तीला विजयश्री मिळवून दिली. या विजयानें बौद्धिक नवचैतन्य निर्माण केलें व त्याच चैतन्यांत सर्व धर्मश्रद्धेयांचें निर्मूलन झालें.

(३)

महंमदानें इस्लामचें तत्त्व शोधून काढलें नाहीं किंवा त्याचा त्याला साक्षात्कारही झाला नाहीं. अरबी राष्ट्राला मिळालेला तो इतिहासाचा वारसा होता. मात्र त्या संपत्तीचें मोल ओळखून तिचें दान देशबांधवाना करणें, यांतच महंमदाचें माहात्म्य आहे.

—एम. एन. रॉय

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अनुवादकाचे चार शब्द ... ... ... | १ |
| प्रस्तावना ... ... ... ... | ७ |
| मानवेंद्रनाथ रॉय यांचें संक्षिप्त चरित्र ... ... | २३ |
| प्रकरण १ लें उपोद्घात ... ... ... | ३३ |
| प्रकरण २ रें इस्लामचें कार्य ... ... ... | ३९ |
| प्रकरण ३ रें इस्लामी धर्माची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वशक्ति ... ... ... | ५१ |
| प्रकरण ४ थें विजयाची कारणपरंपरा ... ... | ६१ |
| प्रकरण ५ वें महंमद व त्याचें तत्त्वज्ञान ... ... | ७१ |
| प्रकरण ६ वें इस्लामी तत्त्वज्ञान ... ... | ८१ |
| प्रकरण ७ वें इस्लाम व हिंदुस्थान ... ... | ९९ |

# प्रस्तावना

अरबस्थानच्या उजाड, रखरखीत वाळवंटांत जगांतील फार मोठ्या मानव समाजास शांतीचा शीतल संदेश देणारा धर्मसंप्रदाय उदयास आला, ही या विश्वांतील विस्मयजनक घटना होय. दया, उदारता आणि बंधुता हे थोर गुण सामाजिक जीवनांत ओतप्रोत भरून टाकण्याचें कार्य या धर्मसंप्रदायानें केलें. अगदीं सामान्य मानवांना सहज आकलन करतां येईल, इतका सोपा मुसलमान धर्म आहे. खलीफा व श्रद्धावान निग्रो यांच्यांत या धर्माच्या छत्राखालीं सारखेपणाची भावना निर्माण झाली. उपनिषदांतील गंभीर तत्त्वचर्चा, गौतम बुद्धाची बौद्धिक श्रेष्ठता, व्यासाच्या भारतांतील वैविध्यपूर्ण–वैचित्र्ययुक्त–विश्वाचें व मानवी आयुष्याचें प्रगल्भ विवेचन, बायबलमधील उदात्त नैतिक उपदेश व चिनी तत्त्ववेत्त्यांचें सामाजिक व्यवहाराचें निरीक्षण कुराणांत सांपडत नाहीं, हें खरें; पण या धर्मानें जगाला सरळपणाचा व्यवहार शिकविला. कुराणाचे संदेश म्हणजे ईश्वराचे औदार्यपूर्ण निश्वास आहेत. त्यांत दिव्यत्वाऐवजीं मानव्य आहे. त्यांत गहनता नाहीं, सुगमता आहे. इस्लामच्या उदयापूर्वीचे समाज व इस्लामच्या प्रभावानें निर्माण झालेला उत्तरकालीन समाज यांची तुलना केल्यास इस्लामनें क्रौर्य व जुलूम यांतून मुक्त असा समाज निर्माण केला. यहुदी धर्म, ख्रिश्चन धर्म व झरतुष्टाचा धर्म हे जगांतील प्रसिद्ध धर्म इस्लामचे अगदीं निकटचे शेजारी होते. किंबहुना इस्लामच्या उदयापूर्वीं कित्येक शतकें अरबांच्या कानाशीं या धर्मांचे उपदेश हितगुज करूं लागले होते. पण यहुद्यांच्या धर्मांत एक विशिष्ट ज्यू मानव वंशच देवाचा लाडका झाला. सगळ्या मानवांना सारखी जागा त्यांत नव्हती. पारशांच्या धर्मांत मानवाच्या आपसांतील

वैषम्यास प्रामुख्य दिलें होतें. ख्रिस्ताचा धर्म मात्र या दोषांपासून अलिप्त होता. परंतु त्यांतील धर्मतत्त्वांचा सूक्ष्म शास्त्रार्थ त्रिमूर्तिवादाच्या, व सिद्धांतभेदांच्या घोंटाळ्यांत सांपडला होता. युरोपांतील ख्रिस्तपूर्व समाजांतील अडाणी धर्मकृत्यांचा गळाठा नष्ट न करतां तसाच उरावर घेतल्यामुळें ख्रिश्चन धर्म डबघाईस आला होता. हे तिन्ही धर्म अरबांना व पश्चिम व मध्य आशियांतील मोठ्या मानवसमाजांना वश करूं शकले नाहींत, कारण त्या धर्मांत प्रभातकालांतील उत्साहदायी वातावरण राहिलें नव्हतें. त्यांना संध्याकाळचा थकवा आला होता. अरबांचा पूर्वींचा धर्म मूर्तिपूजेचा होता. त्यांच्यांत तीनशेंपेक्षां अधिक दगडाचे देव होते. इस्लाममध्यें एकांतिक एकेश्वर भक्तीचें तत्त्व आलें. या एकेश्वर भक्तीनें दगडी देवांच्या भारापासून अरबांचें मन मुक्त करून सगळ्या भांडखोर अरबांना एकजीव केलें. संशय, विश्वासघात व असह्य उच्चनीच भेद यांचा बुजबुजाट असलेल्या जगांतून विश्वास, सहकार्य व शौर्य यांच्या नव्या जगांत अरबांनीं व अनेक जुन्या मानवसमाजांनीं इस्लामच्या आश्रयानें प्रवेश केला. इस्लाममधील ऐहिक जीवनाचा आस्वाद कुशलतेनें घेण्यास लावणाऱ्या सकाम कर्मयोगामुळें मुसलमानांनीं नवें साम्राज्य निर्माण केलें. ऐहिक जीवनाबद्दलची विरक्ति व संन्यास यांचा वासही इस्लाममध्यें नाहीं. आधुनिक विज्ञानाच्या जन्माचीं शुभसूचक मंगल लक्षणें अरबांच्या साम्राज्यांत प्रथमतः दिसलीं. या साम्राज्यानें जुन्या रोमन साम्राज्याचा अंत पाहिला व आर्यन इराणी साम्राज्याच्या तडाख्यांतून सेमेटिक राष्ट्रांस मुक्त केलें. अरबांचें साम्राज्य सिंधु नदीपासून तों इंग्लिश खाडीपर्यंत पसरलें. रोमन साम्राज्याचा कायदा व राज्यव्यवस्था, ग्रीकांचें तत्त्वज्ञान, भूमिति, भौतिक विद्या, तर्कशास्त्र व ललितकला, हिंदुस्थानचें वैद्यक, गणित व वाङ्मय आणि चीनच्या औद्योगिक कला अरबांनीं संपादन केल्या. सगळ्या ज्ञात जगाच्या संस्कृतींचें संगमस्थान अरबी साम्राज्य झालें. या

अरबांनीं युरोपच्या दीर्घ अज्ञानतमाचा नाश केला. युरोपला कुंभकर्णी निद्रेंतून जागें केलें. यानंतर युरोपकडे जागतिक संस्कृतीचें पुढारीपण गेलें.

महंमदाचें चरित्र पौर्वात्य व पाश्चात्य विशेषतः सुसंस्कृत हिंदी शिक्षितांस आदर्शभूत वाटणार नाहीं हें खरें आहे. महंमदाचें वैयक्तिक आचरण त्याच्या मागासलेल्या अर्धरानटी समाजस्थितीच्या पार्श्वभूमिकेंत पाहावें; म्हणजे त्याबद्दल अनादर कमी वाटेल. पण त्याची उच्च प्रतिभा, उदार हृदय व कठोर निश्चय हे गुण त्याच्या धर्मांत प्रतिबिंबित झाले आहेत. इस्लामामुळें समुद्रावरील दर्यावर्दीपणांत वाकबगार अशा, उंट व घोडे यांवरून खुष्कीच्या मार्गानें व्यापार करणाऱ्या अरबी समाजांत शूर सेनापती, सम्राट् व धर्माध्यक्ष निर्माण झाले; त्याचा पाया महंमदानेंच घातला.

हिंदुस्थान ज्या मुसलमानांनीं जिंकला ते मुसलमान सुसंस्कृत अरबांपैकीं नव्हते. प्रथमतः मुसलमानी धर्म मुख्यतः दोन मानववंशांत पसरला. एक सेमेटिक मानववंश व दुसरा मंगोलियन मानववंश सेमेटिक लोक उच्च संस्कृतीचे होते तसे मोंगल नव्हते. मोंगल हे मागासलेले, हिरवट व क्रूर होते. परंतु त्यांना देखील हिंदुस्थानांत पुष्कळच मोठ्या गोष्टी करतां आल्या. हिंदुसमाज जीर्ण व दुर्बल अवस्थेस पोंचल्यामुळें मुसलमानांचें येथें फावलें. हिंदुस्थानांत एक पंचमांश मुसलमान धर्मी प्रजा आहे, ती सगळी तरवारीच्या जोरावर वाढली नाहीं. हिंदुसमाजरचनेच्या अंतर्गत दोषामुळेंच हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रभाव पडला. उच्च संस्कृतीपासून दूर राखलेला हीन, पतित व पापी म्हणून गणलेला शूद्रांचा व अतिशूद्रांचा वर्ग हिंदुसमाजांत फार प्राचीन कालापासून होता. त्यांतील सामाजिक दौर्जन्यामुळें तप्त झालेला बहुसंख्य दलित वर्ग हिंदुसमाजांतील असह्य विषमतेच्या तीव्र विषारी धारेमुळें इस्लामचा आश्रय करून शांत झाला. इस्लामची तरवारीची धार ही कांहीं वेळां हिंदुसमाजाच्या

जिव्हारीं बसली. पण मुसलमानी धर्मप्रसाराचें मुख्य कारण तरवार नव्हे. तसें मानलें तर मुसलमानांची राजधानी असलेल्या दिल्लीच्या भोंवतालच्या संयुक्त प्रांतांत मुसलमान अत्यल्प कां आहेत याचा उलगडा होत नाहीं. पंजाब व बंगाल यांतील बहुजन मुसलमान अत्यंत दरिद्री शेतमजूर आहेत. हेच हिंदुसमाजांतील शूद्रातिशूद्र होत. पंजाबांतील व बंगाल्यांतील बहुतेक सुसंस्कृत व सधन वर्ग हिंदूंत मोडतात. बंगाल्यांत शेंकडा सत्तेचाळीस हिंदू आहेत पण चार-पंचमांश धन व भूमि यांचें स्वामित्व हिंदूंकडे आहे. कच्छी, बोहरी वगैरे कांहीं जाती सोडल्यास मुसलमान समाज सगळ्याच बाबतींत मागासलेला आहे. पण इस्लाममुळें तो संघटित व प्रतिकारक्षम आहे.

हिंदुस्थानांतील एका मोठ्या समाजाला अत्यंत वंद्य असलेल्या इस्लामचें हें रॉयलिखित ऐतिहासिक महत्त्व हिंदू सुशिक्षितांनीं समजून घेऊन परस्परांचे दुराग्रह नाहींसे करून घेण्याची ही मोठी संधि आहे. यापुढें ज्या राजकीय व सामाजिक उलाढाली होणार आहेत, त्यांतून हिंदू व मुसलमान यांच्या संगमानें नवीन हिंदी समाज व हिंदी राष्ट्र निर्माण होणार आहे. या भावी समाजक्रांतीचें विचारसूत्र सांगण्याचें कार्य या देशांतील हिंदू व मुसलमान विचार-वंत करीत आहेत. या विचारवंतांत अत्यंत श्रेष्ठ पदवी असलेले श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांनीं मार्क्सवादी दृष्टीनें हें सुंदर पुस्तक इंग्रजींत लिहिलें आहे. या पुस्तकामुळें या दोन्ही समाजांतील अनेक गैरसमजांचें निराकारण होईल. या इंग्रजी पुस्तकाचा मराठींत चांगला अनुवाद इतक्या लवकर होईल, असें मला वाटलें नव्हतें. पण माझे स्नेही श्री. नखाते यांनीं अकल्पित रीतीनें मला एके दिवशीं हा अनुवाद दाखविला. अनुवादकास मूळचा भावार्थ चांगला प्रकट करतां आला आहे. श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांचे लेखनांत अर्थगांभीर्य, तार्किक संगति व शास्त्रीय व्यवस्था या गुणांबरोबर प्रसन्नताही आहे. हे गुण अनुवादकानें कायम राखिले आहेत.

# मानवेंद्रनाथ रॉय यांचें व्यक्तित्व

श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांचें अल्पचरित्रही श्री. नखाते यांनीं या पुस्तकास जोडलें आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संगतीचा मला गेल्या दोन वर्षांत अनेक वेळां लाभ झाला. पण त्यांच्याकडून अनेक वेळां पृच्छा करूनही आत्मचरित्रासंबंधीं विशेष माहिती मिळाली नाहीं. त्यांना आत्मकथनाचा स्वाभाविक वीट आहे असें दिसलें. १९१८ सालीं प्रसिद्ध झालेल्या रौलेट कमिटीच्या राजद्रोह वृत्तांत त्यांचे अल्प वयांतील म्हणजे १८ ते २० वयाच्या सुमारचे अद्‌भुत क्रांतिकारक प्रयत्न 'जर्मन कारस्थान' या प्रकरणांत वाचावयास मिळतात. त्यांचें एक त्रोटक चरित्रही स्वतंत्र रीत्या प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांचें परदेशांतील क्रांतिकारक जीवन व विचार कसे होते हें समजतें. लहानपणापासून घेतलेल्या क्रांतीच्या दीक्षेमुळें पूर्ण अकिंचन स्थितींत ते आयुष्य काढीत आहेत. दारिद्र्य त्यांच्या अगदीं अंगवळणी पडलें आहे. त्यांच्या ग्रंथांवरून विशाल प्रतिभाशाली व व्यासंगी बुद्धिमत्तेचा, प्राच्य व पाश्चात्य विद्यांमधील प्राविण्याचा आणि दीर्घ अनुभवाचा प्रत्यय येतो.

त्यांना श्रीमंत मित्र लाभलेले नाहींत. समाजवादी पुढारी ज्यांत प्रमुख आहेत अशा पक्षावर आक्षेप घेतल्यामुळें ते मध्यमवर्गीय पुढारी रॉय यांचेपासून फार दूर असतात. तृतीय आंतरराष्ट्रीय क्रांति संस्थेच्या ( Third International ) मित्रांचें व त्यांचें अद्याप जमत नाहीं. राष्ट्रीय सभेमधील सुधारणावादी पुढारी त्यांच्या वाऱ्यासही उभे राहात नाहींत. त्यामुळें रॉय यांस सगळेंच नवीन आहे.

राष्ट्रीय सभेंतील अनेक क्रांतिकारक विचारसरणीचे कार्यकर्ते त्यांच्या विचारांचा अंगीकार करीत आहेत. त्यांच्या विचारपद्धतीचा प्रभाव राष्ट्रीय सभेंतील सगळ्या पक्षांवर पडत आहे. उदाहरणार्थ

हिंदी समाजाच्या साम्राज्यविरोधी राजकारणाचें मार्क्सवादी पृथक्करण रॉय यांनीं प्रथमतः इ. स. १९२२ सालीं सुरू केलें. त्याचा प्रभाव इ. स. १९३४ सालापासून येथील राष्ट्रीय सभेंत दिसूं लागला. घटनासमितीच्या राजकारणाचा सिद्धांत रॉय यांनीं हिंदी राजकीय विचारसरणींत प्रथमतः उतरविला. प्रथमतः फार जोराचा प्रतिकार येथील क्रांतिकारकांनीं केला. पण आतां राष्ट्रीय सभेनें या तत्त्वाचा सार्वत्रिक अंगिकार केलेला दिसतो.

श्री. रॉय यांनीं ' India in Transition ' या १९२२ सालीं लिहिलेल्या पुस्तकांत ब्रिटिशांच्या स्थापनेपासून तों महायुद्धोत्तर कालापर्यंतच्या हिंदी सम्राज्याच्या सामाजिक–राजकीय स्थित्यंतरांचा उलगडा मार्क्सवादी शास्त्रीय दृष्टीनें, आधुनिक इतिहासशास्त्राच्या विवेचक पद्धतीचें अवलंबन करून, केला आहे; हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजकीय व सामाजिक चळवळींचें व विचारांचें पृथक्करण करून ब्रिटिश साम्राज्यशाहीची, प्रागतिक सुधारकांची, सनातनी पण जहाल राष्ट्रवाद्यांची, मुसलमानी राजकारणाची आणि गांधीवादाची शास्त्रीय मीमांसा केली आहे, व या सर्वांची हिंदी समाजाच्या प्रगतींत व राजकारणांत स्थानें व मर्यादा सांगितल्या आहेत; ब्रिटिश साम्राज्यास अनुकूल असलेले व प्रतिकूल असलेले व अधांतरीं लोंबकळणारे हिंदीसमाजसंस्थेंतले वर्ग कोणते, हें दाखविलें आहे. ' परकीय साम्राज्याचा नाश व हिंदी राष्ट्रीय क्रांति ' या ध्येयाकडे जाण्यास लागणारी विचारसरणी कशा प्रकारची असावयास पाहिजे याचें सम्यक् विवेचन रॉय यांनीं या पुस्तकांत केलें आहे. या पुस्तकाशिवाय या विषयावर रॉय यांनीं अनेक लेख, प्रबंध व पुस्तकें आतांपर्यंत प्रसिद्ध केलीं आहेत. Future Politics of India, Our Task in India, Maniphesto इत्यादि पुस्तकें त्यांच्या प्रगल्भ राजकीय विचारांची साक्ष देतात. हिंदी राजकीय चळवळीचें मार्क्सवादी विवेचन करतांना त्यांनीं आपले विचार अनेकदां बदलले. ही गोष्ट त्यांच्या

अनुभवशरणतेची सूचक आहे. परिस्थिति बदलली किंवा अनुभव बदलला म्हणजे अगोदर ठरविलेला विचार बदलण्यासही धैर्य लागतें. कारण त्यामुळें चंचलता, संधिसाधुपणा, इत्यादि आरोप सहन करावे लागतात.

रॉय यांनीं हिंदी क्रांतीच्या तत्त्वज्ञानांत दोन मोठ्या गोष्टींची भर घातली. पहिली गोष्ट म्हणजे हिंदी राष्ट्रीय क्रांतीचें तंत्र निश्चित केलें. ज्या हिंदी समाजांत ही क्रांति घडून येणार त्या समाजाचें अर्थशास्त्राच्या व इतिहासशास्त्राच्या आधारें पृथक्करण केलें; क्रांतिकारक वर्ग कोणते व क्रांतिविरोधी वर्ग कोणते याचें विवेचन केलें; राजकीय सत्ता हस्तगत करण्याकरितां साम्राज्यविरोधी युद्ध करणें अपरिहार्य आहे असें ठरविलें; या युद्धाचें साधनभूत असलेल्या क्रांतिकारक लोकपक्षाच्या संघटनेची पद्धति सांगितली; व दुसरी गोष्ट म्हणजे विचारक्रांतीची आवश्यकता आणि तिचें स्वरूप यांचें विवरण केलें. हिंदी समाजांत धार्मिक व आध्यात्मिक विचारसरणी अद्याप अतिशय प्रबळ आहे त्यामुळें हिंदी राष्ट्रीय क्रांतीस विचारक्रांतीची अतिशय आवश्यकता आहे. जुनें तत्त्वज्ञान टाकलें नाहीं तर राष्ट्रीय क्रांति यशस्वी होणेंच असंभवनीय आहे. मार्क्सवाद येण्याच्या अगोदर बुद्धिवाद व विज्ञानदृष्टि आली पाहिजे. श्रद्धेच्या ऐवजीं जिज्ञासेस प्राधान्य आलें पाहिजे. आज्ञाधारकतेच्या ऐवजीं चिकित्सा आली पाहिजे, अध्यात्मवादाचे ऐवजीं भौतिकवाद प्रतिष्ठित व्हावयास पाहिजे. जुन्या इमारतीचे कुजलेले खांब जसे नव्या इमारतीस निरुपयोगी, तितकीच धार्मिक विचारपद्धति कुचकामाची आहे. आजपर्यंत झालेले राष्ट्रीय पुढारी पुराण्या विचारपद्धतीचा अवलंब करून राष्ट्रीय चळवळीची धुरा वाहत आले आहेत. हें हिंदी राष्ट्रीय चळवळींतील मोठें दौर्बल्य आहे. या दौर्बल्याचा नाश झाल्याशिवाय राष्ट्रीय क्रांतीच्या लढ्यास जोर येणार नाहीं. कोणतीही सामाजिक क्रांति विचारक्रांतीशिवाय होत नसते. हिंदी सामाजिक क्रांतीस विचार-

क्रांतीचा पाठिंवा मिळावयास पाहिजे. हिंदुस्थानांत विचारक्रांति घडवून आणण्याकरितां भारतीयांच्या प्राचीन विचारांची मीमांसा करणें अगत्याचें आहे. श्री. रॉय यांनीं भारतीय तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखांचा व भारतीयांच्या अखिल इतिहासाचा दीर्घ व्यासंग केला आहे. या व्यासंगास पाश्चात्यांच्या विज्ञान, तत्त्वज्ञान व इतिहास या विद्यांच्या खोल अभ्यासाची जोड दिली आहे. भारतीयांच्या विचार-संक्रमणाची व सामाजिक संक्रमणाची शास्त्रशुद्ध उपपत्ति रॉय यांनीं लाविली आहे.

हिंदी राष्ट्रीय क्रांतीस आवश्यक असलेलें विचारक्रांतीचें तत्त्वज्ञान रॉय हे आतां क्रमशः मांडीत आहेत. रॉय यांनीं गेल्या सहा वर्षांच्या कारागृहवासाच्या अवधींत विशाल ग्रंथसंपत्ति निर्माण केली आहे. त्याचें पुनःसंकलन व संस्कार करून रॉय हे प्रसिद्ध करूं लागले आहेत. Historical Role of Islam, Facism: Its Philosophy and Practice, Indian Renaissance हीं पुस्तकें नुकतींच प्रसिद्ध झालीं आहेत. हिंदी नवजीवनाच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप रॉय यांच्या ' जेधे मॅन्शन (पुणें) ' मध्यें दिलेल्या व्याख्यानांत तसेंच, ' Searching Analysis of The Ideology of Orthodox Nationalism ', ' Science and Superstition ', ' Religion and Superstition ', ' Philosophical Revolution ', ' The Cult of Asceticism and Renunciation ', ' A Social Disease ', ' Culture and Civilization : ' A Comparison and Contrast ' and ' Spiritualism versus Materialism ' (Madras Youth Conference Address). इत्यादि लेखांत सांपडते.

भाई रॉय यांची तत्त्वनिष्ठा फार उच्च प्रतीची आहे. तत्त्वाकरितां सगळ्या विपत्ति भोगण्यास ते तयार असतात. थर्ड इंटरनॅशनलशीं १९२८ सालीं रॉय यांचा महत्त्वाचा मतभेद झाला. त्या वेळीं त्यांच्या-पाशीं अंगावरच्या कपड्याशिवाय कांहीं नव्हतें. चीनमधील दगदगीमुळें

प्रकृति बिघडली होती. कानाचें दुखणें इतकें वाढलें होतें कीं ऑपरेशनशिवाय गत्यंतर नव्हतें. तिसऱ्या वर्गाचें तिकीट काढून रॉय यांस बर्लिनला रवाना केलें. जवळ पैसा नसल्यामुळें एका मोफत दवाखान्यांत अगदीं सामान्य डॉक्टराकडून कानावर शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. त्यामुळें, दुखणें जिवावर बेतलें. पुन: शस्त्रक्रिया केली व प्रकृति सुधारली. वैचारिक मतभेदामुळें जगांतील एका बलाढ्य राज्याचा म्हणजे रशियन सोव्हिएटचा पाठिंबा कस्पटासमान मानून रॉय यांनीं अत्यंत असहाय व दैन्यपूर्ण जीवन स्वीकारलें. यामध्यें धीरोदात्ततेची परिसीमा दिसून येते. गेल्या दोन वर्षांतील हिंदुस्थानांतील त्यांची कारकीर्द याचीच साक्ष देते. एका दृष्टीनें राजकारणांत ते आज एकटे आहेत. त्यांचे कांहीं मित्र सोडल्यास देशांतील सगळ्या पक्षाच्या पुढाऱ्यांनीं त्यांस बाजूस फेंकण्याचा प्रयत्न चालविला आहे. किंबहुना हा एक प्रकारचा कटच आहे. हिंदुस्थानांत अजून शास्त्रीय दृष्टि व बुद्धिवादी विचारसरणी रूढ व्हावयाची आहे. तोंपर्यंत भाई रॉय यांस असेच दिवस काढावे लागतील. रॉय हे सवंग लोकप्रियतेच्या व मोठेपणाच्या पाठीमागें लागणारे गृहस्थ नाहींत. तशी थोडी जरी वृत्ति त्यांचे ठायीं असती तर कॉंग्रेसमधील सुधारणावादी किंवा भावनाप्रधान जहाल पुढाऱ्यांत मानाचें स्थान त्यांस मिळवितां आलें असतें.

हिंदुस्थानांतील गेल्या दोन पिढ्यांतील टिळक, रानडे, गोखले, गांधी, जवाहरलाल इत्यादि पुढाऱ्यांच्या ठायीं प्रत्येकाचें वैशिष्ट्य म्हणून कांहीं स्वतंत्र गुण दिसतात. टिळक यांचे ठायीं धडाडी, बुद्धिवाद व विद्वत्ता; रानडे यांचे ठायीं दूरदृष्टि व पांडित्य; गोखले यांचे ठिकाणीं वक्तृत्व व सहृदयता; गांधीचें पाशीं महंती, राजकीय चातुर्य व समयज्ञता; जवाहरलाल यांच्या जवळ तडफ, भावनाप्रधान उत्साह व महत्त्वाकांक्षा हे गुण उत्कटतेनें वास करतात. या सर्वांच्यापेक्षां स्वतंत्र असें रॉय यांचें वैशिष्ट्य म्हणजे

जगांतील अनेक राष्ट्रांतील क्रांतीमध्यें प्रत्यक्ष भाग घेतल्यामुळें परिपक्व झालेली बुद्धि हें होय. कलिकालास न डगमगतां स्वदेशास व मानवजातीस स्वतंत्र करण्याचे प्रयत्न लहानपणापासून रॉय यांनीं केले. हिंदुस्थान, चीन, रशिया, जर्मनी, स्पेन व मेक्सिको येथील क्रांतींत सामील होऊन जो अनुभव मिळाला त्यामुळें रॉय यांची प्रज्ञा परिणत झाली आहे. आंतरराष्ट्रीय अनेक क्रांतिकारक घडामोडींत रॉय यांस पहिल्या प्रतीचें स्थान प्राप्त झालें होतें. रौलेट कमिटीच्या १९१८ सालीं प्रसिद्ध झालेल्या राजद्रोह वृत्तांतील 'जर्मन कारस्थान' हें प्रकरण पहा. त्यांत अगदीं लहान वयांत रॉय यांच्यावर मोठ्या जबाबदारीचें कार्य हिंदी क्रांतिकारकांनीं सोंपविलेलें दिसून येतें. विशाल बुद्धीच्या लेनिननें व मुत्सद्दी स्टॅलिननें रॉय यांना पौर्वात्य देशांतील राजकीय क्रांतींत व थर्ड इंटरनॅशनलमध्यें जबाबदारीचें स्थान दिलेलें दिसतें. मतभेद झाल्यावर तें स्थान त्यांना सोडावें लागलें.

ज्या वेळीं चीनच्या फिस्कटलेल्या राजकारणांत जबाबदार कोण यासंबंधीं स्टॅलिन व इतर चार रशियन मुत्सद्यांची बैठक चौकशीकरितां बसली, तेव्हां स्टॅलिननें रॉय यांच्यावरील एकही आरोप खरा मानला नाहीं, उलट चीनमध्यें बोरोडिन व इतर मंडळी रॉय यांचा सल्ला ऐकत नाहींत, ही गोष्ट जेव्हां स्टॅलिन यास कळली तेव्हां स्टॅलिननें 'रॉय यांचे हातीं सर्व सूत्रें सोंपविलीं आहेत' अशी तार केली. परंतु ही तार योग्य वेळीं न मिळाल्यामुळें चीनमधील महत्त्वाचे डाव फसले. रॉय यांचेवर या बैठकींत कोणताही दोषारोप करण्यांत आला नाहीं. परंतु ज्या अनेक रशियन व्यक्तींशीं वांधा उत्पन्न झाला होता त्यांचें रॉयविरोधी कारस्थान फळास आलें व रॉय यांस थर्ड इंटरनॅशनलमधून बाहेर पडणें भाग पडलें. तथापि यांत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं थर्ड इंटरनॅशनलनें रॉय यांस काढून टाकण्याचा प्रत्यक्ष ठराव केव्हांही केला नाहीं. रशियन सोव्हिएट,

थर्ड इंटरनॅशनल व स्टॅलीन या तिघांच्याबद्दल रॉय यांच्या तोंडून केव्हांही तिरस्कारात्मक उद्‌गार ऐकावयास मिळत नाहींत, याचेंही एक कारण हें असणें संभवनीय आहे.

## रॉय जवळून कसे दिसले ?

भाई रॉय यांच्या लिखाणावरून रॉय हे थोर क्रांतिकारक व तत्त्ववेत्ते आहेत अशी माझी खात्री १९३० सालींच झाली होती. १९३१ सालीं भाई रॉय हे डॉ. महमूद या नांवानें वावरत होते. माझ्याबरोबर १९३० सालीं तुरुंगांत असलेल्या माझ्या एका स्नेह्यानें मला असें सांगितलें होतें कीं, ‘ तुम्ही भारतीय तत्त्वज्ञानाचा ऐतिहासिक विकासक्रम लावूं इच्छितां. ह्या कार्यांत मुंबईचे डॉ. महमूद हे अधिक साहाय्य करूं शकतील. ” मी म्हटलें, ‘ कै. लो. टिळक, प्रो. राधाकृष्णन्, प्रो. डायसेन, मॅक्स मुलर, कीथ, दास गुप्त इत्यादि विद्वानांच्या ग्रंथांचें मी वाचन करीत आहें. त्यासंबंधीं वरील विद्वानांच्या पेक्षां हे मुसलमान गृहस्थ अधिक कांहीं सांगूं शकतील असें मला वाटत नाहीं. ’ म्हणून मी १९३१ सालीं रॉय यांना भेटण्याची संधि गमावली. त्यांना भेटण्याचा योग १९३७ सालीं पुणें येथें आला. षड्‌दर्शनांचा व शंकराचार्य वगैरे मध्ययुगीन तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास रॉय यांनीं केला असावा अशी मला अगोदर कल्पना नव्हती. माझी अशी समजूत होती कीं, रॉय यांनीं युरोपियन व हिंदी लेखकांनीं इंग्रजी, जर्मन व फरेंच भाषेंत लिहिलेलीं समालोचनें व सारांश वाचले असतील व त्यावरून मत बनविलें असेल. मी संस्कृत पांडित्याच्या मोठ्या अभिमानानें पहिल्यांदां रॉय यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. उपनिषदें, सांख्य, कणादचार्वाक, बौद्ध व जैन यांच्या विचारांत, कालक्रम व संगति सांगतां येईल काय ? असा प्रश्न मी रॉय यांस टाकला. मला त्यांनीं दहा मिनिटांत या प्रश्नांचा एक प्रकारचा उलगडा करतां येईल, अशी

ऐतिहासिक संगति दाखवून दिली; त्याकरितां बुद्धकालीन सामाजिक स्थित्यंतरांची माहिती सुनावली; व इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांत ब्राह्मणवर्चस्वानें बौद्ध क्रांति विफल कशी केली व त्याचा तत्त्वज्ञानावर काय परिणाम झाला, याचें विवरण केलें. मला वाटलें कीं, यांच्याजवळ प्रो. राधाकृष्णन्‌पेक्षां वरच्या दर्जाची हिंदी तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत भर घालण्यासारखी महत्त्वपूर्ण शास्त्रीय उपपत्ति आहे.

इ. स. १९३७ च्या जुलै महिन्यांत रॉय पुणे येथें महिनाभर राहिले होते. त्या वेळीं त्यांचा भरपूर सहवास घडला. मला त्यांचें खाजगी जीवन युरोपियन मजुरासारखें दिसलें. 'युरोपियन' म्हणण्याचें कारण त्यांच्या आयुष्यांतील मोठा भाग युरोपियन संस्कृतींत गेल्यामुळें राहणींत युरोपियन संस्कार दिसून येतो. 'मजूर' म्हणण्याचें कारण ते अत्यंत अकिंचन आहेत, व ते अविश्रांत श्रम करीत असतात. ते अलीकडे आजारी आहेत, तरीही काम फार करीत असतात. काम करीत असतां एकदां बैठक मारली म्हणजे चार चार तास निघून जातात. सौ. एलन रॉय यांचा टाइपरायटर खंड न पडतां चार चार तास सुरू असतो. मध्यें चहा, जेवण व थोडा वेळ विश्रांति झाल्यावर पुनः तोच कार्यक्रम सुरू. दोघे मिळून स्वयंपाक करतात. रॉय हे मिताहारी आहेत. काय खावें व काय प्यावें याची चर्चा करणें त्यांस आवडत नाहीं. त्या बाबतींत गरीबानें चर्चा करून उपयोग नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. गरिवास मिळेल तेंच खाणें भाग आहे. सकाळीं सातपासून रात्रीं ११ पर्यंत निरनिराळ्या कार्यक्रमांत रॉय गढलेले असतात. रॉय हे १९३७ जुलैमध्यें पुण्यास सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटींत राहिले होते. तेव्हां माझ्या मित्रानें त्यांचा पुणें येथें राहण्याचा खर्च केला. मराठी ब्राह्मणाच्या खाणावळींतून अन्न पोचवीत असतां तिखट मसाल्याची श्री. रॉय व सौ. रॉय या दोघांसही संवय नसल्यामुळें त्यांना तीन चार दिवस जवळ जवळ उपवास पडला. मी व इतर मित्र रोज भेटीस जात होतों. पण या गृहस्थांनीं

आपली अडचण कांहीं सांगितली नाहीं. मी एके दिवशीं जेवणाचे वेळीं हजर होतों तेव्हां प्रत्येकानें कोरड्या पोळ्या खाल्लेल्या पाहिल्या. मी हें पाहून थिजलों. त्याच वेळीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. वझे यांच्या ही गोष्ट लक्षांत आली व त्यांनीं श्री. हृदयनाथ कुंझरू यांचेकरितां शिजत असलेल्या उकडलेल्या भाज्या रोज आणून देण्याचें ठरविलें. तेव्हांपासून आम्ही खानावळ बंद करून डबलरोटी व त्याच्या बरोबर लागणारे पदार्थ इराण्याच्या हॉटेलमधून आणून देत होतों.

मला वाटत होतें कीं, रॉय यांचा स्वभाव मोठा कारस्थानी व संशयी असेल. पण या बाबतींत निराळाच अनुभव आला. कोणत्याही माणसाच्या बाबतींत तो प्रामाणिक आहे, असें ते गृहीत धरून चालतात. त्यांना अनेक बाबतींत विश्वासांतील कांहीं माणसांनीं फसविलें आहे. ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आली असतां त्यांस आश्चर्य व दुःख वाटलें नाहीं. ते एकदां म्हणाले कीं, हातीं आलेल्या व्यक्तींचा जास्तींत जास्त देशकार्यांत उपयोग करून घ्यावा. त्याकरितां लहान मोठ्या कामांची क्रमानें जबाबदारी टाकत जावी. त्यांत विपरीत अनुभव आला तर त्या व्यक्तीस बाजूला टाकावें. याशिवाय दुसरा उपाय नाहीं. कामाची क्रमानें जबाबदारी टाकणें हीच व्यक्तिपरीक्षेची कसोटी आहे. संशयापेक्षां सावधपणाच व्यवहारांत जास्त उपयोगी पडतो.

वादविवादांत महत्त्वाच्या मुद्यांचें थोडक्यांत उत्तर देण्याची रॉय यांची हातोटी पाहून पुष्कळ वेळां म. गांधींची आठवण होते. महात्माजींच्या ठिकाणीं मूळ मुद्याचें अगदीं थोडक्यांत उत्तर देण्याची कुशलता आहे. रॉय हे वादविवादाचे वेळीं शुष्क घासाघिशींत पडत नाहींत. महत्त्वाच्या मुद्यांचा व उपपत्तींचा उल्लेख करतात. एवढ्यानें चर्चा करणाराचें समाधान न झाल्यास किंवा हेकेखोर प्रतिवादी असल्यास वाद संपवितात. रॉय यांचेपासून जिज्ञासू वृत्तीनें चर्चा करणाऱ्यास गहन प्रश्नांची गणिती पद्धतीची सुस्पष्ट उपपत्ति प्राप्त होते.

रॉय यांची विचारपद्धति गणिती व वास्तवानुसारी आहे. राजकारणांत गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न झाले असतां भावनांचा आश्रय ते करीत नाहींत. संशोधनाचाच ते उपयोग करतात. महात्माजींनीं अधिकारस्वीकाराचे वेळीं जो पेंचप्रसंग उत्पन्न केला, तेव्हां लगेच मी रॉय यांची गांठ घेतली. त्यांना मी विचारलें कीं, ब्रिटिश सरकार आश्वासनाची मागणी मान्य करील काय ? न केल्यास गांधीजी अधिकारस्वीकार करतील काय ? रॉय यांनीं ताबडतोब उत्तर केलें कीं, 'गांधींच्या आश्वासनमागणीचे दोन अर्थ होतात. एका अर्थांत घटनेच्या दुरुस्तीचा अंतर्भाव होतो. त्याकरितां ब्रिटिश सरकारशीं युद्धच करणें भाग आहे. व त्याकरितां देशाची तयारी लागते ती नाहीं. दुसरा अर्थ असा आहे कीं, त्याकरितां गांधींनीं मागणी करण्याची जरूरीच नाहीं. कारण गांधींना पाहिजे तें घटनाकायद्यांत आहेच. गांधींना आश्वासन मिळणार नाहीं व तीन चार महिन्यांचे आंत गांधी अधिकारस्वीकार करतील.' त्याप्रमाणेंच घडून आलें.

अधिकारस्वीकारास पं. जवाहरलाल, सुभाष बोस व सोशालिस्ट यांचा विरोध होता. मी रॉय यांस त्यांचें मत विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं "सुधारणा राबवणारा पण तोंडानें तसें न म्हणतां अधिकारस्वीकार करणारा पक्ष कॉंग्रेसमध्यें बहुमतांत आहे. अधिकारस्वीकारास विरोध कितीही केला तरी शेवटीं कँग्रेस अधिकार स्वीकारीलच. पं. जवाहरलाल यांनीं अधिकारस्वीकारास विरोध करण्याचें सोडून देऊन अधिकारस्वीकाराच्या बाजूनें मत द्यावें व पार्लमेंटरी कार्यक्रमाचीं सूत्रें जहाल मतवाद्यांच्या हातीं ठेवून अधिकाराचा प्रत्यक्ष घटनाभंगाकडे उपयोग करावा. असें न केल्यास अधिकारस्वीकारानंतर पं. जवाहरलाल व इतर समाजवादी यांस अधिकारस्वीकाराचीच बाजू उचलून शरण जावें लागेल. त्यापेक्षां आधींच वस्तुस्थिति ओळखून जबाबदारीचें राजकारण खेळावें." हें रॉय यांचें म्हणणें आज खरें ठरलेलें दिसत आहे.

श्री. रॉय यांच्याजवळ जितकें जावें, तितकें त्यांचें निर्मळ जीवन अधिक प्रत्ययास येतें. सर्वांगीण विद्वत्ता, निगर्वी मन, मुत्सद्दीपणा, कर्मयोग, प्रतिभासंपन्न बुद्धि, व्यवहारज्ञता, धीरोदात्तता या गुणांची रॉय हे मूर्ति आहेत. हिंदु संस्कृतींतील आचारधर्म रॉय पाळीत नसल्यामुळें कांहीं जणांस गोंधळल्यासारखें होतें. पण त्यांचें पूर्वायुष्य युरोपियन संस्कृतींत गेलें आहे, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे मन संशयांत फार वेळ राहणार नाहीं. अत्यंत कष्टांत व संकटांत ते आयुष्य घालवीत आहेत, पण क्षुब्ध महासागरांतील देवमाशाप्रमाणें ते बेकदर व शांत दिसतात.

'हिंदुस्थान स्टंडर्ड' चे संपादक श्री. सुरेशचंद्र मुजुमदार मला मुंबईस भेटले असतां म्हणाले कीं "तुम्ही रॉय यांच्या बद्दल इतका आदर बाळगतां याचें मला आश्चर्य वाटतें. कारण तुम्ही भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक व रॉय हे भौतिकवादी पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे पंडित, दोघांचीं दोन टोंकें आहेत." मी त्यांस म्हटलें कीं हिंदी तत्त्वज्ञान म्हणजे नुसता शंकराचार्यांचा वेदांत नाहीं. कपिल, कणाद, बुद्ध व महावीर यांचा अनीश्वरवाद आणि चार्वाकाचा भौतिकवाद हिंदी तत्त्वज्ञानांत आहे. रॉय यांचेकडे पाहिलें म्हणजें मला असें दिसतें कीं हिंदुस्थानांतील कपिल–कणादांचा रॉय हा वारस व उत्तराधिकारी आहे.

भाई रॉय यांची सगळी ग्रंथसंपत्ति क्रमानें प्रकाशित होण्याचा योग आल्यास भारतीय विचारसंपत्तींत बहुमोल भर पडेल. हा अल्पारंभ आहे.


सदाशिव पेठ,<br>
पुणें. ११।७।३८

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

# भाई मानवेंद्रनाथ रॉय

## ( अल्प चरित्र )

ज्यांच्या जीवनाचें सार 'क्रांति' या शब्दानें वर्णितां येईल असे हिंदुस्थानचे पुढारी थोडेच असतील. त्या थोड्यांपैकीं शास्त्रशुद्ध क्रांतीच्या मार्गाचा अवलंब करणारे त्याहून थोडे आणि त्यांपैकीं आपल्या मार्गावर अढळ विश्वास ठेवून कायम राहिलेले लोक तर 'भवति वा न वा' या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें अत्यल्पच सांपडतील. अशा अत्यल्प व्यक्तींपैकीं भाई मानवेंद्रनाथ रॉय हे एक आहेत.



भाई मानवेंद्रनाथ रॉय

वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षींच त्यांनीं क्रांतीचें "सतीचें वाण" बुद्धयाच घेतलें. आपल्या जीवनाच्या ४५ वर्षांपैकीं ३० वर्षें त्यांनीं हद्दपारी, तुरुंग, हालअपेष्टा, उपासमार यांच्या ज्वालांना न जुमानतां आपलें व्रत अखंड चालू ठेवलें आहे. एकदां तर मृत्यूच्या द्वारांत ते शिरले होते. परंतु, पुढील कार्यासाठीं त्यांनीं त्याला हात दाखवून थांबवून धरलें. त्यानंतर मेक्सिको, स्पेन, फरान्स, रशिया, चीन इत्यादि

५।६ देशांतील दलित जनतेच्या युद्धांत सक्रिय भाग घेऊन 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्' या उक्तीची त्यांनीं प्रचीति दाखविली. किंबहुना हिंदुस्थानांतून बाहेर जाऊन अन्यत्र क्रांतीचें प्रत्यक्ष विराट कार्य करणारे हे एकमेवाद्वितीय भारतपुत्र आहेत यांत शंका नाहीं; आणि इतकें असूनही स्वतःच्या चरित्राचा सुगावाही ते इतरांना लागू देत नाहींत इतके ते विनयी आहेत. त्यांचें बुद्धिवैभव भारतमातेस अभिमान वाटावा इतकें मोठें असून ते आपली लेखणी व कर्तृत्वाची बंदूक तिच्यासाठींच अखंड व अप्रतिहत कौशल्यानें चालवीत आहेत.

त्यांचा जन्म सन १८९३ सालीं मिदनापूर येथें झाला. त्यांचें मूळचें नांव नरेंद्र भट्टाचार्य असें होतें. सध्यांचे राष्ट्रपति सुभाषचंद्र बोस यांचाही जन्म याच गांवीं झाला हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. कदाचित् क्रांतिवीरांचा जन्म व्हावा असाच कांहीं विशेष गुण मिदनापूरच्या भूमींत असावा असें दिसतें. भाई रॉय यांचा जन्म कांहीं मोठ्या श्रीमंत घराण्यांत झाला नव्हता. त्यांचे वडील सामान्यतः मध्यम वर्गीय गृहस्थच होते. ते शिक्षक असून बुद्धिवादी व सुधारक होते. रॉय यांचें शिक्षण त्यांचेच देखरेखीखालीं थोडेंसें झालें. त्यांच्या वडिलांकडून रॉय यांना बुद्धिवाद व सुधारणा यांचें बाळकडू मिळालें होतें. एकदां लहानपणीं त्यांनीं इतरांनीं देवी म्हणून मानलेल्या मडक्यास नवा बूट घालून लाथ मारली. दुसरे दिवशीं पायाला बूट लागल्यामुळें पाय दुखूं लागला. त्या वेळीं शेजारी म्हणाले, "तूं देवाला मारलेंस म्हणून तुझ्या पायाला ही जखम झाली. तुला त्यानेंच शिक्षा केली." परंतु हा युक्तिवाद चुकीचा असून बूट नवा असल्यामुळेंच आपल्या पायास जखम झाली असें त्यांनीं पाहिलें व आपला बुद्धिवादावरील विश्वास अढळ व अचल असल्याचें एवढ्या बालवयांतही त्यांनीं सांगितलें.

वयाच्या १४ व्या वर्षीं म्हणजे सन १९०७ सालींच त्यांनीं दहशतवादी क्रांतिकारक लोकांमध्यें स्वतःचा शिरकाव करून घेतला.

बंगालच्या फाळणीच्या निमित्तानें सर्व भारतवर्षांत व विशेषतः बंगालमध्यें अत्यंत जोराचें आंदोलन झालें. दहशतवादी लोकांच्या चळवळीला या वेळीं विशेषच भरती आली होती. या चळवळींत कांहीं अद्‌भुत गोष्टी घडल्या व किती तरी तेजस्वी नर-रत्नें तेजोगोलाप्रमाणें चमकून गेलीं. पण जे अद्यापि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत आहेत अशांमध्यें अग्रगण्य असे रॉय हे आहेत. त्यांनीं १९०७ सालीं ज्या गटांत प्रवेश मिळविला त्या गटाचे प्रमुख त्याच वेळीं त्यांचेबद्दल असें म्हणाले होते कीं, " महान् पुढारी होण्यास लागणारे सर्व गुण त्यांचे ठिकाणीं आतांच दिसून येत आहेत. " १९०७ सालीं पडलेल्या एका मोठ्या दरोड्यांत त्यांनीं भाग घेतला असावा अशा संशयावरून त्यांना पकडलें होतें. पण एवढ्या लहान वयांत असलें भयंकर कृत्य करणें शक्य नाहीं असें म्हणून त्यांना सोडून देण्यांत आलें. यानंतर त्यांची पकड–सोड बरेच वेळां झाली. १९०७ ते १४ च्या दरम्यान मोठमोठे दरोडे जे पडले त्या त्या वेळीं त्यांना अटक झाली. पोलिसांचा ससेमिरा त्यांचेमागें सारखा लागला; परंतु पुरावा पुरेसा न मिळाल्यानें त्यांना दरोड्या-बाबतच्या खटल्यांतून सोडून द्यावें लागलें. याचा अर्थ ते सरकारी पाहुणचारास मुकले असा मात्र नव्हे. राजद्रोहाच्या वगैरे आरोपांवरून त्यांना किरकोळ शिक्षा पुष्कळच झाल्या आणि क्रांतिकारक म्हणून पोलिसांचा ससेमिरा कायमचाच त्यांचे मागें लागला.

१९०७ सालच्या दरोड्याच्या खटल्यांतून ते दोषमुक्त म्हणून सुटले तेव्हां त्यांच्या मनाची प्रवृत्ति किंचित् कालपर्यंत अध्यात्माकडे वळली. त्यांनीं तीर्थयात्रा केल्या. पुष्कळ पुण्यस्थलांचें दर्शन घेतलें व साधूंच्या सहवासाचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. या वेळीं जर त्यांना कोणी गुरु भेटला असता तर कदाचित् ते आज आहेत त्याप्रमाणें राजकारणी न राहतां योगीराज होऊन ब्रह्मानंदाचा अनुभव घेत राहिले असते. परंतु, त्यांच्या प्रवासांत त्यांना तीर्थाच्या व पुण्याच्या

दर्शनाऐवजीं पापाचेंच दर्शन घडलें. साधूंच्याऐवजीं ढोंगी लोकांचीं दुष्कर्मेंच पाहण्याचें नशिबीं आलें आणि त्यामुळें ते आध्यात्मिक मार्गापासून परावृत्त झाले. या वेळीं त्यांना भेटलेल्या साधूंपैकीं कोणी सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील सर्व लोकांना साक्षात्कार झाल्या-शिवाय "हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ यशाच्या मार्गावर जाणारच नाहीं." ही अशक्य गोष्ट जगाच्या अंतापर्यंतही घडणार नाहीं, हें रॉय यांचे तीव्र बुद्धीला तेव्हांच कळलें. या साधूंच्या सांगण्यामुळें त्यांची थोडा वेळ लुप्त झालेली बुद्धिवादी मनःप्रवृत्ति तीव्रतेनें जागी झाली. तिच्या प्रखरतेमुळेंच अध्यात्म प्रवृत्तीचा खोटा अंकुर अग्निसात् झाला. हें सुदैव कीं दुर्दैव ? व कोणाचें ? एवढें खरें कीं, त्यांनीं रूढ अर्थानें आध्यात्मिक उन्नतीची वाट सोडली. परंतु, अखिल दलित जनतेस आध्यात्मिक विकासास वाव मिळावा म्हणून त्यांचा उद्धार करण्याचे कार्यास ते मिळाले हें त्या दलि-तांचें सुदैवच नव्हे का ? आणि त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनेंही ही काय कमी आध्यात्मिक उन्नति झाली ?

याही बाबतींत भाई रॉय व राष्ट्रपति सुभाषचंद्र यांचें साम्य आहे, हा योगायोग विशेषच वाटतो. सुभाषचंद्र बोसही अशा तऱ्हेनें देवशोधार्थ गेले होते, पण तेही विन्मुख होऊन परत आले.

१९१४ सालीं महायुद्ध सुरू होतांच निव्वळ दहशतवादी स्वरूपाची असलेली चळवळ अधिक उग्र स्वरूप दाखवूं लागली. इंग्लंडवर आलेल्या आपत्तींची सुसंधि साधून हिंदुस्थानच्या चळवळीच्या गाडीला लाईन 'क्लिअर' घेतली तर आपलें स्टेशन आपणांस लवकर गांठतां येईल याची स्थूल कल्पना त्या काळांतही हिंदुस्थानांतील बहुतेक जहाल-वर्गीय लोकांत होतीच. आतां ही संधि आली आहे असें ओळ-खून बंगालमधील क्रांतिकारक गटानें ती साधावयाची असें ठरविलें. दहशतवादाचें रूपांतर बंडांत करावयाचें व बंड यशस्वी करून राज्य-

क्रांति करावयाची ही रोमांचकारी कल्पना यशस्वी करून दाखविण्यासाठीं रॉय व त्यांचे साथीदार यांनीं अनेक खटपटी केल्या.

स्वतः कॉम्रेड रॉय 'सी मार्टिन' या नांवानें बटेव्हियांत (जाव्हांत) जर्मन वकिलाची गांठ घेण्यास दोनदां गेले होते. त्यांच्या भेटींत ठरल्याप्रमाणें ३०,००० बंदुका, ४०० काडतुसांच्या पेटया व २ लाख रोख रुपये भरलेली एक बोट (मेव्हरिक) हिंदुस्थानांत यावयाची ठरली होती. ह्या हत्यारांच्या साधनांनीं बंगालमध्यें क्रांतीचें युद्ध उभारावयाचें असा त्यांचा बेत ठरला होता. इतर प्रांतांतून शत्रूस मदत पोंचू नये म्हणून कोणकोणते पूल कोणी उडवून द्यावयाचे याचीही योजना त्यांनीं केली होती. परंतु, सदर कटाचा सुगावा सरकारला लागला. योजलेली बोट हिंदुस्थान गांठूं शकली नाहीं; व त्या वेळीं (जनतेचा पाठिंबा नसलेलें) बंडही घडून आलें नाहीं. रॉय यांना पकडण्यांत आलें. त्यांच्या दोन साथीदारांना सरकारनें स्वर्गाचें दार मृत्यूच्या वाटेनें मोकळें करून दिलें. रॉय यांनीं मात्र मृत्यूची छाया स्वतःवर पडते न पडते तोंच विस्मयावह रीतीनें स्वतःची सुटका करून घेतली. नंतर ठिकठिकाणीं कांहीं दिवस गुप्त रीतीनें राहून त्यांनीं चीनमध्यें पलायन केलें. चीनमध्यें सन्-यत्-सेन यांचेशीं त्यांची चांगलीच दोस्ती झाली. त्यांच्याशीं रॉय यांची विविध राजकीय विषयांवर चर्चा होत असे. तेथून ते फिलिपाईन्समध्यें गेले. या सर्व प्रकरणांत ध्यानांत ठेवण्याजोगी विशेष गोष्ट म्हणजे एका जर्मन वकिलाबरोबर कॉम्रेड रॉय यांची झालेली मुलाखत. त्यांत रॉय यांनीं त्या वकिलाला सांगितलें कीं, "हिंदुस्थानला स्वातंत्र्य हवें! इंग्रज गेल्यावर जर्मनीची सत्ता हिंदुस्थानांत अंकुरित होईल अशी एकही सवलत आम्ही जर्मनीला हिंदुस्थानांत देणार नाहीं." याच वेळीं रॉय यांनीं ठरविलें कीं, हिंदुस्थानला स्वातंत्र्य स्वतःच्याच प्रयत्नानें मिळविलें पाहिजे.

फिलिपाईन्समधून पुढें ते अमेरिकेंत गेले. तेथें त्या वेळीं लाला लजपतराय होते. त्यांची व रॉय यांची दाट मैत्री झाली. दोघांच्या

नांवानें एक पुस्तक प्रसिद्ध व्हावयाचें होतें. परंतु, कांहीं बाबतींत रॉय व लजपतराय यांचीं मतें न जमल्यामुळें त्यांनीं आपलें नांव त्या पुस्तकावर प्रकाशित केलें नाहीं. मात्र हें पुस्तक लिहिण्यास रॉय यांची मदत लाला लजपतराय यांना फार झाली यांत शंका नाहीं. अमेरिकेंत त्यांना फार दिवस राहतां आलें नाहीं. त्यांना पकडण्याचें घाटत होतें; परंतु, सरकारच्या हातावर तुरी देऊन ते मेक्सिकोंतील दलित जनतेस क्रांतीच्या कार्यास मदत देण्यासाठीं तिकडे निघून गेले. तेथें असतांनाच त्यांनीं मार्क्सिझमचा प्रथम अभ्यास केला. तेथील जनतेला चळवळींत यश मिळवून देऊन त्यांनीं त्यांचा जड अंतःकरणानें निरोप घेतला. मेक्सिकोमध्यें ते अत्यंत लोकप्रिय झाले होते. पुढें त्यांना स्पेनमध्यें काम करावें लागलें. तेथें त्यांची व बोरोडिन यांची ओळख झाली. बोरोडिन यांना रॉय यांच्या धडाडीचें अत्यंत आश्चर्य वाटलें. येथें असतांनाच त्यांची व लेनिन याची प्रथम भेट झाली. स्पेनमध्यें जाण्यापूर्वीं बर्लिनमध्येंही त्यांनीं एक महिना काढला होता. स्पेन व बर्लिन येथील कामगार चळवळींना योग्य दिशा तेवढ्या अल्प काळांतही त्यांनीं लावली. रशियांत क्रांतीनंतर रॉय गेले. तेथें त्यांनीं लेनिनवर आपल्या कर्तृत्वाची व स्वतंत्र विचाराची छाप ताबडतोब पाडली. लेनिन यानें रॉय यांची योग्यता ओळखून थर्ड इंटर नॅशनलमध्यें त्यांस प्रमुख स्थान दिलें. ते या जागीं असतांना त्यांचा इतरांनीं द्वेष केला. परंतु लेनिननें तो द्वेष आहे हें ओळखूनही त्यांना त्या जागीं कायम ठेवलें. त्यांचा व लेनिन याचा एका बाबतींत मतभेद झाला. परंतु, त्यांनीं आपलें म्हणणें International च्या सभेंत मांडलें हें पाहून पुष्कळांना लेनिनपुढें 'पोर' दिसणाऱ्या या गृहस्थाचें आश्चर्य वाटलें. लेनिननें मात्र आपला व त्यांचा असे दोन्ही प्रबंध Third International कडून मान्य करून घेतले. रॉय यांचेकडे पौर्वात्य

राष्ट्रांतील प्रचारशिक्षणाचें कार्य होतें. ते १९१९ पासून १९२८ पर्यंत नऊ वर्षें थर्ड इंटरनॅशनलमध्यें होते.

१९१९ ते १९२२ पर्यंत रॉय यांनीं सहा ग्रंथ लिहिले. १९२२ मध्यें त्यांनीं लिहिलेला India in Transition हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. या ग्रंथाच्या वाचनानेंच हिंदुस्थानांतील पुष्कळसे तरुण समाजवादाचे पुरस्कर्ते झाले. हिंदुस्थानच्या इतिहासाचें ईस्ट इंडिया कंपनीचे सुरुवातीपासूनचें विवेचन मार्क्सिस्ट दृष्टीनें यांत केलें आहे. त्याचप्रमाणें कामकरी वर्गाच्या विकासाचें विवेचन उत्कृष्ट केलें असून एकूण हिंदुस्थानच्या लढ्याची माहिती मार्मिक रीतीनें त्यांत दिली आहे. अत्यंत शुद्ध व तर्कपूत विचारदृष्टीनें हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नांचें सांगोपांग विवेचन करणारा याशिवाय दुसरा ग्रंथ झाला नाहीं असें म्हटलें तर अतिशयोक्ति बिलकूल होणार नाहीं. हा ग्रंथ प्रसिद्ध होतांच त्याच्या ३०००० प्रती बर्लिनमध्यें खपल्या. हा ग्रंथ निव्वळ चळवळींत काम करणाऱ्यांनाच उपयुक्त आहे असें नसून अर्थशास्त्रज्ञांनाही तो प्रमाणभूत झाला आहे. हिंदुस्थानांत १९०८ पासून कामगार वर्गाची चळवळ अत्यंत जोरांत सुरू झाली. १९२१ सालापासून या चळवळींत पडलेल्या कार्यकर्त्यांस क्रांतिकारक समाजवादी दृष्टिकोन देऊन हिंदुस्थानांत समाजवादी क्रांतिकारक गट निर्माण करण्याचें कार्य प्रथमतः भाई रॉय यांनीं केलें. कानपूर कम्युनिस्ट कटाच्या आरोपींत सूत्रधार मुख्य आरोपी रॉय हे होते. १९२८ मध्यें चीनमध्यें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठीं सोव्हिएट सरकारनें बोरोडिन यांस चीनमध्यें पाठविलें. त्यांच्या मदतीस रॉय यांनींही जावें असें ठरलें व त्याप्रमाणें ते चीनमध्यें आलेही. त्यांनीं तेथें विशिष्ट तऱ्हेनें क्रांति होईल असें सांगितलें; परंतु, त्यांचा व बोरोडिन याचा मतभेद झाल्यामुळें रॉय यांना परत रशियांत जावें लागलें तेथून फिरून एकवार ते चीनमध्यें आले होते; परंतु ते आजारी पडले व शिवाय रशियांतून

येणारे हुकूम अनिश्चित स्वरूपाचे होते त्यामुळें त्यांना चीनमध्यें आपलें कार्य करून दाखवितां आलें नाहीं. चीनमध्यें असतांना 'चीनची क्रांति व प्रतिक्रांति' या नांवाचा सातशें पानांचा जर्मन भाषेंत एक सुंदर ग्रंथ त्यांनीं लिहिला आहे. अजून त्याचें इंग्लिश भाषांतर झालें नाहीं.

१९२८ नंतर त्यांचे थर्ड इंटरनॅशनलशीं बरेच मतभेद झाले. तेथून त्यांना निघावें लागलें. कांहीं बाबतींत त्यांचेवर अन्याय झाला आहे असें मानण्यास जागा आहे. परंतु, त्यांनीं पुढें रशियांत अगर परदेशांत कोठें तरी राहण्यापेक्षां स्वदेशांतच काम करावें असें ठरविलें व ते हिंदुस्थानांत १९३० सालीं आले. नंतर त्यांना अटक झाली व १२ वर्षांची शिक्षा झाली. पुढें ती अपीलांत ६ वर्षांची करण्यांत आली. फैजपूर कांग्रेसचे आधीं कांहीं दिवस त्यांची सुटका झाली व तेव्हांपासून त्यांनीं कांग्रेसचें राजकारण प्रभावी करण्याची चळवळ चालू ठेवली. सध्यां त्यांच्या संपादकत्वाखालीं 'इंडिपेंडंट इंडिया' या नांवाचें पत्र गेल्या वर्षभर निघत आहे. त्यांतून त्यांनीं केलेलीं बहुतेक राजकीय भविष्यें खरीं ठरत आलीं आहेत. यापुढेंही त्यांचें राजकारण नुसतें कामगार–शेतकरी यांचेसंबंधीचें न राहतां कांग्रेस प्रभावी करून 'लोकशाहीप्रधान राष्ट्रीय क्रांति' घडवून आणण्यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू राहतील. या त्यांच्या धोरणाबद्दल राजकीय दृष्टचा पुष्कळांचे मतभेदही असतील. त्यांच्या सर्व जीवनाचें सार दोन शब्दांत असें सांगतां येईल: अलौकिक त्याग, बालपणापासून या घटकेपर्यंत अत्यंत कष्टमय क्रांतिकारक जीवन आधुनिक जगांतील चालू क्रांतीचा अनुभवात्मक सक्रिय अभ्यास, रोमांचकारी प्रसंग, सरकारच्या हातावर तुरी देऊन व विस्मयावह रीतीनें सुटका! याही पलीकडे जाऊन त्यांच्या विचारांचें वर्णन करावयाचें तर ते 'बुद्धिवादी क्रांतिकारक तत्त्वज्ञानी' आहेत; व याच दृष्टीनें त्यांची योग्यता हिंदुस्थानांतील कोणत्याही

पुढाऱ्यामध्यें अधिक मोठी आहे. त्यांच्या लेखणीचें सामर्थ्य फारच मोठें आहे. राजकीय मतप्रचाराचें लिखाण सोडून दिलें तरी तात्त्विक व विद्वत्तापूर्ण अशी त्यांची लेखणी कोणाही बुद्धिवादी माणसास मोहिनी पाडल्याशिवाय राहणार नाहीं. स्वच्छ व स्पष्ट विचारसरणी, खोल दृष्टि आणि प्रवाही भाषाशैली यामुळें त्यांच्या खाजगी पत्रापासून तों एकाद्या मोठ्या ग्रंथापर्यंत सर्व लिखाण अत्यंत तेजस्वी व आकर्षक झालें आहे. द्रष्ट्याप्रमाणें पुढील गोष्टींचा अचूक अंदाज आणि सूत्रकाराप्रमाणें अत्यंत थोड्या शब्दांत आपला गंभीर आशय मांडण्याची त्यांची शास्त्रीय पद्धति पाहून अनेक शास्त्रज्ञांना त्यांच्याबद्दल नितांत आदरच वाटत आहे. त्यांची दृष्टीही सर्व विषयगामी अशीच आहे. याचें एकच उदाहरण हवें असेल तर त्यांनीं प्रो. आईन्स्टाईनच्या Relativity च्या सिद्धांताचे मंडनार्थ लिहिलेले लेख हें आहे. त्यांतही त्यांच्या भाषेचें, तात्त्विक सूक्ष्मतेचें व स्वच्छ विचारसरणीचें प्रतिबिंब पडलें आहे. त्यांच्या अगाध विद्वत्तेमुळेंच आइन्स्टाईनसारखे जगप्रसिद्ध विद्वान् त्यांचे मित्र झाले. हिंदुस्थानांत सुरू असलेल्या राजकीय खळबळीच्या पाठीशीं विचारक्रांतीची अतिशय गरज आहे. विचारक्रांतीचें पुढारीपण रॉयसारखे क्रांतिमय जीवन अनुभवलेले, प्राचीन व आधुनिक वैज्ञानिक विचारांचा खोल अभ्यास केलेले व आपल्या त्यागी जीवनामुळें साधुत्वाचा आदर्श बनलेले पुरुषच घेऊं शकतील.

# इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य

प्रकरण पहिलें

## उपोद्घात

मुसलमानी धर्माचा आकस्मिक उद्गम व त्याचा आश्चर्यकारक विकास या इतिहासांतील अत्यंत चित्तवेधक गोष्टी आहेत. हिंदुस्थानच्या सध्यांच्या आणीबाणीच्या वेळीं या उद्गमाचा व विकासाचा अभ्यास निःपक्षपातीपणानें होणें अत्यंत अवश्य आहे. इतिहास-संशोधनाच्या दृष्टीनेंही या अभ्यासाचें महत्त्व विशेषच आहे. ज्ञानलालसेनें केलेले परिश्रम पूर्णपणें फलप्रद झाल्याशिवाय केव्हांही राहात नाहींत; आणि हिंदुस्थानांत—विशेषतः हिंदु बांधवांना–इस्लामच्या ऐतिहासिक कार्याचें ज्ञान व महंमदी धर्मानें मानवी संस्कृतीच्या विकासास केलेली मदत याचें सम्यक ज्ञान होणें हें राजकीय दृष्ट्याही महत्त्वाचें होऊन बसलें आहे.

**हिंदुस्थानांत मुसलमान उपरे कां?—**

हिंदुस्थानांतही महंमदाचे अनुयायी असंख्य आहेत. कोणत्याही एका मुसलमानी राष्ट्रांत असतील त्याहून कितीतरी अधिक मुसलमान हिंदुस्थानांत आहेत हें क्वचितच कोणाच्या ध्यानीं येत असेल. अनेक शतकांच्या सहवासानंतरही हा बहुसंख्य वर्ग उपरा असाच वाटतो हें कोणत्या मनोवृत्तीचें द्योतक म्हणावें बरें? दुर्दैवानें झालेल्या या भेदभावाला ऐतिहासिक कारणपरंपरा असेल–आहे. मुसलमानांनीं

हिंदुस्थानांत पाय ठेवला तो जेते म्हणून ! त्यांनीं हा देश जिंकून येथें सुमारें शतकभर राज्यही केलें आणि म्हणूनच जित–जेते भावाचा ठसा आमच्या इतिहासावर कायमचा उठला आहे. पण ही शल्यवत् बोचणारी स्मृति सध्यांच्या दोघांच्याही गुलामगिरीनें झांकून टाकली आहे. हिंदु व मुसलमान या दोघांनाही साम्राज्यशाहीचें जूं सारखेंच जड व जाचक झालें आहे. आणि त्यामुळें मुसलमान हे इतके " हिंदुस्थानचेच " बनले आहेत कीं, मुसलमानी रियासत ही हिंदी इतिहासापासून वेगळी मानणें हें अनुचित आहे.

सत्य किंवा काल्पनिक अशा प्राचीन वैभवाच्या स्मृतीनें सध्यांच्या गुलामगिरीच्या स्थितींतही समाधान मानण्याची संवय सर्वांना असते; व तीमुळेंच मुसलमानांमध्यें राष्ट्रीय दृष्टीचा किंचितसा प्रादुर्भाव झाला आहे. पण अकबराच्या उदार राज्याचा गर्व वाहणारा किंवा शहाजहानच्या जगप्रसिद्ध शिल्पकृतीकडे अभिमानपूर्ण स्वाभिमानानें पाहणारा हिंदु, मुसलमान बांधवांकडे अगदीं तिऱ्हाईत दृष्टीनें नेहमीं पाहात असतो. सनातनी हिंदु सुसंस्कृत व विद्वान् अशा मुसलमानांनाही अद्यापि म्लेंच्छ, अपवित्र, रानटीच मानतात; व त्यांच्याशीं हीन हिंदूहूनही वाईट तऱ्हेनें ते वागतात.

### अपुरी व चुकीची माहिती—

याचें खरें कारण जेत्यांसंबंधीं असलेल्या द्वेषांतच आहे असें दिसतें. ते संबंध भूतकालीन होऊनही गेले. मात्र तो द्वेषभाव राजकीय विकासालाच नव्हे तर इतिहासाच्या निःपक्षपाती अभ्यासालाही मारक होत आहे. एकमेकांच्या संस्कृतीबद्दल योग्य ज्ञान, इतक्या निकट राहूनही, दोघांनाही नाहीं अशी स्थिति हिंदुस्थानशिवाय इतरत्र कोठेंही आढळून येत नाहीं. मुसलमान धर्माचा अज्ञानानें तिरस्कार करणारे हिंदूंइतके दुसरे लोक कुठल्याही देशांत नाहींत. आमच्या राजकीय तत्त्वप्रणालीचें मुख्य अंग म्हणजे आमची आध्या-

त्मिक अधिराज्यता होय; व यामुळें महंमदी धर्माकडे आपण अधिकच उपेक्षेनें पाहतों हें सत्य आहे. पैगंबराच्या तत्त्वज्ञानाची सध्यांची माहिती ही अत्यंत अपुरी व चुकीची आहे. सामान्य सुशिक्षित हिंदूंस इस्लामचें क्रांतिकारक महत्त्व माहीत असतच नाहीं. त्याचप्रमाणें त्या क्रांतीच्या सांस्कृतिक परिणामांची जाणीवही असत नाहीं. हिंदूंच्या या कल्पनांचा राजकीय धोरणावर परिणाम होणार नसता तर त्या हास्यास्पद म्हणून सोडूनही देतां आल्या असत्या; पण शास्त्रज्ञान, ऐतिहासिक सत्याची चाड व राष्ट्रीय एकजूट या तीनही कारणांसाठीं, या खुळचट कल्पनांचें निर्मूलन करणें अवश्य आहे; व इस्लामी संस्कृतीचे योग्य गुणदोष जाणणें हें सध्यांच्या हिंदुस्थानच्या स्थितींत अत्यंत अवश्य आहे.

इतिहासकाराची ग्वाही—

सुप्रसिद्ध इतिहासकार गिबन म्हणतो, "इस्लामचा उदय आणि विकास ही एक अत्यंत संस्मरणीय अशी क्रांति झाली आहे. तिचा जगाच्या इतिहासावर चिरकाल टिकेल असा नवा ठसा उमटला आहे." अरबस्थानच्या उजाड वाळवंटांतून वर आलेल्या व नवीन धर्माच्या चेतनेनें स्फूर्ति पावलेल्या लहान लहान फिरत्या टोळ्यांनीं दोन प्रचंड व बलाढ्य साम्राज्यांना अतिशय जलद मागें हटवलें आहे हें विश्वसनीयही वाटणार नाहीं. तरवारीच्या जोरावर शांतीचा संदेश सर्वत्र पसरून 'धर्मसंस्थापक' ही पदवी एकट्या महंमदानेंच मिळविली आहे. त्याच्यानंतर अवघ्या पांच-पन्नास वर्षांत त्याच्या अनुयायांनीं त्याचें तें चांदाचें निशाण एका बाजस हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर व दुसऱ्या बाजूस अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर रोंवलें. दमास्कस येथील प्रारंभींच्या खलिफांचेंही राज्य एवढें मोठें होतें कीं, त्याच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकास जाण्यास द्रुतगतीच्या उंटास देखील पांच महिने लागत. हेगीराच्या

पहिल्या शतकाच्या शेवटीं हे धर्मसंस्थापकांचे 'सेनापती' जगांतील सर्वांत सामर्थ्यवान् सत्ताधीश होते.

**सर्वांत मोठा चमत्कार—**

चमत्कार केल्यामुळें धर्मसंस्थापकाची पदवी बहुतेक सर्वांना मिळाली आहे. या खुणेवरूनच जर धर्मसंस्थापकत्व ओळखावयाचें असेल तर महंमदाला सर्वांत मोठा धर्मसंस्थापक मानलें पाहिजे. इस्लामचा प्रसार हाच त्याचा सर्वांत मोठा चमत्कार. ट्रजन व ऑगस्टस् यांनीं ज्याच्या मर्यादा वाढवल्या तें रोमचें साम्राज्य ७०० वर्षांच्या मोहिमांचें फल होय. परंतु तेंही एकाच शतकांत अरबी साम्राज्यानें मिळवलेल्या राज्याचे मानानें लहानच म्हटलें पाहिजे. अलेक्झँडरचें साम्राज्यही खलिफांच्या राज्याच्या अंशाइतकेंच भरेल. कारण, ज्या इराणी साम्राज्यानें रोम साम्राज्याशीं १००० वर्षे टक्कर दिली तें साम्राज्य अल्लाच्या तरवारीपुढें अवघ्या १० वर्षांत वांकलें. इस्लामच्या उदयाचा हा नवलपूर्ण चमत्कार इतिहासकारांनीं वर्णन करण्यासारखा नाहीं काय?

**एका शतकांतील क्रांति—**

"अरब लोकांत राज्यकर्त्यांच्या गुणाचे बीजांकुरही दिसत नव्हते. ना सैन्य, ना राजकीय आकांक्षा. अरब हे कवी होते, नाटककार होते, व्यापारी होते, युद्ध–निपुण तर होतेच होते. पण, मुत्सद्दी? छे! ते मुत्सद्दी कधींच नव्हते. त्यांच्या धर्मांतही कांहीं स्थैर्योत्पादक किंवा ऐक्यकारक असे गुण नव्हते. प्रारंभीं अनेक देवता, मूर्ती ते मानत असत. पण एका शतकानंतरच ते सर्व जगांत सामर्थ्यवान्, संपन्न असे बनले. त्यांनीं सीरिया व इजिप्त जिंकला; इराण आत्मसात् केला; पश्चिम तुर्कस्थान व पंजाब यांचा कांहीं भाग त्यांनीं आपल्या पंजाखालीं घातला. आफ्रिकेंतून बायझंटाइन्सची हकालपट्टी यांनींच केली. स्पेन, विसि-

गॉथच्या मिठींतून मुक्त केला. अलेक्झॅंड्रिया व सीरिया यांच्या बंदरांत बनविलेलीं त्यांचीं आरमारें भूमध्य समुद्रांत डौलानें डुलत असत. ग्रीक बेटांना त्यांनीं सळो की पळो केलें आणि बायझंटाइन् साम्राज्याच्या आरमारी सत्तेला त्यांनींच आव्हान दिलें. त्यांना हे सर्व विजय लीलेनें लाभले. पर्शियन व ॲटल्स पर्वतांवरील बर्बरांना याच लोकांनीं काय तो प्रतिकार केला. त्यांच्या या विजयपरंपरेला कोठेंच प्रतिबंध येणार नाहीं असेंच आठव्या शतकाच्या आरंभीं वाटलें. भूमध्य समुद्रावरची रोमन लोकांची सत्ता नामशेष झाली—नाममात्रही राहिली नाहीं. नवीन पौर्वात्य धर्मावर अधिष्ठित अशा नव्या संस्कृतीशीं दोन हात करण्याचा प्रसंग आपणावर आला आहे असेंच सर्व ख्रिस्ती राष्ट्रांना वाटलें. ''

—एच्. ए. एल्. फिशर : यूरोपचा इतिहास १३७–३८.

हें भयंकर आश्चर्य घडलें तरी कसें हा प्रश्न इतिहासकारांना घोंटाळ्यांत पाडणारा आहे. शांत व सहनशील लोकांवर धर्मवेड्यांनीं (?) मिळविलेला विजय म्हणजेच अरबांचा इतिहास हा सिद्धांत चिकित्सक सुशिक्षितांनीं आतां त्याज्य ठरविला आहे. या चकित करणाऱ्या विजयाचें मर्म इस्लामी धर्माच्या क्रांतिकारकतेंत आहे. ग्रीस, रोम, इराण, चीन व हिंदुस्थान येथील संस्कृती अवनतीच्या मार्गास लागल्या होत्या. त्यामुळें तेथील बहुजन समाज अगतिक व निराश झाले होते. या अगतिकतेंतून उद्धार करून त्याला क्रांतिकारक बनविण्याचें सामर्थ्य इस्लामी संस्कृतींतच होतें.

प्रकरण दुसरें

# इस्लामचें कार्य

इस्लामच्या इतिहासाचे सामान्य अभ्यासक इस्लामच्या लष्करी लीलांवरच भर देतात, आणि त्यामुळें इस्लामच्या क्रांतिकारक कार्याच्या महत्त्वाकडे काणाडोळाच करतात. युद्धांतील विजय एवढें एकमेव कार्यच इस्लामचें असतें तर त्याला ऐतिहासिक महत्त्व कांहींच नाहीं. तार्तरी आणि सिथिया यांच्या रानटी टोळ्यांचे हल्ले हे अरबांच्या लष्करी हालचालीपेक्षां नसले तरी निदान तितकेच भयंकर होते हें खास; परंतु यूरोप आणि आशिया यांच्या सीमाप्रांतापासून पूर्व, दक्षिण आणि पश्चिम यांवर ज्या हल्ल्यांच्या लाटा आदळत, त्या आणि अरबांच्या धर्मवेडांचे मधून मधून होणारे हल्ले यांमध्यें महदंतर आहे. पहिल्या हल्ल्यामध्यें राजकीय अगर सामाजिक उलथापालथ थोडा वेळ होत असे. विनाश आणि कत्तल एवढीच काय ती आपले अवशेष ठेवून त्या लाटा विरूनही जावयाच्या. परंतु अरबांच्या हल्ल्यांच्या लाटांना स्थिर स्वरूप असून मानवी इतिहासांतील संस्कृतीचा रम्य प्रांत त्यांनीं निर्माण केला आहे. विनाश हें त्यांचें गौण कार्य होय. जुन्याचा अवश्यंभावी नाश त्यानें केलाच, पण तोही नवीनाची घटना व्हावी म्हणून. सीझर आणि चासरो यांचे माजलेले देव्हारे त्यांनीं मोडून टाकले, मानवी ज्ञानाचा होणारा विनाश त्यांनीं थांबविला आणि पुढील पिढ्यांच्या हितासाठीं त्यांनीं त्याचें संरक्षण केलें.

**सांस्कृतिक साध्य—**

अरब घोडेस्वारांचीं अजब कृत्यें हेंच कांहीं इस्लामचें वैशिष्ट्य

नव्हे. त्यांच्या योगानें आपलें चित्त वेधतें आणि असल्या प्रचंड गतिमान् ऐतिहासिक आश्चर्याचें कारण शोधण्याचें औत्सुक्य वाढतें. 'देवसेने' च्या या चमत्कारपूर्ण कृत्यांनींच सामान्य अभ्यासकाचे डोळे दिपून जातात आणि त्यामुळें त्याला या महत्त्वाचीं क्रांतिकारक कार्यें दिसतच नाहींत—मग तो महंमदाचा अनुयायी असो वा नसो. हे लष्करी विजय पुढील सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील कार्यांचा प्रारंभच होत. त्यांच्यामुळें आर्थिक उन्नति व आध्यात्मिक प्रगति घडवून आणणारें राजकीय वातावरण निर्मिलें गेलें. रोमन व इराणी साम्राज्याचे अवशेष नाहींसे करणें अवश्य होतें. तरच नवीन कल्पना व ध्येयें यांनीं निबद्ध अशी नवी साम्राज्यघटना तयार होणें शक्य होतें. दुष्ट रूढींनीं आणि जादूटोण्याच्या गूढवादानें सर्व वातावरण गढळून टाकलें होतें आणि त्यामुळें पर्शियन व बायझंटाइन साम्राज्यांतील प्रजेचा आध्यात्मिक, बौद्धिक व नैतिक विकास अगदीं खुंटूनच गेला होता. महंमदाच्या एकेश्वरीवादाच्या तरवारीनें अरबी टोळ्यांमधील दांभिक मूर्तिपूजेचा नायनाट केला, झोरॉअस्टरच्या चिरंतन अशा दुष्ट तत्त्वज्ञानापासून मानवाला मुक्त केलें, ख्रिश्चन धर्माच्या चमत्कारपूर्ण रूढींच्या चिखलांतून त्यांचा उद्धार केला, आणि हिंदुस्थानाला संन्यासवादाचा लागलेला रोग पूर्णपणें बरा करण्याचे कामीं वरील हत्यार अत्यंत उपयुक्त ठरलें. अरबांच्या सर्व विजयांच्या योगानें नवा इतिहासच घडविला गेला आहे; मानवी समाजाला प्रगत केलें आहे.

प्राचीन ग्रीक संस्कृतीचा आध्यात्मिक वारसा रोमन साम्राज्याच्या नाशाखालीं व ख्रिश्चन रूढीच्या अंधारांत गडप झाला होता. त्या अमोल संपत्तीचा पुनर्लाभ घडविण्याचें श्रेय अरब सैनिकांना आणि एकेश्वर वादावर अधिष्ठित झालेल्या सामाजिक व राजकीय अभिनव राज्यघटनेसच आहे. या संपत्तीचा लाभ झाला म्हणूनच तर सर्व यूरोप खंडांतील जनता उद्विग्नतेच्या ग्रहणांतून मुक्त

होऊन आधुनिक संस्कृतीच्या सूर्यप्रकाशांत प्रवेश करूं शकली. देव-धर्म रक्षणासाठीं परजलेली इस्लामी तरवार देव व धर्म यांचें रक्षण करूनच थांबली नाहीं; तिनें नवीन समाजशक्तीला विजयश्री मिळवून दिली आणि त्यामुळेंच बौद्धिक नवचैतन्य निर्माण केलें. याच चैतन्यतेच्या प्रदीप्ततेमुळें सर्व धर्मश्रद्धेयांचें निर्मूलन झालें.

### विनाशापासून संरक्षण—

इस्लामची सुरुवात निवळ राजकीय आंदोलन म्हणूनच झाली. त्यांत धर्माच्या आंदोलनाचा अंश फारच थोडा होता. प्रारंभीं प्रारंभीं सर्व फिरत्या अरबी टोळ्यांच्या एकीकरणाचीच हांक त्या चळवळींत होती. आणि तें जसें जलद घडून आलें तसे राजकीय व धार्मिक ऐक्याच्या निशाणाखालीं आशिया आणि आफ्रिका यांतील रोमन वर्चस्वाखालील प्रांत आले. यापूर्वींची क्रांति अयशस्वी झाली होती. एका बाजूनें त्यागवादी, संन्यासवादी व अन्य बाजूनें नष्ट पावणाऱ्या साम्राज्यशाहीचा आधार बनलेल्या ख्रिश्चन धर्माचें क्रांतिकारक महत्त्व नष्ट झालें होतें; परंतु सामाजिक अनवस्था चालूच होती. आणि आणीबाणीचा प्रसंग जवळ येत चालला होता. अशा वेळीं रोमच्या कुजक्या वातावरणापासून दूर राहिलेल्या या अरब व्यापाऱ्यांनीं आशेचा संदेश दिला; इस्लामच्या क्रांतीनें मानवजातीचें विनाशापासून संरक्षण केलें.

महंमदाच्या कार्याबद्दल एक सुप्रसिद्ध इतिहासकार काय म्हणतो तें पहा : "ज्ञान आणि बल यांच्या पाठीमागें लागलेलें व सुधारणेच्या धावत्या धारेस लागलेलें राष्ट्र त्यास आढळून आलें. अरब जनतेच्या मनांतील प्रक्षोभानें महंमदास त्याचें कार्य दिलें; इतकेंच नव्हे तर त्याचें उदाहरण पाहून त्याच्या हयातींतच अनेक धर्मप्रसारक निर्माण झाले."

—ओक्ले : अरबांचा इतिहास.

प्रेषितांचे उदात्त गुण—

धर्मवेड्या लोकांची लुटालूट म्हणजेच इस्लामचा इतिहास असें ज्यांना वाटतें, त्यांना काय म्हणावें हेंच कळत नाहीं! कारण "अल्ला हो अकबर" च्या गर्जनेंत कुराण आणि तरवार यांपैकीं एकाची निवड करावयास इस्लामनें–महंमदानें सांगितलें असें जे मानतात त्यांना हें माहीत तरी नसावें किंवा ते तिकडे दुर्लक्ष तरी करीत असावेत, कीं महंमदाच्या पाठोपाठ त्याच्या गादीवर आलेल्या ईश्वरप्रेषितांनीं ऐहिक विजयावरच भर दिला. ते सर्व औदार्य, पावित्र्य आणि भूतदया इत्यादि गुणांमध्यें मानवी समाजावर तुटून पडणाऱ्या अलॅरिक, चेंगीझखान वगैरे रानटी लोकांपेक्षां किती तरी श्रेष्ठ होते. त्यांच्या भक्तीभोंवतीं रूढीचें वलय असेल; परंतु ते दांभिक नव्हते. व्यवहारज्ञान आणि औदार्य यांनीं त्यांच्या धर्मवेडाला हळुवारपणा आणला होता. ते महत्त्वाकांक्षी होते; पण पूर्णपणें निःस्वार्थी होते. देवभक्तीच्या नांवाखालीं ते आपली धनभक्ति झांकीत नव्हते. धर्मरक्षक अबुबकर याच्याइतकी भक्तिवान्, उदात्त, कार्यनिष्ठ व नम्र व्यक्ति इतिहासांत शोधूं जातां सांपडणार नाहीं. त्यानें सेनेला दिलेला संस्मरणीय आदेश पहा :—

"न्यायी बना; अन्यायानें वागणारे कधींच उन्नत होत नाहींत. धैर्यशाली बना; मरण पत्करा; पण शरण जाऊं नका. दया दाखवा; वृद्ध स्त्रिया आणि मुलें यांना मारूं नका; फळझाडें, धान्य आणि पशू यांचा नाश करूं नका. शत्रूला देखील दिलेलें वचन पाळा! आणि जगापासून निवृत्त झालेल्यांना यत्किंचितही त्रास देऊं नका!"

या आज्ञा मनापासून सोडल्या व पाळल्या जात म्हणून तर अप्रतिहतपणें विजय मिळत असत.

अरब स्वारांचें सर्वत्र 'स्वातंत्र्यदाते' म्हणून स्वागत होत असे. महंमदाची क्रांतिकारक शिकवण निष्ठेनें तंतोतंत पाळणारे आणि सुज्ञ खलिफांच्या आदेशाप्रमाणें आचरण करणारे लोकांच्या सहानु-

भूतीस कां बरें पात्र होणार नाहींत? जितांना सहानुभूतीनें वागविल्याशिवाय त्यांच्यावर अबाधित सत्ता प्रस्थापित करणें हें जेत्यांना अशक्य आहे.

उमर या दुसऱ्या खलिफाच्या वेळीं एका बाजूस ऑक्सस नदीपर्यंत व दुसऱ्या बाजूस अलेक्झँड्रियापर्यंत साम्राज्याचा विस्तार झाला होता. अशा वेळींही ह्या खलिफानें जेरुसलेममध्यें सर्व दरबारी जमाना एका उंटावर घालून प्रवेश केला. त्या उंटावर एक तंबू, धान्याची पिशवी, खजुराची एक पडशी, लाकडी कटवा आणि पाण्याची एक पखाल एवढेंच काय तें राजवैभव होतें. इराण, इजिप्त वगैरे प्रांत ज्यांनीं जिंकले ते किती साधे, निष्ठावंत, न्यायप्रिय व सदाचारी होते याचें वर्णन गिबननें सुंदर केलें आहे : “ त्यांचा मुक्काम जेथें जेथें पडे तेथें तेथें सर्वांना ‘ पवित्र ’ प्रसादासाठीं बोलावण्यांत येत असे. स्वारीवर असतांनादेखील तो आपले अधिकार न्यायदानासाठींच उपयोगांत आणीत असे. अरबांत असलेली बहुपत्नित्वाची व व्यभिचाराची चाल त्यानें सुधारली. तो मांडलिकांची पिळवणूक थांबवीत असे, त्याचप्रमाणें अरबांच्या ऐषारामाबद्दल त्यांना तो शासन करीत असे. ”

—रोमन साम्राज्याचा ऱ्हास व नाश.

### देवाची तरवार—

खलिद हा अतिशय पराक्रमी होता. त्याला महंमदानें ‘ देवाची तरवार ’ अशी पदवी दिली होती. त्यानें मुसलमानी निशाणाखालीं अरेबिया, सीरिया आणि मेसॅपोटेमिया यांना एकत्र आणलें. परंतु अशा महान् विभूतीच्या मृत्युसमयीं त्याच्याजवळ त्याचा घोडा, त्याचीं हत्यारें व त्याचा एक गुलाम एवढीच काय ती संपत्ति होती. या महान् पुरुषानें तारुण्यांत एकदां असे उद्‌गार काढले होते कीं, “ सीरियांतील सुंदर वस्तूंच्या अभिलाषानें अगर ऐहिक नश्वर सुखोपभोगांच्या लालसेनें मीं आपलें जीवन धर्मप्रसारार्थ वाहत नसून

त्या पुष्पसमर्पणानें अल्ला व पैगंबर हे संतुष्ट व्हावेत अशी माझी इच्छा आहे."

इजिप्तचा महापराक्रमी जेता ओम्राव हा केवळ युद्धचतुरच नव्हता, तर तो कविही होता. खलिफा उमर यास पाठविलेल्या त्याच्या एका प्रतिवृत्तांतील खालील उतारा वाचनीय आहे :

**अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञान—**

"शेती करणारे शेतकरी म्हणजे जणूं काय मुंग्याच होत. त्यांच्या ठायीं असलेला आळशीपणा एकाद्या धन्याच्या कोरड्यानें पळून जातो; परंतु त्यानें उत्पादन केलेलें धन श्रमजीवी आणि धनी यांचेमध्यें विषमतेनें वाटलें जातें." अर्थात् हा विचार फारच दूरवरचा होता. पूर्वींच्या संस्कृतींत सामाजिक समतेची कल्पनाच मुळीं अज्ञात होती. मग ते गुलाम असोत वा शूद्र असोत, श्रमजीवी म्हटला कीं त्याच्या वांट्याला तिरस्कार आणि पिळवणूक हीं असावयाचींच; तो मनुष्य-प्राणी म्हणूनही ओळखला जात नसे. अरब व्यापाऱ्यांचे हितांत ज्याचें बीज आढळून येतें असें खलिफाचें अर्थशास्त्रीय तत्त्व फारच महत्त्वाचें आहे. त्या योगानें पूर्वींच्या सामाजिक कल्पनांत क्रांति घडवून आणली. श्रमजीवी जनतेनें उत्पादन केलेल्या धनाचा कांहीं अंश त्या जनतेला दिला तर व्यापाराचे अभिवृद्धीस जोराची मदत होते. उमरच्या सूक्ष्म दृष्टीला दिसून आलेली दुःखकारक विषमता कमी करण्याचा प्रयत्न त्यानें फराव व टालेमी यांच्याकडून जिंकलेल्या प्रांतांची राज्यव्यवस्था करतांना केला. ग्रीक आणि रोमन लोकांनीं पिळून चिपाड बनविलेला इजिप्त अरब राजवटीखालीं हळू हळू भरभराटून पुष्ट बनूं लागला.

ऐन लष्करी स्वाऱ्यांच्या भरभराटींतही अरब सरदार निवळ विध्वंसक मारेकरी नव्हते हें सिद्ध करण्यास पुरेसे पुरावे सहज देतां येतील. शिवाय मोहिमेचा काळ फारच अल्प. उलट शिक्षण आणि

संस्कृति यांच्या उत्कर्षाचा काळच फार मोठा होता. महंमदाच्या मदिनेच्या विजयानंतर सुमारें शंभर वर्षेंच बगदादमध्यें अबासादिसच्या स्थापनेपर्यंत लष्करी युग होतें. त्यानंतर सर्व हालचाली विस्तृत अशा साम्राज्याच्या संरक्षणासाठींच होत्या.

### शांततेचीं सुखें—

कालांतरानें समृद्धि होतांच अरबांची लढाईची तीव्रता कमी झाली होती. त्यांना युद्धांतील लुटीपेक्षां व्यापार आणि उद्योग यांतच संपत्ति मिळवावी असें वाटूं लागलें होतें. शास्त्र व काव्य यांच्या क्षेत्रांत नामवंत होण्याची त्यांना इच्छा होऊं लागून त्यांचें मन रणबंध तोडूं लागलें होतें. सामाजिक व व्यक्तिगत जीवनाच्या उपभोगांतच त्यांना महंमदाच्या आणि अल्लाच्या भक्तीपेक्षां अधिक सौख्य अनुभवास येऊं लागलें होतें. युद्धाची उत्कटता कमी झाली होती आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे योगानें उत्पन्न झालेल्या शांत वातावरणाच्या आस्वादांत त्यांना आल्हाद वाटूं लागला होता. अबूबकर आणि उमर यांच्या ' उंच्या झेंड्या ' खालीं गोळा झालेल्या लोकांच्या वंशजांना व्यापार, आणि उद्योग हा लाभदायक व शास्त्र आणि तत्त्वज्ञान संतोषदायक वाटूं लागलें होतें.

' धर्मयुद्धाचे ' स्वरूपांत युरोपचें आक्रमण सुरू होईपर्यंत सुमारें तीनशें वर्षेंपर्यंत शांति, प्रगति आणि सुस्थिति यांचा अखंड लाभ अरबांना मिळाला. मात्र या धर्मयुद्धांमुळें पुन्हां त्यांचें तें लष्करी तेज चेतविल्यासारखें झालें होतें. मध्य आशियांतील रानटी मोगलांनीं अरबांचा पाडाव केल्यानंतर मग मुसलमानांच्या विजयाशीं लूटमार, क्रौर्य आणि दडपशाही निगडित झाली. दरबारी ऐषारामामुळें अरब संस्कृति आणि ज्ञान गढूळ झालें आणि इस्लामच्या क्रांतिकारक निशाणाचें पहिलें तेज कमी होतांच त्याचा तुर्क आणि तार्तरी या दुष्ट लोकांनीं दुरुपयोग केला.

### इस्लामचें शांति-कार्य—

इस्लाम म्हणजेच लष्करशाही असें म्हणणें हा इतिहासाचा केवळ विपर्यास आहे. महंमद हा अरब व्यापारांचा गुरु होय!— प्रवाशी अरब स्वारांचा नव्हे. त्यानें आपल्या धर्माला जें नांव दिलें तेंच मुळीं लष्करशाहीच्या कल्पनेच्या विरोधी आहे. व्युत्पत्ति-शास्त्रदृष्टचा इस्लाम म्हणजे शांतता–तह करणें. मूर्तीचें बंड मोडून अद्वैताच्या पुरस्कारानें देवाशीं एकरूप होणें म्हणजे इस्लाम-धर्मी बनणें होय. मूर्तीतील दैवी गुणांचा इन्कार आपण केला नाहीं तर आपली सर्व निष्ठा वांयाच जाते. अरब टोळ्यांचें ऐक्य करून जगांत शांतता प्रस्थापन करणें हें इस्लामचें ऐहिक शांतिकार्य होय. ऐहिक शांति ही निकडीची व अधिक महत्त्वाची होती. अरब व्यापाऱ्यांचे हितरक्षणासाठीं तिची आवश्यकता होती. व्यापाराची अभिवृद्धि शांततेच्या काळांतच अधिक होते. खिळखिळीं राज्यें व सडलेले धर्म यांतूनच युद्धें निर्माण होतात. त्यांच्या नाशाशिवाय शांति प्रस्थापित होत नाहीं. महंमदी धर्मानें अरबस्थानांत शांतता निर्माण केली व तिचा लाभ समरकंद ते स्पेन यांच्या दरम्यानच्या विस्तृत प्रदेशांतील लोकांना करून दिला.

### व्यापाराकडे ओढा—

उद्योग आणि शेती यांच्या सुधारणेमुळें, देशांतील आर्थिक जीवनांत चैतन्य निर्माण झालें. अरब व्यापाऱ्यांच्या हितसंबंधानुरोधा-नेंच इस्लामी राज्याच्या धोरणाचें सुकाणूं फिरूं लागलें. रोम व इतर प्राचीन संस्कृतिसंपन्न राष्ट्रें उत्पादक श्रमाकडे तुच्छतेनें पाहूं लागलीं होतीं. " न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः " हा वैदिक आदेश हिंदुस्थानांतील लोकही विसरून गेले होते. युद्ध आणि यज्ञ हे दोनच त्यांचे उदात्त धंदे होऊन बसले होते! अरबांची गोष्ट मात्र भिन्न होती. अरबांना वाळवंटांतल्या फिरत्या जीवनानें श्रम म्हणजेच

तम्य कळूं लागतें. अवलोकन आणि औत्सुक्य यांच्या योगानें वाटेल त्या गोष्टीवर अंधश्रद्धेनें विश्वास ठेवण्याची संवय मोडून जाते आणि चिकित्सक विचारांच्या विकासामुळें ज्ञानदेवीच्या मंदिरांत प्रवेश करण्यास हा मनुष्य अत्यंत पात्र होतो. तात्त्विक विचाराची संवय त्याला चांगली लागते. त्याची दृष्टि फक्त फायद्यावर असते. वस्तु कोणती का असेना आपण खरेदीविक्री करितों त्यांतून कांहीं निष्पन्न होतें कीं नाहीं एवढेंच तो पाहात असतो. वस्तूंच्या स्वाभाविक मूल्यापेक्षां त्यापासून फायदा किती होईल इकडेच त्याचें लक्ष असतें.

**तत्त्वज्ञानाची भूमिका—**

विविध व विचित्र गोष्टींकडे सहानुभूतीनें पाहणें, त्यांचा अर्थ समजावून घेणें, पूर्वग्रहापासून अलिप्त राहून त्या अवलोकन करणें, चिकित्सक दृष्टीनें तात्त्विक विचार करणें याच तर तत्त्वज्ञानाच्या मूळ आवश्यक गोष्टी आणि या गुणांचा समुच्चय व्यापार करण्याला आवश्यक असतो. दिव्य ज्ञान म्हणून अनेक लोकभ्रम मानणाऱ्या लोकांचे अनेक आचार आणि संस्कार पाहून किंवा पुष्कळ वेळां दुरभिमानानें मानलेल्या दुराग्रहांना चिरंतन सत्य म्हणतांना पाहून व्यापाऱ्याला हंसू येतें. आणि तो अंधश्रद्धेचा तिरस्कार करूं लागून सर्व वचनांच्या व आचारांच्या मुळाशीं असलेल्या सामान्य तत्त्वांना गौरवानें मानूं लागतो.

**चीन ते स्पेन—**

अरब साम्राज्याच्या एकछत्राखालीं आलेल्या सर्व देशांतून आंतरराष्ट्रीय व्यापाराचें, विचारांचें दळणवळण सुरू झालें होतें. सिथियन हल्ल्यांमुळें आणि बायझंटाइन साम्राज्याच्या घातुक आर्थिक धोरणामुळें चीनशीं व्यापार करण्याचे उत्तरेकडील मार्ग धोक्याचे

झाले होते. परंतु सीरिया, मेसॅपोटेमिया व इराण जिंकल्यावर त्यांनीं चिनी व्यापार तर हस्तगत केलाच. पण त्याचा प्रवाह स्वतःचे आफ्रिकेंतील प्रदेशांतून पश्चिम युरोपांतील बाजारपेठेकडेही वळविला. आठवें ते अकरावें शतक या काळांत एकीकडे चीन, हिंदुस्थान व दुसरीकडे यूरोप येथील बहुतेक सर्व व्यापार अरबांच्या हातांत होता. हिंदुस्थान आणि चीन ते मोरोक्को व स्पेन येथपर्यंत आपल्या उंटावर उंची माल घेऊन हजारों अरब प्रवासी हिंडत असत. त्यांचा कोठेंही तिरस्कार किंवा छळ होत नसे. ते राज्यकर्त्यांच्या वर्गांतले होते. म्हणूनच त्यांच्या संस्कृतीवर व तत्त्वज्ञानावर विचार, विकास आणि विश्वबंधुत्व यांचा ठसा उमटलेला असे. त्यांची शिकवण साम्राज्याच्या भरभराटीबरोबरच वृद्धिंगत होत होती. त्यांच्या शिकवणीला अंधश्रद्धेनें अंध केलें नव्हतें. लष्करी सरदारशाही आणि मत्सरी पुरोहित यांचें प्राबल्य असल्यानें मानवी तत्त्वज्ञान प्रामाण्यरूप गूढवादी बनतें. तत्त्वज्ञान–विश्वाच्या उत्पत्तिविकासाच्या बुद्धिग्राह्य स्पष्टीकरणाचा शोध व्यापारी युगांतच प्रथम निर्माण होतो. ग्रीकांच्या गांवराज्यांत म्हणूनच प्रथम तत्त्वज्ञानाचे बीजांकुर फुटूं लागलेले दिसतात.

इस्लाम म्हणजे इतिहासाचें फल व मानवप्रगतीचें एक साधन होय. नव्या सामाजिक संबंधांचे ध्येयरूपानें त्याचा उदय झाला आणि त्याच्या योगानें मानवी मनोविकासांत क्रांति करून टाकली. इस्लामधर्म जसा जुन्याचें स्थान बळकावून आला त्याप्रमाणें नव्या स्थितीमध्यें नव्या धन्याच्या अंगावर विकासाचें कार्य सोंपवून त्यासही जाणें प्राप्त झालें. सामाजिक क्रांतीचीं नवीं साधनें निर्माण करण्याला त्यानें मदत केली हें खरें. प्रायोगिक विज्ञानशास्त्र आणि विचारप्रधान तत्त्वज्ञान हींच तीं साधनें होत. या साधनांनीं नव्या सामाजिक क्रांतीची प्रगति घडविली. हीच इस्लाम धर्माची सर्वांत मोठी जमेची रक्कम.

**दहा शतकें व तीन खंडें —**

भांडवली उत्पादनाच्या योगानें युरोपांतील मध्ययुगीन रानटी गोंधळ नाहींसा केला. ख्रिश्चन देवकल्पना आणि कॅथॉलिक पंथाची मक्तेदारी यांच्याशीं लढून भांडवलदारी पद्धतीनें बुद्धिवादी प्रभावी शस्त्रांनीं जय मिळविला. या शस्त्राची परंपरा अशी: प्रथम हें ग्रीक ऋषींनीं वापरलें. पुढें अरबांनीं हें शस्त्र संरक्षिलें एवढेंच नव्हे तर अधिक उज्ज्वल आणि प्रभावी केलें. अरबांच्या हातून हा ठेवा आधुनिक संस्कृतीच्या संस्थापकांच्या हातीं आला. हें ऐतिहासिक युद्ध अरबांनीं धर्मछत्राखालीं उभें राहून सुरू केलें आणि सुमारें दहा शतकें तीन खंडांत चालल्यावर युरोपांतील अठराव्या शतकांतील भांडवलशाही क्रांतीनें तें जिंकलें.

प्रकरण तिसरें

# ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमि

मुसलमानी धर्म ( शांतिधर्म ) हा कांहीं महंमदानें निर्माण केला नाहीं. किंबहुना इतर कोणताही धर्म ज्या संस्थापकांनीं तो स्थापिला असें म्हणतात, त्यांनीं तो निर्माण केलेलाच नसतो. एकाद्या व्यक्तीस साक्षात्कार होऊन अभिनव धर्माचा उदय अकस्मात् झाला असें म्हणतात, हेंही पण सत्य नाहीं. इतर सर्व धर्मांप्रमाणें मुसलमानी धर्मही त्या काळच्या परिस्थितीचा परिपाकच होय; किंवा त्या परिस्थितीमुळेंच त्याचा विकास शक्य झाला.

**स्वातंत्र्याची लालसा—**

अरबस्थानच्या रहिवाश्यांनीं देशाच्या भौगोलिक परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या विशिष्ट जीवनपद्धतीमुळेंच आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें होतें. नाहीं तर त्यांचें वसतिस्थान म्हणजे मोठमोठ्या जयिष्णु राष्ट्रांची भयावह पाऊलवाटच होती. त्या वाटेनेंच असिरीया, इराण, मॅसिडोनिया व रोम येथील सैन्यें आपल्या लष्करी हालचाली करीत असत. परंतु स्वातंत्र्याची अदम्य लालसा व प्रवासी जीवन यांचा परिणाम होऊनच कीं काय अरब लोकांच्या टोळ्या-टोळ्यांमधून अंतःकलह अविरतपणें चालू असत. बाकीच्या जगाला पूर्णपणें पारखें असल्यामुळें कोणाही परस्थास ते शत्रू समजत असत. देशाच्या दारिद्र्यामुळें तर ही वृत्ति अधिकच बळावली होती. या दोन गोष्टीच सर्व अरबी कायदे व नीतिमत्ता यांच्या मुळाशीं आहेत. त्यांचा विश्वास असा कीं, बहिष्कृत इस्लामच्या वंशांत दुर्दैवानें आपला जन्म झाला असल्यामुळें आपल्या वांट्याला

हें भयंकर वाळवंट आलें आहे; व आपल्या इतर बंधूंना समृद्ध व सुपीक जमिनीचा वारसा मिळाला आहे. म्हणून ज्या वारसा-संपत्तीस आपणास मुकावें लागलें आहे, ती बळेंच मिळविण्यास कांहींच हरकत नाहीं, अशीही प्रवृत्ति त्यांच्यामध्यें होती.

### व्यापाराचीं सूक्तासूक्त साधनें—

महंमदाच्या आधीं सहा शतकें होऊन गेलेल्या इतिहासकारासही अरब लोक लुटालूट व व्यापार हे दोन फायदेशीर धंदे करतांना आढळून आले. त्यांचा मूळचा धंदा मेंढ्या व घोडे पाळणें हाच होय. सामाजिक उत्क्रांतींच्या प्रथमावस्थेंत वरील दोन धंद्यांत फारच अल्प भेद असे. व्यापारी स्वस्त किंमतींत माल खरेदी करतो व अधिकांत अधिक किंमत देईल त्यास तो त्याची विक्री करतो. खरेदीची किंमत जितकी कमी तितका नफा अधिक. अर्थात् व्यापाराचें हें मूल तत्त्व मान्य केलें कीं अधिकांत अधिक नफा मिळविण्यासाठीं जरूर तसें वागण्याचा व्यापाऱ्यांचा हक्क अगदीं सरळच कायदेशीर होतो. स्पर्धेमुळें त्याला किंमती कमी ठेवाव्या लागतात. म्हणून स्पर्धा नाहींशी करण्याचा उपाय म्हणून त्या कालांत तो आपल्या प्रतिस्पर्ध्यास लुबाडतो. त्यामुळें बलिष्ठ असेल त्याला सर्व मालमत्ता प्राप्त होते. शिवाय दळणवळणाच्या मार्गांवर व बाजार-पेठांवर आपली संपूर्ण सत्ता चालविण्या-टिकविण्यासही हाच मार्ग परिणामकारक असतो.

### लढाऊ मनोवृत्ति—

ह्या मार्गाचा अवलंब प्रारंभींच्या काळांत सर्वत्र होत असे, असें आधुनिक व्यापाऱ्यास सांगितलें तर तो स्तिमितच होईल. " प्रामाणिकपणा हेंच उत्तम धोरण " या न्यायानुसार आधुनिक व्यापारी आपला धंदा सात्त्विकपणें चालवीत असतो. पण त्याची स्थापना वर लिहि-

लेल्या मार्गानेंच त्याच्या पूर्वजांनीं केली आहे. शिवाय लूटमारीनें लढाऊ मनोवृत्ति बळावते हाही फायदाच नव्हे का? कारण मनुष्याच्या रानटी अवस्थेंत ह्याच गुणाचें महत्त्व असतें. नैसर्गिक कारणांनीं दरोडेखोरी करावी लागल्यामुळेंच अरबांमध्यें व्यापार व युद्ध या प्रवृत्तीचा चांगलाच विकास झाला. महंमदापूर्वीं १७०० लढाया अरबांनीं जिंकल्याचा उल्लेख 'अयाम–अल्–अरब' या पुस्तकांत आहे. हें पुस्तक अरब साम्राज्याच्या ऐन भरभराटीच्या काळांत लिहिलेलें आहे. अर्थात् लढाऊ गुणाचा वारसा इस्लामी धर्मापासून त्यांना मिळाला हें खरें नव्हे! आपली तरवार 'देवकार्यासाठीं' उपयोग करण्यापूर्वींच ते मोठे योद्धे होते. लष्करी महत्कृत्याचें श्रेय देशाच्या, अर्थात् साम्राज्याच्या, परिस्थितीलाच आहे, धार्मिक शिकवणीस नव्हे.

**यादवीचे लाभालाभ—**

महंमदापूर्वींचीं युद्धें हीं यादवीच्या स्वरूपाचीं युद्धें असत. त्यांचें स्वरूपही भयंकर असे. परंतु तीं सर्व युद्धाच्या नीतिनियमांनीं चालत. युद्धांतील रक्तसिंचनामुळें अरबस्थान कांहीं सुपीक झाला नाहीं. परंतु त्याचा उपयोग अरबांना आर्थिक दृष्टया लाभकारी अशा व्यापारधंद्यास प्रवृत्त करण्याचे कामीं मात्र झाला. आर्थिक दृष्टया आवश्यक झाल्यामुळें युद्धाची घातुक प्रवृत्ति सोडून अधिक लाभकारी मार्गाकडे वळणें अरबांना भाग पडलें. या आवश्यकतेंतून साहजिकच उदय पावलेली कल्पना म्हणजे "महंमदाचा धर्म" होय.

या ओसाड व उजाड मैदानाच्या तिन्ही बाजूंस सुफल आणि बहुजनयुक्त असे तीन प्रदेश आहेत. हे तीन प्रदेश तीन प्राचीन संस्कृतींचीं केंद्रें होत; आणि या तिन्हीही प्रदेशांत अनंत कालापासून व्यापार व शेती यांची भरभराटच होत आली होती. विशेष हें कीं

हिंदुस्थान, इराण, सीरिया, पॅलेस्टाइन या प्रदेशांशीं ज्या मार्गांनीं व्यापार होत असे, त्याच मार्गांशीं अरबांचे हितसंबंध निगडित झाले होते. आफ्रिका आणि आशिया यांच्यांतील प्रारंभींच्या खुष्कीच्या व समुद्रावरील व्यापारी वाटा अरबस्थानच्या उत्तर व दक्षिण भागांतून होत्या. अज्ञात वाळवंट चुकविणें एवढाच त्यांतील हेतु. परंतु जुलुमी बायझंटाइनच्या अतिरिक्त करवाढीमुळें व स्थानिक अधिकारी वर्गाकडून होणारी पिळवणूक टाळण्यासाठीं व्यापारी वर्गानें अरबस्थानच्या आतिथ्यपूर्ण अंतर्भागांत प्रवेश केला.

लुटालुटीनंतर—

आरंभीं आरंभीं अरबांच्या लुटीलाही कांहीं विशिष्ट नियम व नीति होती. परंतु हळुहळू त्यांच्या हें ध्यानीं आलें कीं, लुटालूट करण्यापेक्षां व्यापार अधिक फायदेशीर होईल. कोरेश या टोळीनें सर्वांत आधीं आपला धंदा बदलला. तांबड्या समुद्राच्या कांठीं त्यांची वसाहत होती, पुढें अबिसिनियाच्या व्यापाराची मालकी त्यांनीं लवकरच संपादिली. परंतु त्याच्यापूर्वींच आशियाची व्यापारी वाहतूक त्यांच्याकडे आली होती. ख्रिस्ती शतकाच्या आरंभींच्या कांहीं शतकांत कोरेश टोळ्यांची राजधानी मक्का म्हणजे सर्व दक्षिणोत्तर व्यापार मार्गांचें केंद्रस्थान ही होती. अरेबियन समुद्रावरील यामेन बंदरांत कोरेशांचे काफले हिंदी वस्तूंचा पुरवठा करून घेत असत, हल्लींच्या एडनच्या आसपास त्यांचे उंट अफ्रिकेंतील प्रसिद्ध अबिसिनियाच्या संपत्तीनें अधिक भारावून जात. दमास्कसच्या बाजारपेठेंत धान्य व इतर निर्मित वस्तू आणि अत्तरें, मोतीं, हिरे व हस्तिदंत यांची देवाण घेवाण होत असे. या फायदेशीर देवाणघेवाणीमुळें सर्वत्र समृद्धि झाली. पूर्व पश्चिम व्यापार सुरू होतांच ही समृद्धि अमर्याद झाली व कोरेशच्या टोळ्यांच्या महत्त्वाकांक्षाही अधिकाधिक वाढूं लागल्या.

### कोरेश टोळीचें माहात्म्य—

परंतु इतर टोळ्यांना कोरेश टोळ्यांचें स्वातंत्र्य व समृद्धि यांचा हेवा वाटूं लागला. त्या असा अभिमान वाहूं लागल्या कीं, आपण जुन्या नीतीचे व कायद्याचे संरक्षक. त्यांच्यामध्यें देवतांच्या संरक्षणाच्या निमित्तानें युद्धास व अंतःकलहास सुरुवात झाली. पूर्वीची लुटालूट व यादवी, शत्रूशीं–तिऱ्हाइतांशीं झगडण्यांत वेळ वेंचत असे त्या वेळीं ठीक होती, परंतु तीमुळें आतां राष्ट्रीय व्यापाराचे पाय तोडल्यासारखें होऊं लागलें होतें. ज्याच्या हातीं आर्थिक सत्ता होती त्यांचें–कोरेश टोळीचें–राष्ट्रीय व राजकीय विकासासाठीं सर्व झगडा थांबवून ऐक्य घडवून आणणें क्रमप्राप्त असें कर्तव्यच झालें. कोरेश ह्या टोळीला अर्थातच ऐतिहासिक माहात्म्य प्राप्त झालें.

अखंड यादवी चालू असतांही सर्व अरबांच्या टोळ्या मक्केजवळील काबाच्या देवळांतच आपलें भजनपूजन करीत असत. राष्ट्रीय धर्मपीठाचा ताबा कोरेश टोळीच्या हातीं होता. धर्मपीठाच्या अधिकारी वर्गाचें काम 'हशेम' कुटुंबाकडे होतें. देशांतील जनता या कुटुंबाकडे आदरानें आणि मानानें पाहात असे आणि व्यापारामुळें समृद्धि तर मिळाली होतीच. म्हणून अनेक देवांचें अस्तित्व झिडकारून एक देव मानण्याची ऐक्याची उद्घोषणा करणारे फतवे वरील कुटुंबियांनीं काढले.

### अद्वैत तत्त्वाचें स्वागत—

अंतःकलहानें विस्कळित झालेल्या जनतेची अंतरींची भूक महंमदाच्या कडव्या अद्वैतानें तर भागविलीच, परंतु शेजारच्या राष्ट्रांतूनही—जेथें सनातनीयांचा छळ असह्य झाला होता—या ऐक्याच्या हाकेस 'ओ' मिळाली. मॅगींचा गूढवाद, ज्यूंचा पुराणाभिमान आणि ख्रिश्चनांचा दुरभिमान यामुळें इराण, मेसॅपोटेमिया, सीरिया, इजिप्त, पॅलेस्टाईन येथील लोकांचें धार्मिक जीवन अगदीं गुंतागुंतीचें होऊन

गेलें होतें. कडक धार्मिक विधी आणि आचार यांनीं धर्माचें स्थान बळकाविलें होतें. ढोंगी
समारंभांनीं भक्तीची हकालपट्टी केली होती. शब्दप्रामाण्यानें निष्ठेचा छळ चालविला होता देवदूत, संत आणि त्यांचे शिष्यगण यांच्या मेळाव्यांत ईश्वर अदृश्य बनला होता. म्हणूनच अद्वैताची घोषणा करणाऱ्या नवीन सहिष्णु धर्माचें दलित व त्रस्त अशा बहुसंख्य जनतेनें स्वागत केलें. बौद्धिक दिवाळखोरी, आध्यात्मिक गोंधळ व सामाजिक अव्यवस्था आणि धकाधकी यांच्या काळांत सामान्य जनतेला हव्या असलेल्या ऋजु निष्ठेचा आधार मिळाला. म्हणूनच या खवळलेल्या समुद्रांत जनतेचें तारू सुखानें आपला मार्ग काढूं लागलें.

**दलितांचा आधार—**

अद्वैताची भूक अरब-वैश्य वर्गासच लागली होती. शेजारच्या संस्कृती सडून नष्टप्राय होण्याच्या वेळेस हा वर्ग युद्ध आणि दुष्ट समजुती या घातुक गोष्टींपासून अलिप्त होता व आर्थिक दृष्टचा तो समृद्धही झाला होता. एकच एक परमेश्वर आहे या विचारसरणीच्या प्रसारानें लष्करी अधिराज्याचा पाया घातला; आणि त्या अधिराज्याच्या सर्व क्रियांचें एकीकरण करण्यांत आलें. या एकीकरणामुळें नवीन सामाजिक घडी निर्माण झाली. या संस्कृतीचें मंदिर जुन्या संस्कृतीच्या अवशेषावर भव्य व उत्तुंग असें उभें राहिलें. धार्मिक छळानें त्रस्त झालेल्या अनेकांना हा आश्रय आकर्षक वाटला असल्यास नवल तें काय? इस्लामी धर्माच्या संरक्षणाखालीं जे जे आले त्या सर्वांना सदसद्विवेक बुद्धीचें संपूर्ण वातंत्र्य मिळालें; किंबहुना त्रस्त व दलित यांच्या आश्रयासाठीं या नवधर्माचा अवतार झाला असेंच सर्वांस वाटलें.

**ख्रिश्चन लोकांना आसरा—**

सर्वसंग्राहकत्व, विश्वकुटुंबत्व, लोकशाहीप्रधान धोरण आणि

अद्वैतनिष्ठा या सर्व गोष्टी भौगोलिक परिस्थितीमुळेंच निर्माण झाल्या असें म्हणावयास हरकत नाहीं. भोंवतीं दडपशाही किंवा परचक्रानें त्रस्त देश असूनही अरबस्थानानें आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें होतें. ईजिप्त व इराण यांतील छळ सहन करणारे लोक, किंबहुना ख्रिश्चन प्रांतांतील लोकही आपणांस हवे असलेले विचार व आचार यांचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं अरबस्थानच्या आश्रयास येत. इराणनें असीरिआचें साम्राज्य जिकलें त्या वेळीं किंवा बॅबिलोनियाचा धर्म मॅगीनें नष्ट केला त्या वेळीं सॅबिअन भिक्षु खगोलशास्त्राचें ज्ञान घेऊन अरबस्थानच्या आश्रयास येऊन राहिले. पुष्कळ ज्यू लोकही असीरिआच्या हल्ल्याच्या वेळीं येथें येऊन राहिलेच होते. जॉन बॅप्टिस्टसह सर्व हिब्रू अवतारी पुरुषांचा निवास अरबस्थानच्या अंतर्गत भागांतच होता. असीरिआवरील अन्यायाचा सूड अलेक्झँडरच्या स्वारीनें घेतला आणि झोरोआस्टरचे कट्टे शिष्यही अरबस्थानच्या स्वतंत्र वातावरणांतच राहूं लागले. तेथें त्यांचें व बॅबिलोनिअनांचें सख्य घडलें.

**सर्व धर्मांचें सार--**

पौर्वात्य गूढवादी पंथांतून निर्माण झालेले ज्ञानवाद, सदसदेकरूपवाद, ग्रीक आणि ख्रिश्चन तत्त्वज्ञान या सर्वांचा सारखा विकास अरबस्थानच्या स्वतंत्र वातावरणांत होत होता. नेस्टोरिअन, जॅकोबाइट आणि युटिशिन पंथाप्रमाणेंच कॅथॉलिक सनातनीही अरबांचें आतिथ्य चाखण्यास त्यांचेच 'पांतीकर' झाले. मूर्तिपूजेच्या जंजाळापेक्षां अरब तत्त्वज्ञानांतील साधेपणाचा परिणाम होऊनच असें घडलें असें म्हणावयास हरकत नाहीं. 'परदेशी' होण्याचें स्वातंत्र्य लाभल्यामुळें या निकट आलेल्या भिन्न पंथांना आपणांमध्यें सामान्य गोष्टी कोणत्या आहेत, हें पाहतां आलें. सहिष्णुतेच्या प्रशांत वातावरणांत त्यांच्या मतांतील गोंधळ निमाला, जुलुमानें बाटविण्याचा दुराग्रह शमला आणि आपापलीं धर्मतत्त्वें या पाहुण्यांनीं एकमेकांना सांगितल्या-

मुळें अरबांना सनातन धर्मांतील सर्वश्रेष्ठ तत्त्वांचें सारच मिळालें. अवताररूपानें प्रतीत होणारा व चराचर विश्व व दिव्य शक्ति यांहून प्रभावी अशा एका परम ईश्वरावरील श्रद्धा हाच तो वारसानिधी होय. हेंच इस्लामचें सार. याच आधारावर नवधर्माची ध्वजा फडकवण्यासाठीं महंमदाचा अवतार. अरबांच्या अध्यात्मबुद्धीचें हेंच सार होय. इस्लामचें सार महंमदाच्या बुद्धीनें शोधून काढलें नाहीं किंवा त्याचा त्याला साक्षात्कारही झाला नाहीं, तर तें इतिहासाचा वारसा म्हणून अरबांना प्राप्त झालें होतें. या संपत्तीचें महत्त्व ओळखून त्याची जाणीव आपल्या देशबांधवांना करून देण्यांतच महंमदाचें माहात्म्य आहे.

**मक्का–पंथापंथांचा संगम—**

एकमेव व सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या कल्पनेचा लाभ अरबांनीं मिळविला होता; परंतु संवयीमुळें अनेक देवतांची उपासना ते करीत असत. पूर्वीच्या धर्माचा मिळालेला दायभाग फलदायी होण्यासाठीं रूढ उपासनामार्ग सोडणें आणि त्यासाठीं अगदीं जोराचा प्रयत्न होणें अवश्य होतें; आणि या प्रयत्नाच्या हल्ल्याला अत्यंत सुरक्षित ठाणें मक्का हें होतें. विशिष्टांनाच स्वातंत्र्य आणि टोळ्यांमधील यादवी यांमध्यें मक्केला तडजोड घडवून आणण्यांत आली. सर्व बाजाराची उतारपेठ मक्का होती. अनेक प्रांत असलेल्या राष्ट्राचे आर्थिक हितसंबंध एकच असले म्हणजे आध्यात्मिक एकरूपता निर्माण होते. तिचें साक्षात् दर्शन मक्केंत घडत होतें. दूरच्या भागांतील सर्व टोळ्या मक्केला व्यापारासाठीं येत, त्या वेळीं काबा येथें येऊन मशिदींत प्रार्थना करून त्या जात. तेथें प्रत्येक टोळीचें निशाण असे. माणसांच्या, गरुडांच्या, सिंहादिकांच्या मूर्ति व सुमारें तीनशें साठांहून अधिक इतकीं चित्रें तेथें होतीं. कोरेश टोळीनें मक्केच्या व्यापाराची मालकी आपणाकडे मिळविली होती व हशेम या कुटुंबानें मशिदीचा

तावा मिळविला होता. अशा स्थितींत आर्थिक उन्नतीचीं पावलें पुढें पडतील अशा नवीन उदयिष्णु धर्माचें सार, राष्ट्रांतील मुख्य घटकांच्या बुद्धीनें आकलन करावें हें अगदीं सहज आहे; आणि म्हणूनच हशेम कुटुंबांतील लोक नवीन धर्माचा आदेश लोकांना देऊं लागले.

### क्रांतीची धुरा—

एकदां का हशेम आणि कोरेश नवीन धर्माचे अनुयायी बनले कीं सर्व राष्ट्र तात्काल त्या धर्माचें अनुयायी बनलें असतें. सर्व टोळयांनीं मक्केस येणें आवश्यक होतें. ज्यांच्या हातीं मक्केचा व्यापार होता त्यांना नवीन धर्माचा आदेश देणें सुलभ होतें. परंतु पूर्वग्रह आणि मत्सर यांमुळें कोरेश लोक आपल्या बांधवांच्या छळास उद्युक्त झाले. त्यांना वाटलें कीं मक्केचा व्यापार आफ्रिकेकडे वळेल आणि काबाचें सामुदायिक उपासना–मंदिर नाहींसेंच होईल. परंतु क्रांतीची धुरा वाहण्याचें एकाचें कर्तव्य चुकलें तर दुसरा तें पुढारीपण घेण्यास तयार असतोच. मदिनेमध्यें महंमदाच्या कार्यास जोराचा पाठिंबा मिळाला व ऐक्याच्या आवाहनास राष्ट्रानें तात्काल ओ दिली. कोरेशांनीं चालविलेल्या संस्कृति संरक्षण करण्याच्या धोरणास विटून त्यांच्यापैकींच पुष्कळ कुटुंबें क्रांतिकार्यास मिळालीं. लवकरच कोरेश शरण आले आणि त्याच वेळीं त्यांना "धर्मसंरक्षकाचा दंड" मिळाला.

### आर्थिक बहिष्काराचा हेतु—

महंमदानें मक्का ताब्यांत घेतांच असा दंडक केला कीं, कोठल्याही काफिरास पाकस्तानच्या देशांत पायच टाकूं दिला जाणार नाहीं. आर्थिक बहिष्काराचा कडक रीत्या अवलंब करून सर्व जनतेस नवीन धर्म पाळणें त्यानें भाग पाडलें. काबामधून सर्व मूर्तींचें उच्चाटन करण्यांत आलें व तेथें महंमदाच्या देवाची स्थापना करण्यांत आली.

नवधर्माच्या झेंड्याखालीं सर्व राष्ट्र गोळा झालें. भूमिका आधींच तयार करून ठेविली होती. नवीन धर्माची तत्त्वप्रणाली उपदेशिण्यापूर्वीच जनमानस–मंदिरांत ती अधिष्ठित झाली होती. आर्थिक हितसंबंधामुळें अशा नवधर्माची स्थापना अवश्यच होती.

प्रकरण चौथें

# विजयाची कारणपरंपरा

ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवर इस्लाम धर्माचें चित्र सहिष्णुत्वाचेंच असावें असें दिसतें. परंतु अशुद्ध अंध दृष्टीच्या लोकांकडून इस्लाम धर्माची सांगड धर्मवेडाशींच घालण्यांत येते आणि यामध्यें कांहीं विरोधाभास नाहीं. इस्लाम धर्माचें आधारभूत तत्त्व अद्वैत आहे; आणि तें आहे म्हणजेच इस्लाम धर्म हा सहिष्णु आहे. सर्व चराचर विश्व, त्यांतील दोष आणि दुर्गुण, सर्व गुणावगुणांसह—अखिल मानव्य, एकाच परमेश्वराची 'सृष्टि' आहे, असें मानणें इस्लामानुयायांचें कर्तव्य आहे. या उदात्त तत्त्वावर विश्वास ठेवणारा कोणताही मनुष्य निसर्गाच्या दोषाबद्दल हळहळेल आणि मनुष्याच्या विचित्रपणाबद्दल त्याला उपहासही वाटेल. परंतु त्याच्या श्रद्धेनुरूप त्याला हे दोष आणि दुर्गुण ही एकाद्या अन्य दुर्दैवाची निर्मिति आहे असें मानतां येणार नाहीं; व देवाविरुद्ध त्याला बंडही करतां येणार नाहीं. जे अन्य देवतांची उपासना करतात ते वाट चुकलेले वाटसरू आहेत असें त्याला मानावें लागतें. ते मोक्षाला लायक होईपर्यंत त्यांना सहिष्णुत्वानें वागवून योग्य मार्गावर आणावयाचें तर एकाच पित्याचीं तीं सारीं लेंकरें आहेत असें इस्लामच्या अनुयायांस समजावें लागतें.

**कुराण कीं समशेर?—**

कुराण किंवा तलवार या दोन्हींपैकीं एकाची निवड करावयास लावणाऱ्या महंमदाच्या अनुयायांनीं जी भयंकर दृष्टि ठेविली होती तीमुळें इस्लामच्या अभ्युदयाचा इतिहास काळवंडून गेला आहे आणि निवडी-

साठीं असलेली तिसरी गोष्ट त्या अंधारांत दडून गेली आहे. बहुजनसमाज त्या तिसऱ्या गोष्टीचीच निवड करीत असे. त्या गोष्टींत इस्लामचें मर्म बीज सांठविलें आहे. वस्तुतः निवडीसाठीं ज्या दोन गोष्टी लोकांपुढें मांडण्यांत येत त्या अगदीं भिन्न होत्या. कुराणाचा स्वीकार करा किंवा अरब जेत्यांना मान द्या. या त्या दोन गोष्टी होत. ‘दिव्य तरवार’ फक्त कोणत्याच गोष्टीची निवड न केली तरच, परजली जात असे. एरव्हीं ती नेहमीं म्यान असे. ज्या आर्थिक हितसंबंधांतून एकेश्वराची कल्पना निघाली त्या आर्थिक संबंधामुळेंच अरब लोक अकारण रक्तपातास तयार नसत. ज्या प्रदेशांतून व्यापाराचे मार्ग असत, ते प्रदेश जिंकून एकछत्री राज्याखालीं आणणें अवश्य होतें. हा हेतु सफल तेव्हांच होतो कीं, जेव्हां जित लोक नवीन धर्माचा स्वीकार करतात; कारण धर्माच्या आधारानें नवीन एकछत्री राज्य भक्कम पायावर उभारल्यासारखें होतें. उत्पादन आणि विभाजन हे व्यापाराचे मुख्याधार होत. म्हणून कारागीर व शेतकरी यांची, त्यांनीं कुराणाचा स्वीकार केला नाहीं म्हणून, कत्तल करणें सुसंगत नव्हतें. तसें करण्यानें मोठमोठ्या समृद्ध शहराच्या बाजारपेठा नाहींशा होतात. नवीन धर्म स्वीकारणाऱ्यावर संपूर्ण ताबा असणेंच फक्त अवश्य होतें. महंमदाच्या अनुयायांचे राज्यांत काफीर लोकांना आपल्या श्रद्धेप्रमाणें अन्य व भिन्न देवतांची उपासना करतां येत असे.

**सहिष्णुतेचा दाखला—**

“जेरुसलेम ज्या वेळीं ओमर खलीफाच्या स्वाधीन करण्यांत आलें, त्या वेळीं तेथील रहिवाश्यांना यत्किंचितूही त्रास देण्यांत आला नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांची मालमत्ता त्यांच्या स्वाधीनच होती व त्यांच्या उपासनेंत कसलाही व्यत्यय आला नाहीं. ख्रिस्ती लोक, त्यांचे धर्मगुरु व त्यांचे कुलपती यांसाठीं त्या शहरांत स्वतंत्र विभाग राखून ठेवण्यांत आला होता; आणि या संरक्षणासाठीं सर्व ख्रिस्ती जात फक्त

दोन सोन्याचीं नाणीं प्रतिवर्षी देत असे. पाकस्तानची यात्रा लोकांना उत्तेजन देऊन करविली जात असे. त्यामुळें व्यापाराच्या वृद्धीस उपयोग होतो हें मुसलमान जेत्यांनीं ओळखलें, हें तर त्यांच्या मुत्सद्देगिरीचें लक्षण आहे. धर्मयुद्धांच्या शेवटीं ज्या वेळीं जेरुसलेम परत देण्यांत आलें त्या वेळीं तेथील 'पौर्वात्य' ख्रिस्ती लोकांना अरब खलिफांच्या सहिष्णु राज्याची अत्यंत आठवण होत असे."

—रोमन साम्राज्याचा उदयास्त : गिबन.

आतां हें चित्र पहा—

ख्रिश्चन लोकांनीं शहरांत प्रवेश मिळविल्यानंतर याच्या उलट काय केलें त्याचा खालील वृत्तांत विशेष उद्बोधक वाटेल. "खाजगी अगर सार्वजनिक मालमत्तेच्या लुटालुटींत आरंभीं जो जें मिळवील त्याचा तो मालक हाच दंडक पाळला जाई. वेड्या ख्रिस्ती भक्तांनीं आपल्या देवाला रक्ताचा अभिषेक केला. विरोधानें त्यांचा क्रोधाग्नि भडकतच असे. स्त्रिया आणि सज्जन यांनाही तो शांत करतां येत नसे. पुढेंमागें न पाहतां तीन दिवस त्यांनीं कत्तल चालविली होती. सत्तर हजार महंमदानुयायी यांची कत्तल करून व किती तरी ज्यू लोकांना स्वस्थानीं अग्निकाष्ठें चारूनही, अनेक लोक त्यांच्या बंदींत होते. तेही मारण्याचा निव्वळ कंटाळा आला होता म्हणूनच वाचण्याइतके दुर्दैवी होते."

—रोमन साम्राज्याचा उदयास्त : गिबन.

जुने व नवे, मुसलमान व युरोपियन अशा अधिकारी इतिहासकारांच्या पुराव्याची छाननी करून गिबननें असें सिद्ध केलें आहे कीं, महंमदानें आपल्या ख्रिश्चन प्रजाजनांना व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच व्यापार व मालमत्ता यांचेंही स्वातंत्र्य दिलें होतें. उपासनेचें तर स्वातंत्र्य होतेंच होतें. सहिष्णु असण्याचें लाभदायी धोरण महंमद व त्याचे एक दोन वंशज यांनीं

पाळलें असें नसून अरबांचें वर्चस्व होतें, तोंपर्यंत अखंड पाळलें जात होतें. इस्लामचें कार्य संपल्यावर व रानटी तार्तरांचें वर्चस्व सुरू झाल्यावरच या धोरणाचा त्याग करण्यांत आला. तुर्की सुलतानांच्या अमलाचे वेळींही हें धोरण पूर्णपणें सोडून देण्यांत आलें नव्हतें.

**बुद्धिवादाचा विकास—**

वैभवाच्या काळांतील या धोरणानें व विचारस्वातंत्र्यामुळें बुद्धिवादाचा विकास झाला. किंबहुना कट्टर सनातनी यामुळेंच या नव्या कल्पनांना अधार्मिक व काफिरी असें संबोधूं लागले. आरंभींचे कांहीं खलिफा नुसते नव्या शास्त्रांचा अभ्यास करून स्वतंत्र विचार करीत असत एवढेंच नव्हे तर मोटॅसेनसारखे कांहींजण कुराणच्या अपौरुषेयत्वावरही विश्वास ठेवीत नसत.

दलित ज्यू व ख्रिश्चन यांना व इतर नवविचारपंथीयांना अरबांचें साम्राज्य शरण्यच होऊन बसलें होतें. अरब साम्राज्याचें दृढीकरण झाल्यानंतर ख्रिश्चन कॅथॉलिक लोकांनाही या सहिष्णुत्वाचा फायदा मिळाला. या गोष्टीला अनेक ख्रिश्चन इतिहासकारांचाही आधार आहेच. उदाहरणार्थ रेनौडॉट हा इतिहासकार लिहितो : "इजिप्तमधील मुसलमान मॅजिस्ट्रेट हे धर्मगुरु, कुलपति, धर्माधिकारी वगैरे लोकांचे हक्क दर्जा, व अंतर्गत कारभाराचें वातंत्र्य पूर्णपणें रक्षण करीत असत. त्याचपैकीं कांहीं ख्रिश्चन कार्यवाह अगर वैद्य होत असत. कांहींजण जमिनीच्या उत्पन्नावर श्रीमंत झाले आणि कित्येकांना शहर अगर प्रांताधिकारी बनवून त्यांचा गुणगौरव केला जात असे." एका खलिफानें इराणचें राज्ययंत्र चालविण्यास ख्रिश्चन लोक विश्वासार्ह आहेत असें उद्घोषित केलें होतें. प्रॉटेस्टंट सुधारकांचे आद्य प्रवर्तक पालिशिअन यांना उपासनेचें स्वातंत्र्यच होतें एवढेंच नव्हे तर कॅथॉलिक

पंथाचा अधःपात थांबवून ख्रिश्चन धर्माला पूर्वपद मिळवून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत खलिफांची सक्रिय मदत होत असे.

### सहिष्णुतेचीं उदाहरणें—

सत् आणि असत् हीं दोन्ही तत्त्वें सनातन आहेत हें झोरॉआॅस्टर पंथाचें घातक तत्त्व एकेश्वरी पंथीयांना अगदींच चुकीचें वाटे. परंतु त्या पंथीयांसही अरब लोक सहिष्णुतेनें वागवीत असत. हेजीराच्या तिसऱ्या शतकापर्यंत साधीं मुसलमानी प्रार्थनामंदिरें वैभवसंपन्न अग्नि-मंदिरासमोर विनयानें उभीं होतीं. या वैभवाचा विध्वंस इस्लामच्या निर्घृण तरवारीनें केला नाहीं तर त्यांचा विनाश अवश्यंभावी होता. त्या पंथाचे भक्तगण तो पंथ, वठलेल्या वृक्षाप्रमाणें सोडून जात होते. तैग्रिस ते ऑक्सस याच्यामधील प्रदेशांतील पर्शियनांनीं आपल्या रूढी व धर्म यांचा त्याग अत्यंत जलद केला. कितीही दडपशाही व छळ झाला तरी सर्व राष्ट्रच्या राष्ट्र आपल्या सनातन धर्माचा त्याग इतका अल्प विरोध दाखवून करणारच नाहीं. परंतु जुना धर्म अवनत झाला होता, सुसंस्कृत जनतेची आध्यात्मिक भूक भागविण्यास असमर्थ होता, खरीमननें अग्नि आणि सूर्य या देवांस ग्रासून टाकलें होतें. दुष्ट तत्त्वाच्या जाचांतून सोडवणूक व्हावी व होईल म्हणूनच महंमदाचे अद्वैताचें साधें तत्त्व त्यांनीं स्वीकारलें.

### मोडकळीस आलेला ख्रिश्चन धर्म—

आफ्रिकेच्या उत्तरेस अलेक्झँड्रिया ते कार्थेज या प्रदेशांतच फक्त इस्लाम धर्माच्या उदयानें ख्रिश्चन धर्म पूर्णपणें नष्टमात्र झाला होता. तेथेंही या सर्वभक्षक धर्मक्रांतीचें खरें कारण नवधर्मानें केलेली सक्ति हें नसून जुन्या धर्माची अवनति व त्यामुळें उत्पन्न झालेली अगतिकता व निराशा हेंच होय. सिप्रिअन, अथेन्सिअस व अगस्टाईन यांच्या शक्ति-युक्तीनें स्थापिलेला जीजसचा धर्म एरिअन डोनॅटिस्टांच्या दुष्ट

चालींनी व कॅथॉलिक पंथीयांनीं विपरीत केला. म्हणूनच दरिद्री जनतेनें त्याचेविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. त्या वेळीं आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेले देश अगदीं दरिद्री होऊन गेले होते. त्यानंतरच व्हेंडाल व मूर लोकांच्या हल्ल्यांनीं आधींच दीन झालेले देश अधिक उजाड करून टाकले. त्यामुळें सर्व जनतेची आध्यात्मिक व आधिभौतिक दुर्दशा झाली व संन्यासधर्माचा आश्रय करून स्वतःचें भ्रामक समाधान करून घेण्यास त्यांनीं सुरुवात केली. सामाजिक गोंधळाच्या व आध्यात्मिक नैराश्याच्या त्या तमोमय काळांत अरबस्थानांतील अवतारी पुरुषाचा आशादायक व तेजस्वी संदेश प्रदीप्तपणें चमकला व आशेची दिव्य ज्योतीच जणूं त्या संदेशानें प्रदीप्त केली. नवीन धर्मानें मिळणाऱ्या भौतिक व पारलौकिक सुखाशेनें हजारों लोकांचीं मनें आकृष्ट झालीं. भौतिक जीवनांत पराभूत झाल्यामुळें निराश होऊन ज्यांनीं अतिमानुषाच्या अस्तित्वावर विश्वासून आपणास रूढीच्या खड्ड्यांत बुडवून घेतलें होतें, त्यांना इस्लामी धर्माच्या जयशाली तुतारीनें जागें केलें. नैसर्गिक जीवनाचा मनमुराद उपभोग घेण्याची संधि मिळाल्यामुळें अवनत ख्रिस्ती धर्मानें प्रसृत केलेल्या संन्यासवादाच्या विकृत कल्पना पार नाहींशा झाल्या. आशेचें नवें क्षितिजच सामान्य जनतेला दिसलें. या आघातामुळें प्रत्येकाला आपल्या सामर्थ्याची व धैर्याची पराकाष्ठा करून पाहण्यास संधि मिळाली. इस्लामच्या स्फूर्तिदायित्वामुळें अरबांच्या सुराज्यांतच उत्तर आफ्रिकेंतील सुपीक जमीन व उद्योगी जनता सुफल व संपन्न झाली.

**अवनतीचें स्वरूप—**

अरबस्थानची प्रगति निव्वळ तरवारीच्या जोरावर झाली असें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. तरवारीनें धर्माचें नाममात्र रूप पालटेल परंतु जनतेची सदसद्विवेक बुद्धि कांहीं पालटत नाहीं. महंमदी धर्माचें तर्कशास्त्र विचारणीय होतें. परंतु त्याच्या प्रसारापूर्वी आशिया

व आफ्रिका खंडाच्या जीवनाचे प्रश्न अधिक गंभीर झाले होते. जित राष्ट्रांतील सामाजिक दुःस्थितिच राजकीय उलथापालथीच्या मुळाशीं होती. त्यांच्या परंपरागत धर्माचें महत्त्व पुष्कळ काळ आधींच संपलें होतें. धर्माचें स्थान पुराणांनीं घेतलें होतें. उघड गोष्टींचा उकाला करणें ज्यांना अवघड वाटतें, त्यांना गूढ गोष्टी कशा आकलन होणार? परंतु त्या गूढ तत्त्वावरच मनुष्याचे बंधमोक्ष अवलंबून असतात हें शिकविण्यांत आलें होतें. व्यक्तीच्या गुणावगुणांचा कांहीं उपयोग होत नाहीं हें त्यांच्या प्रत्ययास येत होतें. पापाचें माप दुष्कृत्यावर अवलंबून नसे, तर नास्तिकपणाचे प्रमाणांत पापाचा लहानथोरपणा गणला जात असे. बिशप लोक, खून, विषप्रयोग, व्यभिचार, दंगेधोपे करतांना नेहमींच आढळत. बुद्धिस्वातंत्र्याच्या बाजूनें बोलण्याचे वेळीं कुलपती व ग्रामपती यांचा आवाज तोंडाबाहेर फुटेल तर शपथ! वैताग व औदासीन्य याशिवाय याचा दुसरा काय परिणाम घडणार? ज्या पद्धतींत हृदयाकडे दुर्लक्ष होतें ती पद्धति कोणाच्या हृदयांत ठाव घेऊं शकेल?

**समतेची घोषणा—**

अशा पडझडीचे वेळीं व सर्वत्र अराजकता माजली असतांना 'देव एकच आहे' असा ध्वनि सर्व जगांत उठतांच सर्वत्र शांतता व्हावी यांत नवल तें काय? सर्व आशिया व यूरोप या धर्माच्या छत्राखालीं आला. चांगल्या काळांत देशभक्ति ही धर्माहून हीन आहे असें शिकविलें जातें; त्या वेळीं ती तर नष्टप्राय झाली होती. महंमदानें शिकविलेल्या समतेच्या तत्त्वाचा उगम फिरत्या आयुष्याच्या पारंपारिक स्वातंत्र्यांत आहे. लुटालुटीच्या धंद्यांत सर्वांनीं समान साहस प्रगट केलें होतें. याच सामान्य लुटालुटीच्या धंद्याला विजयाचें सामान्य स्वरूप आल्यावरही कोणा अरबास आपला घोडा किंवा तरवार यांचें तेज इतर कोणाही अरबाच्या घोड्यापेक्षां अगर

तरवारीपेक्षां तेजस्वी अगर तीव्र आहे असें वाटत नसे. आपण आपल्या देशाचे सेसॉस्त्री, सिरस्, अलेक्झँडर आणि डॅरिअस् पाम्पे, अशिरवान्, टॉलमी आणि ट्रजन यांच्या सैनिकांपासून संरक्षण करण्याचे कामीं कोणीही अरबांइतकाच भाग घेतला आहे असा अभिमान वाटे. एकाद्या करमणुकीच्या खेळांतही आपण इतर कोणाइतकेही प्रवीण असूं शकतों असें त्यांस वाटत असे. परंतु इस्लामनें समतेची उद्घोषणा करतांच इतर लोकांवर अत्यंत आश्चर्य-कारक परिणाम घडून आला. अरब-विजयाचें श्रेय तरवारीच्या धारेस जेवढें आहे, निदान तेवढेंच श्रेय इस्लामच्या या समतेच्या घोषणेस द्यावें लागेल. या घोषणेनें रोम, बायझंटाइन, इराणी व हिंदी साम्राज्याच्या वर्गयुक्त समाजरचनेंत असलेले कायदे किती भयंकर जाचक असतात हें विरोधाभासानें निदर्शनास आणलें. अधोगामी संस्कृतीच्या जुन्या प्रदेशांतून समता आणि स्वातंत्र्य यांचें तत्त्व व महत्त्व पायदळीं तुडविलें जात होतें; उलट इस्लामी संस्कृति तें संरक्षिण्यासाठीं होती.

**ख्रिश्चन धर्माची विकृति—**

जुन्या संस्कृतीचा अभिमानास्पद असा आध्यात्मिक वारसा अरबांना मिळाला होता. तेव्हां जुन्या अवशेषाच्या भाराखालीं चिरडल्या जाणाऱ्या मोठ्या दुर्दैवी समाजाबरोबरच त्या संपत्तीचा उपभोग घेणें हें त्यांचें कार्य होतें. त्या वेळची परिस्थिति इस्लामच्या अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल होती. जुन्या संस्कृतींतील सत्ताधीश वर्गाच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक ऱ्हासाच्या वेळींच इस्लामचा उदय झाला. सामाजिक अवनतावस्थेबद्दल असमाधान, कुजट मनोवृत्ति आणि जुलूम यामुळें बहुजन समाजांत नवी चांगली समाजघटना निर्माण व्हावी अशी तीव्र आकांक्षा व धडपड निर्माण झाली होती. ख्रिश्चन धर्मानें जुन्या संस्कृतीचा आश्रय केल्यामुळें " आहे तें टिकवून धरावें " या वृत्तीची कैफियत त्याला मांडावी लागे. येशू ख्रिस्तानें रोमन वर्चस्वाविरुद्ध क्रांति

करण्यास शिकविलें आहे. हे धर्माधिकारी विसरून गेले होते. उलट रोमन लोकांना मान द्या असें सांगणारा दुर्बल अजापुत्रच अशा तऱ्हेनें ते येशू ख्रिस्ताचें जीवनचित्र रंगवून दाखवीत होते. त्यांनीं त्यामुळें ख्रिश्चन धर्माची पार्श्वभूमि—ज्यू लोकांचा इतिहास—विकृत करून टाकिली होती. वरिष्ठ वर्गाशीं तडजोड केल्यामुळें नव्या युगाला योग्य अशा नव्या समाजरचनेचा पाया घालण्याचें कर्तव्य ख्रिश्चन धर्म करूं शकला नाहीं. विश्वविजयाच्या स्वारीचें नेतृत्व तो स्वीकारूं शकला नाहीं. दलितांना त्यानें मदतही केली नाहीं. उलट भावी कालांत सर्व सुखसमृद्धि येणार आहे अशी जनतेची फसवणूक केली. स्वर्गाचें द्वार दुर्बलांसाठींच उघडें राहील याचा अर्थ असा कीं, सत्ताधीश वर्गाचें वर्चस्व व जुलूम इहलोकीं जे मान्य करतील त्यांनाच फक्त स्वर्गांत (मेल्यावर) प्रवेश मिळावयाचा !

ख्रिश्चन धर्माचे बांध फुटल्यामुळें नवीन प्रभावी धर्माची आवश्यकता इतिहासाच्या क्षेत्रांत भासूं लागली होती. इस्लामी धर्मानें नुसत्या पारलौकिक स्वर्गप्राप्तीची लालूच दाखविली नाहीं, तर भौतिक विश्वावर विजय मिळविण्याची स्फूर्ति देखील दिली. महंमदानें आपल्या लोकांनाच राष्ट्रीय ऐक्याचें व्यासपीठ निर्माण करून दिलें असें नाहीं, तर आपल्या अरब बांधवांच्या हातीं अभिनव क्रांतीचा दीप दिला आणि त्याच्या दिव्य प्रकाशांत शेजारच्या सर्व देशांतील दलित व अकिंचन जनता एकत्र गोळा झाली.

इस्लामधर्माच्या विजयाचीं कारणें सामाजिक, आध्यात्मिक व राजकीयही आहेत. गिबनचें या बाबतींतील मत असें आहे :

"झोरॉआस्टरपेक्षां अधिक पवित्र पद्धति व ज्यू लोकांचेपेक्षां अधिक उदार कायदे यामुळें महंमदाचा धर्म इतर गूढ विचारांवर आरूढ असलेल्या धर्मांपेक्षां अधिक तर्कसुसंगत वाटतो. विशेषतः सातव्या शतकामध्यें रूढीमुळें 'शुभवर्तमान' अत्यंत विकृत झालें होतें."

—रोमन साम्राज्याचा ऱ्हास व नाश.

**स्वामित्वाचें स्वागत—**

आणखी एका इतिहासकाराची साक्ष याच बाजूनें आहे. तो म्हणतो : "इस्लाम धर्माचा ध्वज पुढें पुढें चालला त्याचें कारण त्यांतील स्वातंत्र्य व समता हीं तत्त्वें हेंच होय. अरबांनीं जे ख्रिश्चन प्रदेश जिंकले तेथें गमतीची गोष्ट ही कीं, अरबांची प्रगति झाली आहे या भावनेनेंच सामान्य बहुजन मुसलमान धर्माकडे आदरानें पाहात असत. ख्रिश्चन सरकारांना हें लांच्छनास्पद आहे कीं त्यांची बहुतेक ठिकाणची राज्यव्यवस्था जुलुमी होती. सीरियाच्या रहिवाश्यांनीं महंमदानुयायांचें स्वागतच केलें. इजिप्तच्या लोकांनीं आपला देश अरबांच्या हातीं जावा असे प्रयत्न केले; आफ्रिकेंतील स्वारींत बर्बरांनीं मदत केली. कॉन्स्टँटिनोपलच्या सरकारच्या विद्वेषामुळें या सर्व राष्ट्रांना आपले देश अरबी सत्तेच्या स्वाधीन व्हावेत असें वाटलें. सरदारांनीं केलेला विश्वासघात आणि सामान्य जनतेचें औदासिन्य यांमुळेंच स्पेन आणि दक्षिण फरान्स यांची आहुति अरबांना मिळाली."

प्रकरण पांचवें

# महंमद व त्याचें तत्त्वज्ञान

" मानव वंशावर सर्वांत अधिक परिणाम करणाऱ्यामध्यें महंमद-इस्लामधर्माचा संस्थापक—हा प्रमुख आहे. "

—ड्रेपर : यूरोपच्या बौद्धिक विकासाचा इतिहास.

दिव्य साक्षात्कार झाला असें तो म्हणेतोंपर्यंत महंमदापाशीं विशेष कांहीं नव्हतें. इतर सर्व धर्मावतारांना साक्षात्कार झाला हें जितकें संशयास्पद किंवा काल्पनिक असतें, त्याहून महंमदाला साक्षात्कार झाला हें कांहीं वेगळें नव्हतें. ख्रिस्ती दुरभिमानी लोक महंमदाला तोतया म्हणत असत. पण तोतया ही संज्ञा मोझेस आणि जीझस या दोघांनाही मिळाली होतीच ! 'तीन तोतये' या नांवाच्या एका पुस्तकानें मध्ययुगाचे अखेरीस युरोपभर खळबळ उडवून दिली होती. या ग्रंथाच्या कर्तृत्वाचा मान ख्रिश्चन अधिराजा फ्रेडरिक किंवा मुसलमान तत्त्ववेत्ता ॲव्हेरोज यांना देतात.

**साक्षात्काराची उपपत्ति—**

दिव्य साक्षात्काराची कल्पना सामान्य जनतेंत सत्यकथा म्हणून रूढ होण्यास जे लोक कारणीभूत झाले त्यांच्या भूमिकेहून भिन्न अशी कोणतीच भूमिका 'तोतया महंमदानें' घेतली नव्हती. राष्ट्रीय ऐक्य घडावें अशी कल्पना त्याला आली. ती सफल होण्यास आपल्याला अतिमानुष दैवी पाठिंबा आहे हें जनतेस कळणें जरूर आहे हें त्यानें पाहिलें. जुन्या अज्ञानी विचारांची पक्कड ज्यांचेवर आहे अशांना दुसऱ्या कोठल्याही युक्तिवादानें एकादी गोष्ट पटवून देणें शक्य नसतें. गौण देवांच्या इच्छाशक्तीला परमेश्वरी

सत्ताच आपल्या काबूंत ठेवूं शकते. जुन्या देवांचा राग झाला तर नव्या देवांची ' दिव्य दयाच ' आपलें संरक्षण करूं शकते. एकाच परमेश्वराच्या सत्तेवरील विश्वासानेंच टोळ्यांच्या व गौण देवाच्या जुलुमाचें जूं झुगारून देतां येणें शक्य होतें. आणि म्हणूनच एकच देव नसला तर तो असणें–शोधणें अवश्य होतें. महंमदाच्या विचाराची साखळी ही अशी होती. यांत तोतयेगिरी कांहींच नव्हती.

महंमदानंतर सुमारें एक हजार वर्षांनीं बुद्धिवादी व्होल्टेअरनें हीच विचारपद्धति मांडली नव्हती का ? परंतु व्होल्टेअरनें ही विचारपद्धति प्रतिक्रांतीच्या समर्थनार्थ मांडली होती. सरंजामी राज्यपद्धतीचें संरक्षण एका देवाच्या शोधानेंच होणें शक्य होतें. म्हणूनच व्होल्टेअरनें या राज्यपद्धतीचा पुरस्कार केला. परंतु महंमदाच्या वेळीं सदर तत्त्वपद्धतीच्या पुरस्कारानें क्रांतीचीं पाउलें पुढें पडलीं. अतिमानुषावर ज्या वेळीं जनतेचा विश्वास असतो त्या वेळीं प्रत्येक अभिनव कल्पना तिच्याशीं जुळती आहे, असें दाखविलें तरच जनतेचा तिला पाठिंबा मिळतो. शिवाय या कल्पनेच्या शोधाचा जनक महंमद नव्हेच. मागील प्रकरणांत सांगितलेल्या सामाजिक स्थितीमुळेंच या कल्पनेचा विकास झाला होता. महंमदाचें कार्य त्या कल्पनेच्या सिद्ध्यर्थ पुरावा पाहणें एवढेंच होतें; आणि जनतेची खात्री करावयाची तर त्यांना हवा तोच पुरावा पुढें केला पाहिजे.

**ईश्वराचें दर्शन—**

महंमदाच्या शोधाच्या मुळाशीं व्होल्टेअरप्रमाणें निराशा नव्हती. उत्साहानें उत्स्फूर्त झालेल्या अज्ञ माणसांचा तो प्रामाणिक प्रयत्न होता. अरब राष्ट्राच्या या मुक्तिदात्यानें देव शोधण्यासाठीं एकांतांत ध्यान, उपवास व प्रार्थना या आजही चालू असलेल्या नित्याच्या गोष्टी सुरू केल्या व त्यांचा परिणामही नित्याप्रमाणेंच झाला. त्याला साक्षात्कार झाला, ईश्वरानें साकार दर्शन दिलें आणि गूढ ध्वनींनीं

" तूंच अवतार आहेस " असें सांगितलें. या ध्वनींत वृक्षपाषाणादिकांनीं आपला ध्वनि मिसळून दिला. ध्यान, धारणा या मार्गांचा अवलंब करणाऱ्यांच्या मेंदूवर कांहीं परिणाम घडून असे अनुभव नेहमीं येतात. कोठल्याही विचित्र व काल्पनिक वस्तूवर आपलें मन इतर सर्व गोष्टींचा विचार सोडून, एकाग्र केलें तर त्यांना मूर्त स्वरूप येतें. सर्व साक्षात्कारी लोकांच्या मनाचा अभ्यास केला तर 'अंतःस्फूर्ति' अगर 'धार्मिक अनुभव' म्हणून जें कांहीं होतें तें सर्व म्हणजे ध्यानधारणा इत्यादिकांच्या अभ्यासानें उत्पन्न झालेली विशिष्ट मनोवस्था होय.

**पत्नीनें प्रचीति पटविली—**

महंमदाची मनश्चर्याही त्याच्यापूर्वी आणि त्याच्यानंतर झालेल्या साक्षात्कारी लोकांसारखी होती. परंतु त्याच्या बाबतींत एक विशेष गोष्ट आहे. प्रत्येकाच्या अनुभवाला येणाऱ्या 'मनोवस्थेनें भुलून जाऊन आपणास आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग सांपडला असें न मानण्याइतका तो चतुर होता. त्याला आपण वेडे होत आहों कीं काय अशीही भीति वाटूं लागली होती. अगदीं ऐन वेळीं त्याच्या हुषार बायकोनें वेळींच मदत केली नसती तर त्यानें आपला प्रयत्न मध्येंच सोडूनही दिला असता. आपल्या पतीच्या आध्यात्मिक अनुभवाचें महत्त्व ओळखून त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असें खदिजानें ( महंमदाच्या बायकोनें ) ठरविलें. ती मोठी श्रीमंत व्यापारी होती. तिनें त्याचें मन वळविलें व असा विश्वास उत्पन्न केला कीं, त्याला जें कांहीं दिसे तें ईश्वरी साक्षात्कारच होय. त्याच्या मनाच्या सूचकतेचा फायदा घेऊन तिनें त्याच्या खोलींत देवदूत दर्शन देण्यास येत आहेत असें त्यास विश्वासपूर्वक वाटावयास लावलें. अर्थात् हें नाटक अज्ञानी लोकभ्रम व पूर्वग्रह यांच्या पार्श्वभूमीवरच घडणें शक्य आहे. मुख्य पात्रें आपलें काम भ्रमानें—

तन्मयतेनें करीत असतात. सर्व धर्मांचा उगमही असाच आहे. इस्लामचा धर्म त्याला अपवाद होता असें मानण्याचें कारण नाहीं. "तो दुसऱ्या एका विचारदृष्टीनें अपवाद होता. ईश्वराचा दंड आपल्या पाठीशीं आहे एवढ्या एका गोष्टीशिवाय त्यांत प्रामाण्य कशाचेंच नव्हतें. आधिदैविक विचारांची गुंतागुंतही त्यांत फारशी नव्हती. उलट त्यांत राजकीय दृष्टि, प्रागतिक–सामाजिक तत्त्वें व व्यक्तिगत आचारांचे आदर्श नियमच अधिक होते, निरर्थक आधिदैविक विषयांच्या चर्चा त्यांत नसत. आपल्या बांधवांची सामाजिक स्थिति कशी उन्नत होईल याच गोष्टीकडे त्यांचें लक्ष होतें. म्हणूनच स्वच्छता, शांतपणा, उपवास व प्रार्थना या बाबतींत त्यानें पुष्कळच नियमितपणा आणला होता. भिक्षा वाढणें आणि दानधर्म करणें हें त्याला विशेष बहुमोलाचें वाटत असे. कोठल्याही धर्माचा सदाचारी मनुष्य मुक्त होतो, हें त्यानें अत्यंत उदारपणें मान्य केलें होतें. ही उदारता इतर कोणाजवळही त्या वेळीं नव्हती."

—ड्रेपर.

**ईश्वरी कल्पनेची मीमांसा—**

महंमदाचें शिक्षण विशेष झालेलें नसल्यामुळें कुराणामध्यें बुद्धीची चमक कोठें दिसत नाहीं. सामान्य कल्पना आणि विचित्र तर्क यांनीं तें भरलें आहे. महान् धर्माचा स्फूर्तिप्रद मूलाधार हाच त्याचा एक मोठा गुण आहे. तो या वरच्या सहज दिसणाऱ्या दोषांना झांकून टाकतो. महंमदाचा धर्म अगदीं पूर्णपणें एकेश्वरी होता. म्हणूनच त्यांत तडजोडीची भाषा बिलकूल नाहीं; आणि त्यामुळेंच त्याला धर्माचें उच्च स्वरूप प्राप्त झालें. तत्त्वज्ञानाचे दृष्टीनें ईश्वराची कल्पना हीच सर्व धर्मांचा आधार होय. ही कल्पना विश्वाची उत्पत्ति शून्यांतून (असतांतून) झाली असें मानल्याशिवाय तर्क पूर्ण होऊंच शकत नाहीं. हिंदुस्थानमधील व ग्रीसमधील तत्त्ववेत्त्यांच्या बुद्धिवादानें ही विचित्र

कल्पना वर्णन केली होती. म्हणूनच हे बुद्धिवादी धर्म ईश्वराची कल्पना निःसंशय सिद्ध करूं शकत नसत आणि म्हणूनच ख्रिश्चन, ज्यू व हिंदुधर्म या सर्वांचा शेवट विश्व व परमेश्वर अभिन्न आहेत या विचारसरणीवर होत असे. म्हणजेच धर्माचा मूलाधार असा ईश्वर सर्वशक्तिमान् व विश्वाहून भिन्न आहे असें मानणें हाच सिद्धांत नाहींसा झाल्यामुळें धर्मच कोलमडून पडत असे. कारण ईश्वर म्हणजेच दृश्य निसर्गात्मक विश्व असें मानणें हें ईश्वरी कल्पनेची मुळांत शंका घेण्यासारखें आहे. कारण त्यामुळें विश्वाचा उत्पादक कोणी आहे असें म्हणतां येत नाहीं. म्हणून परमेश्वराच्या कल्पनेचाही त्याग करावा लागतो. जर जगाचें स्वतःसिद्ध सनातन अस्तित्व मानलें तर मग विश्वाचा उत्पत्तिकर्ता मानावयाचें कांहींच कारण नाहीं आणि हें कार्य ज्याचें नाहीं असा परमेश्वर म्हणजे निरवश्यक गृहीत गोष्ट होते.

महंमदाचा धर्म हा पेंच सोडवितो. प्राथमिक अवस्थेंतील बुद्धिवादापासून परमेश्वरी कल्पना दूर करून विश्वाची उत्पत्ति शून्यांतून झाली असें तो धर्म मानतो. सर्व सामर्थ्यसंपन्न व विजयसंपन्न असा परमेश्वर याच धर्मांत दिसतो. हें विश्वच नव्हे तर अशा अनंत विश्वांची परंपरा निर्मिण्याची शक्ति असणें हेंच परमेश्वर सर्वशक्तिमान् असल्याचें गमक. अशा तऱ्हेनें ईश्वरी कल्पना प्राथमिक प्रमाणपद्धतीनें का होईना स्थापित केली हाच महंमदाचा विशेष होय. आणि म्हणूनच अत्यंत श्रेष्ठ व पवित्र धर्माचा संस्थापक म्हणून तो इतिहासांत गणला जातो. इस्लामी धर्म हा बुद्धिवादी नाहीं म्हणूनच त्यानें इतर धर्मांवर संपूर्ण विजय मिळविला. इतर धर्मांत आध्यामिक सूक्ष्मता, आधिदैविक सिद्धांत व इतर चांगल्या गोष्टी असूनही ते धर्म पूर्णपणें धर्म या पदवीस योग्य नव्हते. ते 'धर्मस्वरूप' होते.

### एकेश्वरवादाचें कार्य—

एकेश्वरवाद हा अत्यंत उलथापालथ करणारा सिद्धांत आहे.

स्वतः धर्माचें अगदीं उच्च स्वरूप असूनही तो धार्मिक विचारसरणीच्या मुळाशीं घाव घालतो. परमेश्वराचें अधिष्ठान विश्वातीत आणि विश्वाबाहेरचें मानून परमेश्वर आवश्यकच नाहीं हा सिद्धान्त तो स्थापन करतो. धार्मिक विचारसरणीच्या ग्रंथांतील इस्लामधर्म हें शेवटचें पृष्ठ असल्यामुळें मानवेतिहासावरील धर्मप्राधान्याचा येथेंच शेवट झाला. त्यांतील सहज गुणामुळें जुन्या मीमांसापद्धतीचा त्यानें त्याग करून आधुनिक बुद्धिवादाचा त्यांत पाया घातल्याचें दिसून येतें. "एकेश्वरी कल्पनेच्या कार्याची तुलना मोठ्या सरोवराशीं करतां येईल. त्या सरोवरांत शास्त्राच्या प्रगतीचा पूर येतो आणि शेवटीं बंधारा फुटून जातो. अद्वैत मानणाऱ्या तीन धर्मांपैकीं इस्लामधर्म हाच भौतिक वादाला अधिक अनुकूल आहे. अरब संस्कृतीच्या विकासाबरोबरच नव्या स्वतंत्र तत्त्वज्ञानाचा विकास करणारा हा धर्म सर्व धर्मांत अगदीं तरुणच होय. त्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव मध्ययुगीन ज्यू लोकांवर व अप्रत्यक्षपणें पाश्चात्य ख्रिस्ती लोकांवर झाला."

—एफ्. ए. लँग : भौतिक वादाचा विकास, भाग १ पृष्ठ १७४ व १७७.

**अवतार कीं देवदूत ?—**

या धर्मांत अद्वैताचें पूर्ण स्वरूप दृग्गोचर होत असल्यामुळें इस्लामला अभिनव तत्त्वांच्या विकासाचें कार्य करतां आलें. कुराणांतील विचित्र गोष्टी क्रांतिकारक विचारसरणीच्या आड आल्या नाहींत. महंमदाचा कडवा अद्वैतवाद महंमद देवावतार आहे या कल्पनेला विरोधी होत असे. मोझेस, जीझस् वगैरेंना कुराणांत देवदूत मानलें होतें. परंतु महंमद देवदूत नाहीं अशी जाहीर रीतीनें नसलें तरी त्याचे जवळचे लोकच गुप्त रीतीनें शंका घेत असत. धर्मसंस्थापक ईश्वरी गुणाचा असावा असें धोरण कुराणाचें नव्हतें. याही धोरणाच्या मुळाशीं कडवें अद्वैतच होतें. महंमदाच्या मृत्यूनंतर ताबडतोब या बाबतींत त्याच्या अनुयायांत

मतभेद झाले. सीरियाच्या स्वारीवर निघालेल्या सैन्यांत महंमदाच्या मृत्यूची बातमी पोहोंचली त्या वेळीं ओमरला तें खरें वाटेना व ती बातमी सांगणाराला तो मारावयाला सज्ज झाला होता. हें पाहून अबूबकर त्याला म्हणाला, "अरे तूं महंमदाचा उपासक कीं महंमदाच्या ईश्वराचा ? महंमदाचा ईश्वर अमर आहे. महंमद आपल्या सारखाच मर्त्य होता आणि इतर मर्त्यांप्रमाणेंच तो हें जड शरीर सोडून गेला आहे." महंमदानंतर त्याची गादी ज्याला मिळाली, तो महंमदाला देवदूत म्हणाला; अवतार नव्हे.

### विचाराला वाव—

महंमदाला देवदूत असें संबोधिल्यामुळें त्याचा दर्जा इतर धर्मभिक्षू अगर धर्माचार ठरविणारा इतकाच झाला. अवतार हा ईश्वरी अंश नाहीं असें म्हटलें कीं एकेश्वरी कल्पना चांगल्याच तऱ्हेनें सिद्ध होते. आणि एकदां का ईश्वरी अंश आहे असें मानलें कीं, तो परम ईश्वराचे सर्व गुण धारण करणारा बनतो. मग अद्वैताची कल्पना अगर मूळ तत्त्वाचा ऐनजिनसीपणा सिद्ध करतां येत नाहीं आणि हा विरोधाभास दूर करण्यासाठीं कांहीं पोकळ धर्मप्रामाण्यें मांडावीं लागतात. धर्माचें साधें स्वरूप धर्मप्रामाण्य किंवा गूढवाद यामध्यें लोपून जातें. धार्मिक बाबतींत असलेला कडवेपणा नसता तर इस्लामी धर्माला आपलें ऐतिहासिक कार्य करतांच आलें नसतें. अवताराचें ईश्वरीपण हिरावून घेतलें कीं, धर्मग्रंथांचें प्रामाण्यही डळमळतें व मग श्रद्धावंताच्या विचाराला वाव मिळतो. मानवी तत्त्वज्ञानाला सनातन सत्याचें वैभव असत नाहीं आणि धर्मग्रंथांतील नियमांना सनातनत्वाचा मानही मिळत नाहीं.

### बौद्धिक विकासाचीं बीजें

बाराव्या शतकापर्यंत इस्लामधर्माचे सुसूत्र असे प्रमाणभूत सिद्धांत

नव्हतेच. एक देवावर विश्वास ठेवून विविध तऱ्हेचे आध्यात्मिक अनुभव घेण्यास पुष्कळच सवड असे. हें जें स्वातंत्र्य होतें त्याचा उपयोग अरब तत्त्वज्ञानी लोक पुरेपूर करून घेत असत. ख्रिश्चन धर्मांतील ' त्रयी ' चें तत्त्व खोडून काढण्यासाठीं परमेश्वराच्या उदात्त कल्पनेचा मानवी बुद्धीला जितका सूक्ष्म विकास करणें शक्य आहे तितका विकास त्यांनीं केला.

—रेनन अॅट अॅव्हेरोज अॅव्हेरो–इझम पृ. ७६.

त्यांची एकेश्वराची तत्त्वप्रणाली अगदीं स्वतंत्र व पौराणिक गोष्टीपासून अलिप्त असल्यामुळेंच मुसलमान तत्त्वज्ञांना ही अद्वितीय गोष्ट करता आली.

—लँग : भौतिकवादाचा इतिहास.

लँग यांनीं असेंही म्हटलें आहे कीं, महंमदानें स्थापन केलेल्या स्थूल धर्माच्या ठायी सूक्ष्म विकासाचीं बीजें होतीं. एकेश्वरवादामुळें धार्मिक विचाराच्या अतीत जाऊन निवळ आध्यात्मिक विचारपद्धतींत या धर्माचीं तत्त्वें विलीन झालीं. येथेंच श्रद्धेचें युग संपलें. ग्रीक तत्त्वज्ञान अरब लोकांना कळण्यापूर्वींच मुसलमानी धर्मामध्यें पुष्कळ पंथभेद झाले होते. कित्येक पंथांमध्यें परमेश्वरासंबंधीं इतका सूक्ष्म विचार झाला होता कीं, त्यापुढें त्या बाबतींत विचार होणेंच अशक्य होतें; आणि इतर धर्मीयांना जें समजूं शकत नसे त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

आबासादीसच्या संरक्षणाखालीं चाललेल्या बसऱ्याच्या शाळेंत धर्म व श्रद्धा यांची सांगड घालणारा पंथ निघाला होता. प्रारंभींच्या ५।६ शतकांत आकाशांतील व त्यापलीकडील वस्तुजातांचा विचार करणारे तत्त्वज्ञानी नव्हते. त्यांनीं कुराण बाजूस ठेवलें व इतर अधार्मिक पुस्तकांचा अभ्यास करणें हेंच अधिक महत्त्वाचें असें ते समजत

असत. कित्येक क्रांतिकारक विचारवंतांनीं बुद्धीच्या वेदीवर श्रद्धा आणि धर्म यांचा होमच केला. बगदाद, कैरो, कोरोडोव्ह येथें ज्यांची सत्ता होती अशा धर्मसंरक्षकांनींही अंतःस्फूर्तीपेक्षां प्रत्यक्ष ज्ञानाचीच महती वाढविली. बोखाराच्या स्वतंत्र साम्राज्यांतही पुरोहितांपेक्षां कवींचा, शहाण्यांचा मान अधिक, धर्मविचारांच्या धन्वंतरीपेक्षां हकीम वगैरेंचेंच स्थान महान् होतें आणि धर्मप्रचारापेक्षां शास्त्रीय शोधांनाच अधिक महत्त्व मिळत असे.

इस्लामच्या विजयानें निर्माण झालेल्या केवळ, सामाजिक परिस्थितींतच या बौद्धिक विकासाचीं बीजें नव्हतीं. महंमदाच्या धर्मसिद्धांतांतूनही याची उपपत्ति लागते. कुराणांतील कांहीं मजेच्या गोष्टी अगर त्याचा साधेपणा पाहून इस्लामच्या ऐतिहासिक कार्याची किंमत कमी मानण्याचें कारण नाहीं.

प्रकरण सहावें

# इस्लामी तत्त्वज्ञान

अरबी विद्यांच्या विकासाचा काळ ५०० वर्षें होता. हा काळ यूरोपच्या इतिहासांतील अगदीं कृष्णयुगच होतें. याच काळांत ब्राह्मणवर्चस्वाच्या प्रतिक्रियेमुळें हिंदुस्थान अगदीं स्वस्थ होता. बुद्ध-धर्म विकृत होऊन गेला होता. बुद्ध–क्रांति थोपविल्यामुळेंच मुसलमान हल्ल्याला हिंदुस्थान बळी पडला.

आबासादी, फातिमा आणि ओमिएद यांच्या राज्यांत विद्या आणि संस्कृति यांची अनुक्रमें आशिया, उत्तर आफ्रिका व स्पेन यांमध्यें अत्यंत जोराची प्रगति झाली. समरकंद–बुखारापासून ते फेज–कोरडोवापर्यंत अनेक विद्वान् खगोलशास्त्र, गणित, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वैद्यक आणि संगीत यांचा अभ्यास करीत असत. ख्रिस्ती धर्माच्या असहिष्णु व भ्रममूलक धोरणामुळें ग्रीक तत्त्वज्ञान व विद्या यांचा लोप झाला होता. अरबांचा उदय झाला नसता तर कदाचित् मनुष्य जात त्या ठेव्याला कायमची मुकली असती.

### अज्ञानाचा निरास—

निरर्थक धार्मिकता व ढोंगी पावित्र्य यांमुळें ख्रिस्ती धर्मानें जुन्या शास्त्राची प्रगति कुंठित केली. या अज्ञानी दुरभिमानाचा परिणाम म्हणजे युरोपांतील लोक अगाध व अनंत अज्ञानांधकारांत बुडण्याची भीति होती. परंतु सुदैवानें ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनानें अज्ञान, लोक-भ्रम, दुराग्रह यांचा नाश केला व यूरोपमधील लोकांना ऐहिक वैभव, बौद्धिक प्रगति व आध्यात्मिक मुक्ति यांचा मार्ग दाखविला. आधुनिक बुद्धिवादाच्या पुरस्कर्त्यांना अरब तत्त्वज्ञान्यांकडून व शास्त्रज्ञांकडूनच

ग्रीक विद्यांचा वारसा मिळाला. आधुनिक शास्त्रसंशोधनाचा आद्य पुरस्कर्ता सर रॉजर बेकन हा अरबांचा शिष्य होता.

ह्यूम बोल्टच्या मतें अरब लोकच नव्या भौतिक शास्त्राचे संस्थापक होत. त्यांनीं प्रयोग आणि गणना या दोन मोठ्या साधनांनीं प्रगतीचा मार्ग तयार केला; व त्यांमुळेंच ते नव्या व जुन्या शास्त्रांमधील दुवा झाले आहेत.

अल्-कंदी, अल्हसन, अलफराबी, अविसेना, अल्-गझली, अबूबकर, अवेम्पेस्, अलफेत्राजिअस हीं नांवें मानवी संस्कृतीच्या इतिहासांत संस्मरणीय आहेत. ॲव्हेरोजची कीर्ति त्यानें ॲरिस्टॉट्लची ओळख नव्या संस्कृतीला करून दिली म्हणून अमर झाली आहे. ॲरिस्टॉट्लचें तत्त्वज्ञान प्रसृत झालें म्हणून यूरोपमध्यें धार्मिक दुरभिमान व निरर्थक विद्वत्ता यांचेविरुद्ध चालू असलेला झगडा जोरांत चालविण्यास स्फूर्ति मिळाली. अन्दालुशियाच्या या सुलतानाच्या आश्रयाखालील युग-प्रवर्तक बुद्धिवादी ॲव्हेरोजचें कार्य राजर बेकननें खालील अवतरणांत उत्कृष्ट रीतीनें मांडलें आहे. "ॲरिस्टॉट्लनें निसर्गाची ओळख जनतेला करून दिली तर ॲव्हेरोजनें प्रत्यक्ष ॲरिस्टॉट्लचीच ओळख करून दिली." ख्रिश्चन धर्माच्या प्रामाण्याविरुद्ध बंडाचें निशाण तेराव्या चौदाव्या शतकांत उभारलें होतें. बुद्धिवादी क्रांतिकारकांना ॲव्हे-रोजनें शिकविलेल्या ग्रीक तत्त्वज्ञान्यांच्या शिकवणीपासून या बंडाची स्फूर्ति झाली.

### ग्रीक विद्वानांचें स्वागत—

जस्टिनिअनच्या दुरभिमानामुळें ख्रिस्ती राजवटींतून ग्रीक तत्त्व-ज्ञानाचे अवशेष साफ धुऊन टाकले; ग्रीक विद्वानांना आपलीं स्थानें सोडून द्यावीं लागलीं. रोमन साम्राज्यांतून बाहेर जाऊन त्यांना इराणांत राहावें लागलें. त्यांच्या अभ्यासांना तेथील स्वधर्मसत्ता ही तितकीच विरोधी ठरली. शेवटीं आबासादीसच्या दरबारांत या

बहिष्कृत शास्त्र्यांना आश्रय मिळाला. त्यांची विद्वत्ता पाहून खलिफा इतके ( थक्क ) खूष झाले कीं, या काफिरांना कुराण अगर मृत्यु यांपैकीं कशाचीच निवड करावी लागली नाहीं. उलट सर्व धर्मोपहासकांना आतिथ्यस्वीकाराचें निमंत्रण देण्यांत आलें.

ग्रीक ज्ञानाचा संग्रह—

खलिफा या विद्वानांना संरक्षण देऊनच थांबले नाहींत; ग्रीसमधील महर्षींचे मिळतील तेवढे ग्रंथ आणण्यासाठीं योग्य माणसांना त्यांनीं पाठविलें व ॲरिस्टॉट्ल, हिप्पारकस, हॉयपोक्रेटस, गेलन इत्यादिकांच्या प्रसिद्ध ग्रंथांचीं अरबी भाषेंत भाषांतरें करविलीं. मुसलमानी प्रदेशांत खलिफांनीं धर्मविरोधी तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यास प्रोत्साहन दिलें. सरकारी खर्चांतून चालू असलेल्या शाळांतून हजारों रंकराव विद्यार्थ्यांना शास्त्रीय ज्ञानाची दीक्षा देण्यांत येत असे. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत मिळे. शिक्षकांना आपल्या कामाबद्दल मान व मोबदला भरपूर मिळे. विद्वानांबद्दल अल् मॅनॉन् खलिफाला काय वाटे याचें वर्णन इतिहासकार अबूल फरागिअस यानें खालीलप्रमाणें केलें आहे : "बौद्धिक विकासाला ज्यांनीं वाहून घेतलें तेच खरे परमेश्वराचे भक्त, उपासक व सेवक होत. जे शहाणे करून सोडितात तेच खरे तारे होत. ते नसतील तर जग फिरून अज्ञान तमावस्थेंत बुडून जाईल."

महंमदाच्या अनुयायांनीं आश्रय दिलेले बरेच विद्वान् अधार्मिक होते. पुष्कळ वाचकांना मुसलमानामध्यें धर्मवेड व दुरभिमान नव्हता हें यामुळें कळेल व खोटया कल्पनांचा निरास होईल तर फार बरें ! बहुतेक सर्व विद्वानांचें, बुद्धीनेंच सत्याची पारख करावी याबद्दल एकमत होतें. खलिफाप्रमाणें बुद्धिवादाचा विकास करावा असा आदेश देणारा धर्माधिकारी इतिहासांत विरळाच. कारण, बुद्धिविकास हा धर्मविकासाच्या नेहमींच आड येत असतो; परंतु खलिफा अल् मॅनॉन् हा आबासादीच्या प्रसिद्ध वंशांतील होय. ते सर्व विज्ञानाचे अभ्यासू होते.

### ज्ञानाचे कैवारी, वैरी नव्हे—

आफ्रिका व स्पेन येथील सत्ताधारी, राजकीय सत्ता, ऐहिक वैभव, व ज्ञान यांचा प्रचार व परामर्ष कोण अधिक करतो या बाबतींत परस्परांशीं स्पर्धा करीत असत. कैरोच्या ग्रंथालयांत शतसहस्रांहून अधिक ग्रंथ होते, तर कॉरडॉव्हच्या ग्रंथशाळेचा अभिमान याहून सहापट मोठा होता. यावरून अरबांनीं अलेक्झँड्रियाचें ग्रंथभांडार नष्ट केलें ही गोष्ट विश्वसनीय वाटत नाहीं. कदाचित् त्या गोष्टीच्या मुळाशीं मुसलमानांचा हट्टीपणा अगर धर्मवेडेपणा दाखविण्याचा हेतु असावा. अलेक्झँड्रियाचें ग्रंथभांडार 'अग्नये स्वाहा' केलें असें मानावयाचें तर अंतःकरण अतिशय बावळट किंवा वाटेल त्याच्यावर विश्वास ठेवणारें असलें पाहिजे; कारण, तसें असतें तर मुसलमानांनीं एवढीं मोठीं विद्यापीठें चालविलींच नसतीं किंवा रोमन वगैरे प्राचीन संस्कृतीचें धन त्यांनीं संरक्षिलेंही नसतें. शास्त्रीय व निःपक्षपाती अभ्यासानें खोट्या कंड्या व दंतकथा यांचा निरास होतांच इतर धर्मांप्रमाणेंच मुसलमान धर्म हा मानव जातीचा शाप नसून मानव जातीला मिळालेला वरच होता असें सिद्ध होतें.

### विद्यादहनाची दंतकथा—

अकराव्या व बाराव्या शतकांत या विस्मयकारक विद्यादहनाची हकीकत अगदीं रसभरित व सविस्तरपणें लिहिलेली आढळते; परंतु युस्टिशिअस व एलमॅकिन या दोन्ही तत्कालीन इजिप्तमधील इतिहासकारांनीं या गोष्टीचा उल्लेखही केला नाहीं. युस्टिशिअस हा तर ॲलेक्झँड्रियाचा कुलपतिच होय. ख्रिश्चनांच्या शत्रूचा तो पक्षपात करील हें संभवनीय नाहीं. हें भयंकर कृत्य ओमार खलिफाच्या एका हुकुमावरून त्याच्या सेनापतीनें केलें असें सिद्ध करण्यासाठीं एक हुकूम नेहमींच पुढें केला जातो. ख्रिस्ती धर्मगुरूंच्या पुस्तकांतून तो हुकूम गाळतां आला असता; सबंध पुस्तक दडपतां आलें नसतें. सर्व पुरावे

अगदीं काळजीपूर्वक पाहून गिबनचें मत असें झालें आहे कीं : "मुसलमानांच्या सनातन न्यायाशीं विरोधी अशीच ती कडक शिक्षा होती. मुसलमानी नियमांत हें स्पष्ट आहे कीं, ज्यू आणि ख्रिस्ती लोकांचीं युद्धांत मिळालेलीं पुस्तकें 'अग्नये स्वाहा' करावयाचीं नाहींत; आणि काफीर शास्त्रज्ञ, इतिहासकार, कवि अगर शरीरविज्ञानी आणि तत्त्वज्ञानी यांच्या पुस्तकांचा अगदीं योग्य तो उपयोग करून घ्यावयास कांहीं हरकत नाहीं" (रोमन साम्राज्याचा उदयास्त.) निपःक्षपाती टीकेसहित इतिहास लिहिण्याची प्रथा सुरू झाल्यापासून ही ग्रंथदहनाची गोष्ट खोटी किंवा अत्यंत संशयास्पद समजली जाते.

कसेंही असो. अरबांच्या आक्रमणापूर्वीच ग्रीक विद्येचा निधि या लायब्ररींतून नाहींसा झाला होता. त्यापूर्वीं पुष्कळ दिवस शास्त्रीय ज्ञान व तत्त्वनाशात्मक दृष्टि याऐवजीं ख्रिश्चन दुरभिमान अलेक्झँड्रियांत भरून राहिला होता; आणि म्हणूनच ग्रंथशाळेंतही तदनुरूप फरक झाला असावा. ख्रिश्चन छळामुळें ज्यांनीं तें विद्यापीठ सोडलें अशा यवन विद्वानांनीं त्यांना अमोल वाटणारा तो ठेवा नेलाच असला पाहिजे; व ज्या धर्मशास्त्राच्या ग्रंथांनीं हिताहून अहितच अधिक केलें होतें अशा ग्रंथांनींच बहुतेक ओमरच्या हुकुमामुळें अग्निकाष्ठें भक्षण केलीं असतील. मुसलमानी अग्नीनें धर्मशास्त्राच्या या ग्रंथांची आहुति घेतली नसती; परंतु स्वतंत्र विचाराच्या पुरस्कर्त्या खलिफांनीं जुन्या विद्येवरील सर्व उपयुक्त ग्रंथ ज्या तीव्र उत्सुकतेनें गोळा करून त्यांचें संरक्षण केलें होतें; त्याच उत्सुकतेनें कदाचित् निरुपयोगी व विघातक ग्रंथांचे बळी घेतले असतील.

## ख्रिस्ती संतांचा संताप

टॉलमीजचें कार्य बायझंटाइनच्या रानटीपणामुळें अकार्य झालें होतें. हिपारिआच्या यात्रेंत विद्यादेवीचा सेंट सिरिल यानें ज्या वेळीं अपमान केला तेव्हांच अलेक्झँड्रियाच्या विद्यापीठाच्या विनाशास आरंभ झाला

होता. या वेळीं पांचवें शतक सुरू झालें होतें. अलेक्झँड्रियाच्या सुसंस्कृत जनतेनें एका नास्तिक स्त्रीचीं तत्त्वज्ञान व गणित या विषयांवरील व्याख्यानें–प्रवचनें आदरानें ऐकावीत हें या ख्रिस्ती संतांना खपलें नाहीं. (तुकारामाचा उपदेश तरी राम शास्त्र्याला कोठें खपला?) खरें असें होई कीं, गूढ व अगम्य अशा त्याच्या पुराणांना फक्त डाकू लोकच येत. आपण बौद्धिक दृष्ट्या न टिकूं, पण आपण व्यवहारानें वागून स्पर्धेचा कांटाच वाटेंतून दूर करूं असें त्यांना वाटे; आणि त्यांच्या चिथावणीमुळेंच भिक्षूंच्या सैन्यासह बंड-खोरांनीं अलेक्झँड्रियावर हल्ला केला व जीं लिहितां येत नाहींत, इतकेंच नव्हे तर ज्यांच्या स्मरणानेंही शरम वाटावी, अशीं भयंकर कृत्यें त्यांनीं केलीं!

"अशा तऱ्हेनें ४१४ व्या सनांत जगांतील श्रेष्ठ बौद्धिक नगरांत तत्त्वज्ञानाचा दर्जा ठरून गेला; यापुढें शास्त्रीय ज्ञानाची किंमत कमी होऊन तें अंधारांत पडलें पाहिजे! त्याचें सार्वजनिक अस्तित्व अशक्य झालें पाहिजे. ग्रीक तत्त्वज्ञानाची पोलादी तरवार दुरभि-मानाच्या गदेनें बोथट करून टाकली होती. रोममध्यें विचारस्वातंत्र्य असतां कामा नये, हें नक्की झालें होतें. जेत्यांची सत्ता टिकून होती तोंपर्यंत वरील गोष्ट ठीक होती. पण अरबी टोळ्यांनीं अलेक्झँड्रिया जिंकल्यावर सदर घोषणा लागू करणें अशक्य होतें. ........ कारण, पुढील दोन शतकें कंटाळवाणीं व दुःखदायकच गेलीं. परंतु परस्थ लोकांनीं येऊन जुलूम व दडपशाही नष्ट केली. अरब जेत्यांनीं आपलें असिधारा व्रत चालविलें हें ठीक झालें. त्यांनीं अतिमानुष ज्ञान अस-ल्याचें ढोंग कधींच केलें नाहीं. धर्मशास्त्राच्या विरोधाभासाच्या जंजाळांत न अडकतां ज्ञानाची उपासना करण्यास ते स्वतंत्र होते. इजिप्तला अरबांनीं भयंकर धर्मवेड, अज्ञान व रानटीपणा यांच्या मगरमिठींतून सोडवून पूर्वीच्या कीर्तिवैभवाच्या पदीं नेऊन बसविलें."

—डेपर : यूरोपच्या बौद्धिक विकासाचा इतिहास.

**शास्त्रांचा प्रसार—**

जुन्या ग्रीक महर्षींचें ग्रंथ गोळा करून त्यांनीं त्यांचें नुसतें संरक्षणच केलें नाहीं तर त्यांच्यावर टीका करून त्यांच्यांत सुधारणा घडवून आणल्या. प्लेटो, ॲरिस्टॉट्ल्, युक्लिड, अपोलोनिअस व टॉलेमी यांचे समग्र ग्रंथ, त्यांचेवरील ‘ विषमपद विमर्षिणी ’ टीकेसहित, नव्या यूरोपच्या जनकांना प्रथम अरबी भाषेंतूनच वाचावयास मिळाले. मनुष्यांची दृष्टि व्यापक करणारें व निसर्गाच्या नियमांशीं ओळख करून देणाऱ्या खगोलशास्त्राचीं अरबांनीं अत्यंत कळकळीनें जोपासना केली. अवलोकनाच्या नव्या साधनांनीं पृथ्वीचा व्यास व स्थिति इतर अनेक ग्रहांच्या स्थितिगतीसह अगदीं बरोबर जाणली. खगोलशास्त्राचें मूळचें स्वरूप अरबांनीं अगदीं पालटून टाकलें. पौर्वात्य पुरोहितांनीं फलज्योतिषाप्रमाणें त्याचा विकास केला व अरबांनीं त्याचें अगदीं बरोबर असें शास्त्र बनविलें. अलेक्झँड्रियाचे डायेफँटसनें बीज गणिताचा शोध लावला; परंतु अरबांच्या काळापर्यंत त्याचा अभ्यास असा होत नव्हता, किंबहुना शास्त्र या पदवीला तें अरबांच्या वेळींच पोहोंचल्यामुळें त्याचा मूळ शोध अरबांनींच लावला अशी खात्री आहे. परंतु अरबांनीं विनम्रपणें आपलें ग्रीक ऋण कबूल केलें आहे.

**अरबांची ज्ञानोपासना—**

वनस्पतिशास्त्राचा अभ्यास औषधीय उपयोगासाठीं केला जात असे; तरी डायोस्कोराइड्सनें लावलेल्या दोन हजार वनस्पतींच्या शोधानें त्या शास्त्राचा पाया घातला. रसायनशास्त्र हें अगदीं गुप्त असें. इजिप्तच्या भिक्षूंनीं त्याचें आस्थेनें संरक्षण केलें होतें. बॅबीलोनमध्येंही त्याचा उपयोग केला जात असे. हिंदुस्थानमध्येंही रसायनशास्त्राचीं मूलतत्त्वें अवगत होतीं असें दिसतें, परंतु रसायन-शास्त्राचा प्रारंभ व विकास हा अरबांच्याच प्रयत्नानें झाला. बाष्पी-

करणाचीं साधनें त्यांनींच शोधून काढलीं. घन, द्रव आणि वायुरूप पदार्थांची छाननी प्रथम त्यांनीं केली. आल्कली आणि आम्ल यांच्यांतील साम्यभेदाचे प्रयोगही त्यांनींच केले, आणि अनेक खनिज पदार्थांचें गुणकारी औषधांत रूपांतरही त्यांनींच केलें.

वैद्यकाच्या शास्त्रांतच अरबांनीं सर्वांत मोठी प्रगति केली. गॅलेन या सद्गुरूच्या दोन सद्च्छिष्यांनीं या शास्त्राचा विकास पुष्कळच केला. बुखाऱ्यासारख्या दूरच्या ठिकाणीं राहणारा अविसेना याला सुमारें ५०० वर्षेपर्यंत या शास्त्रांतील प्रमाण मानीत असत. सॅलेर्मोच्या वैद्यकीय पाठशाळेंत सुमारें सोळाव्या शतकापर्यंत पुष्कळ विद्यार्थी शिक्षण घेत असत. तेथें अरबांच्यामुळेंच शाळेला प्रारंभ झाला; आणि अविसेनाचे पाठच तेथें अभ्यासिले जात असत.

**रोकडें ज्ञान—**

अवलोकनानें ज्ञान मिळविणें हें अरबांचें वैशिष्टच होय. उगीच हवेंत तर्क करण्याचा अभिमान सोडून देऊन ज्ञात वस्तूंच्या भूमीवर ते स्थिर उभे असत. डॉयिन अॅव्हेरोजच्या मतांत अरब विद्येचें वैशिष्टच दिसून येणार आहे. “ जें आहे त्याचा अभ्यास करणें हाच तत्त्वज्ञान्यांचा धर्म. परमेश्वरी कार्याचें ज्ञान व तदनुरोधानें होणारें त्याच्या सत्य स्वरूपाचें ज्ञान हीच खरी परमेश्वरसेवा. त्याच्या दृष्टीनें हाच खरा कर्मयोग. उलट अशा तऱ्हेनें उपासना करून सर्वश्रेष्ठ धर्माचा जे आश्रय करतात त्यांच्यावर चुकीचे व वितंडवादी म्हणून कर लादणें ही अत्यंत हीन क्रिया होय.” असल्या धर्मविरुद्ध विचारांचा प्रसार ज्या धर्मांत अगदीं धार्मिक परिभाषेंत चालत असे तो असहिष्णु व दुरभिमानी कसा म्हणावयाचा ? असल्या या मतामुळें पुरोहित वर्गाचा रोष या तत्त्वज्ञान्यांवर झालाच, आणि विशेष हें कीं, मुसलमान पुरोहितांपेक्षां ख्रिश्चन पाद्रीच अधिक रुष्ट झाले.

थोड्याशा हद्दपारीनंतर अंदालुसिआच्या सुलतानच्या दरबारांतलें

ॲव्हेरोजचें स्थान त्याला परत मिळालें व त्याच्या पुस्तकावरील बहिष्कार टळला. परंतु लॅटिन भाषांतरांतून वरचा व त्याच्यासारखे असलेले उतारे वगळण्यांत आले. तरीसुद्धां १२, १३ व १४ व्या शतकांतील धर्मविरोधकांची चळवळ ही त्याच्या शिकवणीच्या स्फूर्तीमुळेंच चालू होती. मध्ययुगांत कॅथॉलिकांच्या प्रभावामुळें सर्व यूरोप आध्यात्मिक दास्यांत होता. या कॅथॉलिकांच्या वर्चस्वाला जोराची ठोकर धर्मविरोधी चळवळीमुळेंच मिळाली. बाराव्या शतकापासून तों आधुनिक शिक्षणाचा खरा विजय होईपर्यंत ख्रिश्चनांच्या दृष्टीनें ॲव्हेरोजचें तत्त्वज्ञान आणि धर्मविरोध हीं एकच होतीं. आणि तें तसे सहजच होते. कारण वर उद्धृत केलेला एकच उतारा अरब लोकांना उत्सुकतेनें विज्ञानप्रवण करण्यास पुरेसा होता असें दाखविण्यास भरपूर आधार आहे. विज्ञानामुळे अज्ञानवापी झांकून टाकतां येते; श्रद्धेला पावित्र्य लाभतें; आणि धर्मसिद्धांतानुरूपही विज्ञानाचा गौरव करतां येतो हीच या उताऱ्याची फलश्रुति होय.

**परमेश्वराचें आकलन—**

या उताऱ्यांत ॲव्हेरोजनें तर्कशास्त्राचीं मूलतत्त्वें सांगितलीं आहेत. विश्वाचा कोणी उत्पत्तिकर्ता आहे ही कल्पना किंचित् बाजूला ठेवून त्याचें ज्ञान व्हावें असा प्रयत्न त्यानें केला, परमेश्वरी सृष्टीच्या, म्हणजेच निसर्गाच्या सत्यज्ञानाच्या मागें आपण लागलों कीं, दिव्य 'सत्' असतांच विलीन होतें आणि त्याचें अस्तित्व सिद्ध करण्याचा "न इति" एवढा एकच मार्ग राहतो. परमेश्वराचे आकलनासाठीं अशा मार्गानें चाललेल्या प्रयत्नास ज्या धर्मानें प्रोत्साहन दिलें तो धर्म मानवी विचारसरणींत अत्यंत प्रगत असल्याचेंच प्रतीक आहे. आधुनिक मोठ्या धर्मांपैकीं, मुसलमान धर्म हा श्रेष्ठ होय. त्यानें इतर सर्व धर्मांचा आधारच नष्टप्राय केला आणि इस्लाम धर्माचें ऐतिहासिक महत्त्व जें हेंच होय.

**व्यापक तत्त्वज्ञान—**

इजिप्त, असीरिया ज्यू, इराण व ग्रीक या लोकांच्या संस्कृतींचा जेथें उदय, ऱ्हास व विनाश झाला तेथेंच इस्लामी व अरबी संस्कृतीचें केंद्र होतें. त्या जुन्या संस्कृतीचा जो परिणाम झाला तोच अरब संस्कृतीचा आधार व एकच परमेश्वराची कल्पना हेंच नवीन धर्माचें मुख्य तत्त्व. सर्व धर्मांचा आधार एकच आहे या कल्पनेला प्रारंभीं जन्म दिल्याचें श्रेय अरब तत्त्वज्ञानाला दिलें पाहिजे. जीव व जगत् यासंबंधींचें गूढ सोडविण्याचा मानवी प्रयत्न म्हणजे धर्म होय असें व्यापक तत्त्व अरब तत्त्वज्ञान्यांचें होतें, एवढेंच नव्हे तर सदर प्रयत्न जितका बुद्धिगम्य करतां येईल तितका तो मोठा, उदात्त व पवित्र होय. धर्मासंबंधींची बौद्धिक विचारसरणी ही ॲव्हेरोजच्या मनांत स्पष्ट होती. अथेन्स व अलेक्झँड्रिया येथील महर्षींच्या गूढ व शास्त्रीय ज्ञानाच्या बरोबरीनेंच स्वतंत्र विचारसरणीच्या योगानें मानवी संस्कृतींत भर टाकली आहे. संशय, चिकित्सा यामुळेंच श्रद्धा दृढ होते. ज्या वेळीं बुद्धि अंधश्रद्धेला आव्हान देते त्या वेळीं मानवी प्रगतीच्या मार्गावर नवाच प्रकाश पडतो. युरोपमधील संशयवादाच्या इतिहासांत 'तीन तोतये' या अनामिक पुस्तकास फार महत्त्वाचें स्थान आहे. या दुष्ट पुस्तकाचें कर्तृत्व ख्रिस्ती बादशाह फ्रेड्रिक बार्बारोसा अगर मुसलमानांचा तत्त्ववेत्ता ॲव्हेरोज यांचेवरच लादलें जातें. येशू व महंमद हे तोतये! एक लेखक ख्रिस्ती व दुसरा मुसलमान! अरेरे! धर्माला मोठे वाईट दिवस आले होते ते!

**सर्व धर्मांचें ऐक्य—**

तेराव्या शतकापूर्वी संशयवाद होता, परंतु अंधविश्वास अल्प होता. एकादें तत्त्व विवाद्य असो कीं अमान्य झालेलें असो, परंतु ख्रिस्ती धर्माच्या पायाला कधींच धक्का पोहोंचला नव्हता. सर्व धर्मांना सामान्य

असें कांहीं आहे अशी कल्पना उदय पावली, त्यामुळें ख्रिस्ती धर्माच्या आधारावरच हल्ला चढला. जर सर्व धर्मांचे मुळाशीं तींच मुख्य तत्त्वें असतील तर ज्या गौण तत्त्वांचे योगानें मानवाचे आध्यात्मिक ऐक्याला बाधा येते असे सर्व अविश्वास्य सिद्धांत सोडून देणेंच इष्ट नव्हे का? पण असल्या सिद्धांतांशिवाय–बुद्धीच्या कसोटीला न टिकणारा–धर्म उभाच राहूं शकत नाहीं. त्याला बुद्धिप्रधान बनवावयाचा तर त्याचें अस्तित्व टिकणारच नाहीं. सर्व धर्मांचें उगमस्थान एकच आहे हें क्रांतिकारक तत्त्व अरब विचारवंतांचेंच आहे.

ॲव्हेरोजच्या विचारांनीं अरब विद्येवर कळस चढविला हें खरें! परंतु नवव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत जी श्रेष्ठ श्रेष्ठ विचारवंतांची व तत्त्वज्ञान्यांची परंपरा होऊन गेली त्यांपैकीं ॲव्हेरोज हा एक होता. इतर श्रेष्ठ विचारवंतांच्या विचारसरणीचा उल्लेख येथें करणें अस्थानीं होणार नाहीं. त्यायोगानें मुसलमान धर्माच्या मुख्य व मूळ तत्त्वांतून ज्या क्रांतिकारक विद्येचा विकास झाला तिची थोडीशी कल्पना येईल.

### स्वतंत्र विचार—

आध्यात्मिक अद्वैताचें जणूं प्रतिबिंबच ऐहिक ऐक्यस्थापनेंत झालें. त्यामुळेंच आर्थिक समृद्धि झाली. मग या नवोदित मुसलमान राष्ट्रानें मनोविकास व संस्कृति यांकडे लक्ष दिलें. सुमारें एक शतक त्यांनीं इतरांपासून–प्रामुख्यानें ग्रीक लोकांपासून–घेण्यासारखें काय आहे तें पाहून त्याचा अभ्यास केला. आणि अशा तऱ्हेनें ' हुश्शार ' होतांच स्वतःचे स्वतंत्र विचार विद्येच्या प्रत्येक शाखेंत निर्माण केले.

### अरबी तत्त्वज्ञ—

अल् कंदी हा स्वतंत्रप्रज्ञ अरबी तत्त्वज्ञान्यांचा आद्य पुरुष होय. आबासाईदीच्या राजधानींत तो राहात असे. नवव्या शतकाचे सुमा-

रास त्यानें स्वतःला अग्निसात् केलें. तत्त्वज्ञानाचा अभ्यास गणितावर आधारला पाहिजे, तो निव्वळ काल्पनिक अनुमान असूं नये. अमूर्त विचारांस तर्कशुद्ध विचारांचें पाठबळ असावें आणि त्याला आधार मूर्त सिद्धांत, नियम व उदाहरणें यांचा असावा म्हणजेच योग्य अनुमानें काढतां येतात. या नियमांनीं अभ्यास व विचार करावा, असें सांगणारा हा तत्त्वज्ञ बेकन व डेकॉर्टिस यांच्यापूर्वीं सात शतकें होऊन गेला हें अरब संस्कृतीला किती गौरवाचें आहे ! एक हजार वर्षांपूर्वीं अरब तत्त्वज्ञान्यानें केलेला उपदेश आजही पुष्कळ तत्त्व-ज्ञान्यांना लाभदायक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

अल् फराबी हा दहाव्या शतकांत होऊन गेला. दमास्कस आणि बगदाद या दोन ठिकाणीं तो शिकवीत असे. ॲरिस्टॉट्लवर लिहि-लेले त्याचे टीकाग्रंथ पुष्कळ शतकेंपर्यंत प्रमाण मानले जात असत. वैद्यक शास्त्रांतही तो अत्यंत प्रवीण होता. रॉजर बेकन हा त्याच्या-पासून गणितशास्त्र शिकला.

**वैद्यक-विशारद—**

दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत अविसेना होऊन गेला. बुखाऱ्याच्या संपन्न व्यापारी कुलांत त्याचा जन्म झाला होता. त्यानें गणित व पदार्थविज्ञान शास्त्र यावर पुष्कळ लिहिलें आहे. परंतु वैद्यकावरील त्याच्या ग्रंथामुळें तो इतिहासांत नामवंत झाला आहे. सालेर्मोची वैद्यक शाळा हें त्याचें स्मारक होय. आणि त्याचा ग्रंथ सोळाव्या शतकापर्यंत यूरोपमध्यें प्रमाण मानला जात होता. या प्रसिद्ध वैद्यक-विशारदाचे तत्त्वज्ञानावरील विचार इतके नवीन व क्रांतिकारक होते कीं, बुखाऱ्याच्या स्वतंत्रप्रज्ञ अमीरासही अविसेनाच्या अधार्मिक शिकवणीप्रमाणें वागणाऱ्या इसमांचें वर्चस्व कमी करतां आलें नाहीं. त्याला दरबार सोडून सर्व अरब साम्राज्यांत वैद्यकशास्त्र व आपलें स्वतंत्र तत्त्वज्ञान शिकवीत हिंडावें लागेल.

नेत्रविद्येंत प्रगति--

अकराव्या शतकांत अल्हसन नांवाचा एक शास्त्रज्ञ होऊन गेला. कोठल्याही युगाच्या श्रेष्ठ शास्त्रज्ञांत त्याला स्थान मिळणें अवश्य आहे. नेत्रविद्येंत त्याचा हातखंडा असे. ग्रीक लोकांपासून ती विद्या तो शिकला. पण मुळापेक्षां त्यानें त्यांत प्रगतीच केली आणि डोळ्यांतून सूर्यकिरणें निघतात हा सिद्धांत चुकीचा आहे हें त्यानें सिद्ध केलें. शारीर व भूमिति या शास्त्रांच्या साह्यानें दिसणाऱ्या पदार्थांपासून किरणें पसरतात व डोळ्याच्या पड्यावर त्याचे ठसे उमटतात हें त्यानें सिद्ध केलें. अरब शास्त्रज्ञांपासून नेत्र व प्रकाश-क्रिया यासंबंधींचीं मतें केप्लरनें घेतलीं असावींत याला पुष्कळच आधार आहे.

सत्याचा शोध---

अंदालुसियाच्या व्यापाऱ्याचा मुलगा अल् गझली हा ह्या शतकांतच होऊन गेला. सत्य म्हणजे आत्मअवधान हें त्यानें डेस्कार्टिस्च्या आधीं सांगितलें. प्राचीन व अर्वाचीन संशयवादांतील तो एक दुवाच आहे. त्यानें तत्त्वज्ञानांत घातलेली संस्मरणीय भर त्याचेच शब्दांत अशी आहे : "धर्मापासून समाधान मिळणें अशक्य आहे असें ठरल्यावर मी सर्व प्रमाण म्हणून जें होतें तें सर्व सोडून दिलें. लहानपणापासून अचिकित्सेच्या काळांत ज्या मतांचा संस्कार माझेवर घडत आला होता त्याचेपासून मी अलिप्त राहिलों. माझें ध्येय वस्तूंचें-पदार्थांचें सत्य ज्ञान करून घेणें हें आहे आणि म्हणून ज्ञान म्हणजे काय हें ठरविणें अपरिहार्य आहे. विचारांतीं हें स्पष्ट झालें कीं कांहीं ज्ञान निदान असें हवें कीं, ज्यायोगें पदार्थांचें विवरण संशयातीत झालें पाहिजे आणि त्यामुळें पुढें अनुमान अशक्य व्हावें. उदाहरणार्थ मला एकदां दहा हे तिनीपेक्षां अधिक आहेत हें पटलें कीं मग एकाद्यानें तीनच मोठे आहेत व त्यासाठीं

मी काठीचा साप करतों असें सांगितलें आणि त्याप्रमाणें चमत्कार करून दाखविला तरी तो चूक आहे ही माझी खात्री अढळ राहिली पाहिजे. त्याच्या चमत्कारानें फार तर त्याच्याबद्दल कौतुक वाटावें, पण मला माझ्या ज्ञानाचा संशय कधीं येऊं नये."

अगदीं अचूक ज्ञानाबद्दल सुमारें हजार वर्षांपूर्वी मुसलमान तत्त्वज्ञान्यांनीं जें लिहून ठेविलें आहे तें अद्यापि खरें आहे. ही शास्त्रीय वृत्ति आम्हां हिंदी लोकांत अगदींच कमी आहे. अगदीं चालू विसाव्या शतकांतही ते चमत्कार, जादू व आध्यात्मिक ढोंगें यांनीं भारावून जातात व या सर्वांमुळें ते शास्त्रीय सत्यही अविश्वसनीय मानूं लागतात हें विशेष नव्हे का?

**चिकित्सावादाचा जनक—**

गझलीचें मत असें होतें कीं ज्ञान हें अवलोकन व प्रयोग यावरून मिळविल्याशिवाय अचूक असणार नाहीं. तसेंच सिद्ध केलेल्या नियमानींच अनुमानें काढलीं पाहिजेत. अवलोकन व कार्यकारणभाव यांच्या योगानेंच जर ज्ञानसिद्धी झाली तरच त्यांत वरील उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणें संशयातीतता असते. इंद्रियाच्या अवलोकनाची दुरुस्ती फक्त बुद्धीनेंच होऊं शकते. धर्माबद्दल दुरभिमान व असहिष्णुत्व असलेल्या वातावरणांत असे स्वतंत्र विचार पाहून ते सांगणाऱ्याच्या धैर्याची तारीफच केली पाहिजे. तरी पण गझलीचें चिकित्सावादी तत्त्वज्ञान त्याचे काळांत सर्वत्र अभ्यासलें जात असे. पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारा फ्रेंच तत्त्वज्ञ रेनॉन याचें मत पाहण्यासारखें आहे. तो म्हणतो; "आधुनिक चिकित्सावादाचा जनक ह्यूम यानें देखील अल् गझलीपेक्षां विशेष अधिक कांहींच सांगितलें नाहीं. निव्वळ अनुमानानें विचार करण्याचे पद्धतीच्या मुळावर घाव घालणारी कँटची विचारसरणी ह्यूमच्या चिकित्सावादांतूनच स्फुरली होती, हें ध्यानीं घेतलें म्हणजे ह्यूमच्या पूर्वी ७०० वर्षें होऊन

गेलेल्या, गझलीचें ऐतिहासिक महत्त्व तात्काल स्पष्टपणें पटतें. पण गझली काळाच्या पुढें होता. प्रायोगिक शास्त्रपद्धति त्याचे वेळीं शक्य नव्हती. साधनांच्या अपुरेपणामुळें पदार्थांचें रूप अगदीं अचूक ठरवितां येत नसे. आणि या निराशेनें गझली शेवटीं गूढवादी झाला. पण त्याचें हें वर्तन कँटच्या वर्तनापेक्षां अधिक विचार करण्यासारखें आहे असें नाहीं. वस्तुगत अडचणीमुळें त्याच्या विचारसरणीचीं पंखें छाटलीं गेली, पण स्वतःचे वर्गाबद्दल असलेल्या पक्षपातामुळें कँटची प्रतिभा निष्प्रभ झाली.

बायबलांतील विचारांचें खंडन—

आकाशांतील ताऱ्यांच्या स्थितीबद्दलचे टॉलमीचे सिद्धांत अमान्य करणारा अबूबकर हा पहिलाच ज्योतिषशास्त्रज्ञ होय. तो बाराव्या शतकांत होऊन गेला. ग्रहस्थिति व ग्रहगति यांसंबंधीं त्यानें स्वतःची विचारप्रणाली बसविली होती. ती पुढें गीआरडॅनो, ब्रूनो, गॅलिलीओ व कोपर्निकस यांना मार्गदर्शक झाली. या सरणींत सर्व गती ताडून पाहून एकही चूक न आढळल्याचा उल्लेख आहे. स्वतःची विचारसरणी पूर्णपणें सिद्ध होण्यापूर्वीच त्याला मृत्युवश व्हावें लागलें. सर्व ग्रहगोल नियमानें फिरतात हा त्याचा सिद्धांत त्याचा शिष्य फेत्राजिअस यानें लोकांना पटवून दिला. ज्योतिषशास्त्रांत त्याची तत्त्वसरणी मध्ययुगांत फारच मानली जात असे. बायबलचें विश्वोत्पत्तीसंबंधींचें विवेचन विपरीत करून टाकणारी ही सरणी मठामठांतून शिरली. रॉजर बेकन व त्याचा प्रतिस्पर्धी अल्बर्ट मॅग्नस या दोघांनींही अल् फेत्रिजाअसचें ज्योतिषशास्त्रांतील ऋण मान्य केलें आहे. फेत्राजिअसनें अबूबकरच्या सरणीचें विवेचन करून दाखविलें आहे.

अव्हेरोज ह्या श्रेष्ठ व सर्वांत आधुनिक तत्त्वज्ञाची भूमिका व विचारसरणी मागें विशद करून दाखविली आहेच. इस्लामी संस्कृतीच्या

इतिहासाचें पान उलटलें जात होतें, अशा वेळीं तो होऊन गेला. बाराव्या शतकाचे सुमारास संस्कृति कळसास पोहोंचून प्रतिक्रियेचीं बीजें रुजूं लागलीं होतीं. त्यामुळें प्रगतीचीं पाउलें मंदावलीं होतीं; ऱ्हास तर सुरू झालाच होता.

**अवताराची समाप्ति—**

अरब धर्मानें दिलेल्या स्वातंत्र्यानें इतकी उंच भरारी मारली होती कीं, "धर्मसंरक्षकांचे ऐहिक हितसंबंध त्या पांचशें वर्षांतच विचारस्वातंत्र्याला संपूर्णपणें विरोधी झाले होते. इस्लामचें तत्त्वज्ञान इतक्या विस्मयावह रीतीनें विकसित झालें. अव्हेरोजनें 'बुद्धिरेव सत्यानृतस्य प्रतिष्ठा' असा क्रांतिकारक सिद्धांत मांडला, म्हणूनच पुरोहितांच्या वजनामुळेंच असे अधार्मिक सिद्धांत मांडणारा नरकाप्रत जाईल असा फतवा कॉरडोव्हचा सुलतान मासूर यास काढावा लागला आणि या इस्लामच्या उदात्त शिकवणीच्या निषेधापासून मानवी प्रगतीचें साधन असलेला तो धर्म अज्ञान, प्रतिक्रिया, पूर्वग्रह व असहिष्णुत्व यांच्या प्रसाराचें साधन बनला! या वेळीं इस्लामचें ऐतिहासिक कार्य संपलें होतें. त्याचें कार्य (Mission) प्राचीन संस्कृतीची संपत्ति दोन साम्राज्यांच्या ऱ्हासांतून व दोन धर्मांच्या अंधारांतून वांचविणें हेंच होतें. आणि तें कार्य झाल्यावर स्वतःच स्वतःला विसरावें–छे, आत्मवंचना करावी तशी त्यांची गत झाली. आणि तेथून पुढें तो तुर्की रानटीपणा व मोंगलाचा लुटारूपणा यांचें निशाण हातीं मिरवूं लागला.

**प्रतिक्रांतीची छाया—**

इस्लाम स्वतःचीच ओळख विसरला. ॲव्हेरोजला कारडोव्हचे दरबारांतून–विचारस्वातंत्र्याच्या मंदिरांतून–घालवून देण्यांत आलें. त्याच्या अमूल्य पुस्तकांची धार्मिक प्रतिक्रियेच्या अग्नीमध्यें आहुति

पडली. बुद्धिवाद हा अधार्मिकपणा मानला जाऊं लागला. अव्हेरोज व ॲरिस्टॉटल् यांचीं नांवें बहिष्कृत झालीं. कालांतरानें प्रतिक्रांतीचा इतका विजय झाला कीं, तत्त्वज्ञान म्हणजे अधर्म, अश्रद्धा व अनीति असें सनातनी मुसलमान मानूं लागले. परंतु प्रगतीचें निशाण कांहीं खालीं पडण्यासाठीं वर चढविलें गेलें नव्हतें. निरर्थक धार्मिक दंभ व क्षोभ आणि असहिष्णुत्व वा जुलूम मग तो ख्रिस्ती वा मुसलमान असो तो कांहीं अशा रीतीनें स्वातंत्र्याच्या सूर्याला झाकाळूं शकत नाहीं. अव्हेरोज अरबांना पारखा झाला परंतु भवितव्याचे मानकरी असणाऱ्या लोकांनीं त्याला मानाच्या सिंहासनावरच चढविलें. सनातन धर्माचें आसन बाराव्या शतकापासून पुढें ज्या झगड्यानें गदगदा हालविलें, असा बुद्धि आणि श्रद्धा(?), जुलुमी अज्ञान आणि प्रभावी स्वातंत्र्य यांचा तीव्र झगडा अव्हेरोज या अरब तत्त्वज्ञान्याच्या स्फूर्तीतूनच निघाला होता. अव्हेरोजच्या तत्त्वज्ञानाचा यूरोपच्या शास्त्रीय विचारावर चार शतकें प्रभाव होता.

प्रकरण सातवें

# इस्लाम व हिंदुस्थान

हिंदुस्थानांत मुसलमानी धर्माचा प्रवेश झाला त्या वेळीं त्याची प्रगतिपरता निमालीच होती. विद्वान् व सुसंस्कृत अरबांचें नेतृत्व त्या वेळीं नव्हतें; परंतु, क्रांतीचीं तत्त्वें अद्याप मुसलमानी धर्माच्या निशाणावर झळकत होतीं. शिवाय इराण आणि इतर ख्रिस्ती प्रदेशांची जी स्थिति होती, तीच स्थिति मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकण्याचे वेळीं हिंदुस्थानची होती. जितांपैकीं बहुसंख्य जनतेचा सक्रिय पाठिंबा नसेना का; परंतु सहानुभूति मिळविल्याशिवाय जेत्यांच्या आहारीं कोठलेही महान् लोक जाणें शक्य नाहीं. सनातनी पुरोहित वर्गानें ( Brahmanical Orthodoxy ) क्रांतिकारक बुद्धिवादावर वर्चस्व मिळविलें होतें. अकराव्या व बाराव्या शतकांत अधार्मिक म्हणून दडपशाहीनें त्रस्त झालेले लोक तेथें पुष्कळच होते; आणि त्यांना इस्लामचा संदेश आदरणीय वाटला असेल यांत शंका नाहीं.

### शेतकऱ्यांवरील जुलूम---

जाट व इतर दलित शेतकरी यांचे साहाय्यानें महंमद इब्न कासीमनें सिंध जिंकला. तेथील शेतकऱ्यांवर त्या वेळच्या पुरोहितवर्गाची अनियंत्रित सत्ता व जुलूम चालू असे. सिंध जिंकल्यावर त्यानें अरब लोकांचें धोरण अंमलांत आणलें. " ब्राह्मण सत्ताधारी वर्गाला विश्वासांत घेऊन देशांत शांतता प्रस्थापित करण्याचें काम त्यानें त्यांना दिलें. त्यानें त्यांना देवळें सुस्थितींत ठेवण्याची परवानगी दिली. आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास हरकत केली नाहीं. वसूल त्यांचेच हातीं ठेवला.

इतकेंच नव्हे तर पूर्वींची राज्यव्यवस्था चालू ठेवण्यासाठीं त्यांचीच योजना केली. ”

—एलिअट : हिंदुस्थानचा इतिहास.

**विस्कळित समाज—**

ज्या अर्थी कांहीं ब्राह्मणही म्लेंच्छांच्या बाजूस जावयास तयार झाले त्या अर्थी एकंदरींत समाजस्थिति सुस्थितींत नव्हती असेंच म्हणावयास पाहिजे. समाजाची घडी इतकी विस्कळित व गोंधळाची असली पाहिजे कीं, त्यांतील वरिष्ठ वर्गाची सुस्थितीही निश्चित नसावी, असेंच म्हणावें लागतें. अशी स्थिति नेहमीं प्रतिक्रांति यशस्वी झाली म्हणजे होत असते. क्रांति अनेक कारणांनीं अयशस्वी होऊं शकते, म्हणून ज्या प्रतिगामी पक्षाचा जय होतो तो पक्ष समाजघटना विस्कळित होण्याचीं कारणें दूर करूं शकत नाहीं. बुद्धक्रांति अयशस्वी होण्यास बुद्ध तत्त्वज्ञानांतील अंगभूत दोषच कारणीभूत आहेत. वस्तुतः ती अयशस्वी झालीच नाहीं, ती भलत्याच वाटेला मिळाली एवढेंच. क्रांतीचा विजय होण्यास अवश्य इतकी परिस्थिति पिकली नव्हती. बुद्धाच्या पराभवानंतर देशाची स्थिति अधिकच वाईट झाली. आर्थिक दुरवस्था, राजकीय जुलूम, बौद्धिक बेबंदशाही (Intellectual Anarchy) व आध्यात्मिक गोंधळ यांनीं सारा देश बुजबुजाटून गेला होता. सर्व समाज विनाश व विघटना यांच्या चक्रांत सांपडला होता; आणि म्हणूनच दलित जनता सामाजिक समता व राजकीय स्वातंत्र्य यांचें आश्वासन देणाऱ्या इस्लामी धर्माच्या झेंड्याखालीं गोळा झाली. जनता आली इतकेंच नव्हे तर स्वार्थांध बनून वरिष्ठ वर्गही आपली सेवा खाविंदचरणारविंदीं रुजू करण्यास सज्ज झाला. याचा अर्थ एवढाच कीं, कनिष्ठ वर्ग निराशाग्रस्त होते व वरिष्ठ वर्ग पतित झाले होते.

**धर्मांतराची मीमांसा—**

हिंदु संस्कृतीचा निष्ठावंत भक्त हॅवेल याचें इस्लाम–प्रसाराबद्दलचें मत अत्यंत उद्‌बोधक आहे. तो मुसलमानांसंबंधीं सहानुभूति दाखवील अशी शंका येण्याससुद्धां जागा नाहीं. "ज्यांनीं इस्लामधर्म स्वीकारला त्यांना मुसलमान रहिवाश्यांचे सर्व हक्क मिळाले. मुसलमानी दरबारांत सर्व भांडणें कुराण कायद्याप्रमाणें आर्य—विधींनीं नव्हे—तोडलीं जात असत. यामुळें खालच्या वर्गांत धर्मांतर फारच लवकर होत असे. विशेषतः ब्राह्मणांचे स्पृश्यास्पृश्यतेचे नियम ज्यांना जाचक होत ते तर फारच जलद स्वधर्म सोडीत असत."

—हिंदुस्थानांतील आर्यांचें राज्य.

ज्याचा विश्वास ब्राह्मणविधि परिपूर्ण व उत्कृष्ट असा होता त्याचें हें मत आर्यांना अभिमानास्पद खास नाहीं. एवढें खरें कीं, त्या वेळीं असे असंख्य लोक असावेत कीं, ज्यांना हिंदु धर्म व ब्राह्मण रूढी यांना चिकटून राहावयाला कांहींच कारण नव्हतें. स्वधर्म सोडूनही हिंदूंच्या प्रतिगामी वर्गाच्या जुलुमापासून संरक्षण करील अशा इस्लाम धर्माचा आश्रय घेण्यास ते अगदीं सुसज्ज असत.

**सामाजिक कार्यक्रम—**

हॅवेलनें महंमदाच्या शिकवणीस आध्यात्मिक महत्त्व विशेष नाहीं असें म्हटलें आहे; पण तेथेंच त्यानें त्या तत्त्वांचा हिंदुस्थानांत कसा प्रचार झाला ह्याबद्दल एक महत्त्वाचें विधान केलें आहे. "इस्लामच्या तत्त्वज्ञानापेक्षां त्याचा जो सामाजिक कार्यक्रम होता त्यामुळेंच हिंदुस्थानांत त्याचे पुष्कळ अनुयायी झाले आहेत." अर्थात् जनतेला तत्त्वज्ञान हें कळतच नाहीं. त्यांना असा कांहीं 'सामाजिक कार्यक्रम' लागतो कीं, त्यामुळें जीवनाचीं साधनें व भोंवतालची परिस्थिति सुधारली कीं पुरे!

**हिंदु तत्त्वज्ञानाची अगतिकता—**

दलितांचा पाठिंबा ज्या कार्यक्रमाला मिळतो त्या कार्यक्रमाच्या पाठीशीं आयुष्याचा प्रतिक्रियात्मक विचार करणारें तत्त्वज्ञान असणारच नाहीं. ज्या अर्थी हिंदी जनतेचा पाठिंबा इस्लामच्या सामाजिक कार्यक्रमाला मिळाला त्या अर्थी त्याच्या पाठीमागचें तत्त्वज्ञान हिंदु तत्त्वज्ञानापेक्षां चांगलें असलेंच पाहिजे. हिंदु तत्त्वज्ञान व त्या वेळची सामाजिक स्थिति इतकी गोंधळाची झाली होती कीं, त्यांतून बाहेर निघण्यास इस्लामनें मार्ग दाखवतांच जनता त्या वाटेनें गेली. वरील विधानानें हॅवेलनें हें म्हणणें मान्य केल्यासारखेंच आहे कीं, तेराव्या व चौदाव्या शतकांतही सामाजिक क्रांतीचें मुसलमानांचें कार्य संपलें नव्हतें. त्याच गुणामुळें त्याचीं बीजें हिंदुस्थानांत रुजलीं व त्यांस अनेक अनुयायी लाभले. हिंदी पुराणाभिमानाचे दृष्टीनें पाहतां मुसलमानी धर्म त्याच्या पडत्या काळांतही आध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक व सामाजिक प्रगतीचाच निदर्शक होता.

**हिंदुस्थानची राजकीय अधोगति—**

मानवी बुद्धीचें उदात्त फळ म्हणजेच हिंदु-युरोपीय संस्कृति आहे असें मानून त्यांची स्तुति करणाऱ्यांपैकीं हॅवेल हा एक होता. मुसलमानांच्याबद्दल त्याच्या मनांत अगदीं उलट भावना होत्या. हिंदंबद्दलचें त्याचें मत पूर्वग्रहदूषित होतें असें मानावयाचें कारण नाहीं. किंबहुना तो हिंदूंचाच पक्षपाती होता, मग त्याच्यासारख्या इतिहासकारासही अतिशय वाईट गोष्टी येथें दिसल्या तर मग तेथील परिस्थिति खरोखरीच किती वाईट असेल याची कल्पनाच करणें बरें ! तो लिहितो, " हिंदुस्थानांत इस्लामचें पाऊल पुढें पडलें याचें खरें कारण कोठें बाहेर शोधावयास नको. हर्षाचे मृत्यूनंतर आर्यावर्तांत राजकीय अधोगति झाली. त्यामुळेंच येथें इस्लाम धर्माची ध्वजा रोंवली गेली. महंमदाच्या सामाजिक कार्यक्रमामुळें प्रत्येकास समान

आध्यात्मिक स्थिति लाभली. इस्लाम धर्माला राजकीय व सामाजिक क्रियांचें एकीकरण करून थोडेंसें साम्राज्यसेवेचें कार्य निर्माण करतां आलें आहे. या जगांत राहून मनुष्यास पुरेसें सुख मिळेल असेच जीवनाचे नियम इस्लाम धर्मांत आहेत. बुद्ध तत्त्वज्ञान व ब्राह्म तत्त्वज्ञान यांचा झगडा होऊन हिंदुस्थानमध्यें राजकीय भेद झाला त्याच वेळीं इस्लाम धर्माच्या राजकीय सामर्थ्याचा कळस झाला होता.

"हर्षवर्धन राजा सातव्या शतकाच्या मध्यास निवर्तला. इस्लामचा विकास व हिंदी राजकीय अवनति हीं एकसमयावच्छेदेंच चालली होती. कोठल्याही मोठ्या राजाच्या मृत्यूनेंच कांहीं इतिहासांत घडामोडी होत नाहींत. अवनति किती तरी शतकें आधीं चालू असते. बुद्ध क्रांतीमुळें ती थोपवून धरली गेली होती. मात्र बुद्धक्रांति अयशस्वी झाल्यावर दुप्पट दौडीनें अधोगति होऊं लागली. अप्रबुद्ध संन्याशांच्या अधःपातानें हिंदु साम्राज्याच्या अधःपातास मदत झाली व त्यामुळेंच मुसलमानांचा विजय सुलभ झाला. मठांच्या अधःपातानें यूरोपांत तीच स्थिति झाली होती."

**मंदिरावरील श्रद्धा भंगली—**

महंमद गझनीच्या हल्ल्याबद्दल हॅवेलचें म्हणणें असें कीं, "त्याला मिळालेल्या अप्रतिहत विजयानें त्याचें वजन अतिशय वाढलें व सरहद्दीवरील असंस्कृत वर्गापैकीं ज्यांना युद्ध म्हणजेच धर्म वाटे असे अनेक लोक इस्लाम–धर्मानुयायी बनले. त्यांना रणांतील विजयानेंच स्फूर्ति मिळत असे. महंमदानें केलेल्या लुटीमुळें मंदिर दिव्य व अधृष्य आहे या श्रद्धेला जोराचा धक्का बसला. या मंदिरांत अनंत काळापासून हिंदी लोक आपले उपाहार आणीत असत; आणि म्हणून ज्या धार्मिक भावनेनें मंदिरांत पूजाअर्चा चाले त्या भावनेला व देवाच्या जागतेपणाबद्दल जी श्रद्धा असे त्या श्रद्धेला अत्यंत जोराचा धक्का बसला. अशा परिस्थितींत धार्मिक भावना व आध्यात्मिक अंतरावेग

यामुळें सत्वहीन देवांवरून अधिक प्रभावी देवांकडे त्यांची भक्ति वळली आणि या भक्तीचें फलही पण त्यांना मिळालें. ठाणेश्वर, मथुरा, सोमनाथ वगैरे ठिकाणच्या मंदिरांतून युगानुयुगें लक्षावधि हिंदु पूजा–उपासना–करीत असत. मंदिराच्या पुरोहितांनीं कल्पनेपेक्षां किती तरी विपुल संपत्ति सांठविली होती. परमेश्वर दीन पतितांचें संरक्षण करतो अशी श्रद्धा लोकांमध्यें निर्माण करून त्यांनीं ही जनतेपासून लूटच केली नव्हती का ? महंमदाच्या लुटीमुळें श्रद्धेचा हा दिव्य प्रासाद जणूं पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें एका क्षणांत कोसळून पडला. महंमदाचें सैन्य जवळ येतांच पुरोहितांनीं सांगितलें कीं, देवाच्या क्रोधांगारांत शत्रूची रक्षा होऊन जाईल. लोकांना चमत्कार घडेल असें वाटलें होतें. परंतु अरेरे ! कांहींच घडलें नाहीं. उलट शत्रूच्या देवानेंच चमत्कार घडविला. अर्थात् श्रद्धेची ज्योत महान् चमत्कारानें आकृष्ट केली. धर्मप्रामाण्याचे दृष्टीनें विचार करतां ज्यांनीं त्या वेळीं मुसलमानी धर्म स्वीकारला तेच खरे धार्मिक होते.

**सद्यःस्थितींत उपयुक्त अशी मीमांसा—**

विजयाची अंतर्बाह्य चिकित्सा करणें हें आजही अत्यंत फायद्याचें आहे. सनातनी हिंदूला पूर्वदुष्ट ग्रहामुळें कोठलाही मुसलमान अत्यंत हीन वाटतो, तो वाटणार नाहीं. पूर्वकल्पनांचा निरास होतांच हिंदूंना मुसलमानी विजयाच्या विधायक स्वरूपाचें महत्त्व तेव्हांच कळेल. जेत्यांबद्दल असणाऱ्या मत्सराचा जितांना त्याग करतां येईल. अशा तऱ्हेनें ऐतिहासिक ज्ञानानें दृष्टि निवळून मुसलमानांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण पूर्ण पालटल्याशिवाय हिंदुस्थानांतील जातीय तंट्याचा प्रश्न सुटणार नाहीं. जुन्या संस्कृतीच्या विनाशकाळीं गोंधळांतून बाहेर निघण्यास मुसलमानी धर्मानें केलेल्या मदतीचें महत्त्व ओळखल्याशिवाय हिंदूंना मुसलमान आपल्या राष्ट्राचे घटक आहेत ही दृष्टि पालटतां येणार नाहीं. शिवाय मुसलमानांच्या विजयाचें योग्य कारण

आकलन झालें तर सध्यांच्या दुर्भाग्याची मीमांसाही अधिक चांगली करतां येईल.

**मुसलमानांनाही अंजन––**

याच्या उलट आपल्या धर्माचें इतिहासांतील मोठें कार्य काय आहे हें फारच थोड्या मुसलमानांना माहीत आहे. कुराणाच्या शिकवणुकींत बुद्धिवाद वगैरे गोष्टी बसत नाहींत, तेव्हां त्या आपल्या नव्हेतच असें अनेक मुसलमान म्हणतील. मुसलमानी धर्माला जगाच्या इतिहासांत जें संस्मरणीय स्थान आहे, त्याचें कारण मुसलमानी धर्म मूळचा सनातनी नव्हता हेंच होय. तार्तरांच्या धर्मवेडामुळें किंवा पुरोहित वर्गाच्या प्रतिगामीपणामुळें कांहीं तें स्थान मिळालें नाहीं! वस्तुतः हिंदुस्थानांत येण्यापूर्वीच त्याचें ऐतिहासिक कार्य संपलें होतें. ऐहिक विलासानें अवनत झालेल्या इराण व मध्य आशियांतील रानटी अनुयायी–ज्यांनीं महंमदाचे संस्मरणीय आरबी साम्राज्याचा विनाश केला होता–त्यांनींच हिंदुस्थानच्या भूमीवर आपला ध्वज रोंविला होता; क्रांतिकारक अरबांनीं नव्हे. हिंदुस्थानमध्यें या वेळीं बुद्ध–क्रांति अयशस्वी होऊन ब्राह्मण प्रतिक्रांति यशस्वी झाली व तिच्या दडपणाखालीं असंख्य जनता चेपली गेली होती. म्हणूनच मुसलमानी संदेशाचें सर्व जनतेनें स्वागत केलें. इराणी किंवा मोंगल राजांचे ठायीं अरब वीरांची सहिष्णुता, उदात्तता व उदारता बिलकूल नव्हतीच असें नाहीं, परप्रांतांतून आलेल्या लहान लहान टोळयांनीं एवढें मोठें साम्राज्य हस्तगत करून घेतलें ही एकच गोष्ट त्यांनीं हिंदी समाजाची अगदीं मोठी भूक भागविली हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. मूळ क्रांतीची ज्योत मंद होऊन प्रतिक्रांतीची काजळी धरूं लागली असतांही थोडासा क्रांतिप्रकाश हिंदु समाजास मुसलमान धर्मानें दाखविलाच कीं, नाहीं? मुसलमानी सत्ता हिंदुस्थानांत दृढमूल झाली याला कारण त्यांचा पराक्रम नसून इस्लाम धर्म व त्याचे प्रगतिकारक कायदे यांचा प्रसार हेंच होय.

**सामाजिक परिवर्तन—**

मुसलमानांचा कट्टर दुष्मन हॅवेल यानेंही हें मान्य केलें आहे कीं, " मुसलमानांच्या राजकीय धोरणाचा परिणाम हिंदुस्थानावर दुहेरी झाला. जातिपद्धति अधिक कडक झाली व तिच्या विरुद्ध असंतोषही तीव्र माजला. शिवाय हिंदु समाजांतील कनिष्ठ वर्गास उत्कर्षाची मोहक आशा त्यानें निर्माण केली, यांत शंका नाहीं. शूद्र वर्गाच्या शृंखला तोडून त्याला ब्राह्मणाच्या बरोबरीचें स्थान मिळण्याची संधि निर्माण करून दिली. यूरोपांतील पुनरुज्जीवनाप्रमाणें येथेंही बौद्धिक जीवन खळबळून टाकलें. कांहीं सामर्थ्यसंपन्न व स्वतंत्रप्रज्ञ लोक निर्माण केले. येथेंही तेथीलप्रमाणेंच शहरी संस्कृतीचा विकास झाला. तेथें फिरत्या टोळीवानास तंबू सोडावा लागला; येथें शूद्रांना खेडीं सोडावीं लागलीं. आनंदमय जीविताचा प्रारंभ या युगांतच झाला. "

वरील विधानांत एवढी भर घातली कीं पुरे : कबीर, नानक, तुकाराम, चैतन्य, वगैरे संतांनीं ब्राह्मणाच्या वर्चस्वाविरुद्ध केलेल्या प्रतिकाराचें मूळ बीज महंमदाच्या विजयानें केलेल्या सामाजिक परिवर्तनांतच आहे.

**नवयुगाचा संभवकाल—**

इतिहासाच्या सत्यदर्शनानें मुसलमानांच्या विरुद्ध असलेलें हिंदूंचें मत्सरी मत चुकीचें आहे हें तेव्हांच ध्यानांत येणार आहे. अशा गैरमतानें इतिहासाचा—सत्याचा अवमान होत असतो. आणि देशाच्या राजकीय भवितव्यासही त्यानें बाध येतो. मुसलमानांपासून शहाणपण शिकून यूरोपनें अभिनव संस्कृतीचें नेतृत्व मिळविलें आणि या पूर्वीच्या ऋणाबद्दल कोणास वाईटही वाटत नाहीं. दुर्दैवानें इस्लाम संस्कृतीच्या वारसाचा लाभ हिंदुस्थानला फारसा झाला नाहीं. पुनरुज्जीवनाच्या वेदना पुनः सुरू झाल्या आहेत. अशा वेळीं मानवी इतिहासांतील हें उत्कृष्ट प्रकरण स्फूर्तिप्रद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

इस्लामनें मानवी संस्कृतींत घातलेली भर काय आहे याचें योग्य ज्ञान झालें तर हिंदूंना असलेला दुरभिमान गळून जाईल, मुसल-मानांची संकुचित मनोवृत्तिही दूर होईल व आपापल्या धर्माचें उज्ज्वल स्वरूप त्यांना चांगलें कळूं लागेल.

# सदर ग्रंथांत आलेल्या कांहीं व्यक्तींची व स्थळांची माहिती

**अबूबकर**—इ. स. ५७३ ते ६३४. कोरेश टोळीपैंकीं एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरीं जन्म. पहिला मुसलमान खलिफा. महंमदाचा परम मित्र. यानें अरेबिया व त्याच्या शेजारच्या प्रदेशांत इस्लामचा प्रचार पुष्कळच केला. याच्या इतर गुणांचें वर्णन पुस्तकांत आलें आहेच.

**अथेनेसियस्**—इ. स. २९७ ते ३७३. ख्रिश्चन धर्मसुधारक. अलेक्झँड्रिया येथें जन्म. 'तो एकटा एका बाजूस व बाकीचें जग त्याच्या उलट' अशी स्थिति बऱ्याच वेळां त्याच्या आयुष्यांत होती. तो दोन तीन वेळां राजाच्या गैरमर्जीमुळें हद्दपार झाला होता.

**अलेक्झँड्रिया**—इजिप्तमधील सुप्रसिद्ध बंदर.

**असीरिया**—पश्चिम आशियांतील प्राचीन साम्राज्य.

**अविसेना**—इ. स. ९८०–१०३७. याची माहिती पुस्तकांत भरपूर आलेली आहे.

**अवेंपेस**—मृत्यु इ. स. ११३८ मध्यें. याचीही भरपूर माहिती पुस्तकांत आहे.

**ॲरिस्टॉटल्**—ख्रि. पू. ३८४. ग्रीक तत्त्ववेत्ता व शास्त्रज्ञ. तो जिवंत **ज्ञानकोश** म्हणून प्रसिद्ध होता.

**अंदालुशिया**—दक्षिण स्पेनचा भाग.

**आगस्टस**—हा रोमन साम्राज्याचा पहिला बादशहा. ख्रिस्तपूर्व ६३ व्या वर्षी याचा जन्म झाला. सुप्रसिद्ध ज्युलिअस सीझरचा हा नातू. यानें राज्यास सुरुवात केली त्या वेळीं रोम दगडाविटांचें होतें आणि शेवटीं तें त्यानें रत्नमाणकांचें केलें असें म्हणतात.

**ऑक्सस अगर अमूदर्या**—मध्य आशियांतील अरल समुद्रास मिळणारी मोठी नदी.

**ऑगस्टिन**—सुमारें ३५४ मध्यें. 'कन्फेशन्स' व 'देवाचें नगर' या पुस्तकांचा कर्ता. तत्त्वज्ञानी म्हणून ख्याति.

**एरियन**—एरियन या तत्त्वज्ञान्याचे अनुयायी.

**ओमार**—मृत्यु सन ६४४ मध्यें. दुसरा खलिफा. अबूबकरनंतर तो खलिफाच्या गादीवर आला. यानें पॅलेस्टाईन, सीरिया व इजिप्त आपल्या वर्चस्वाखालीं आणिले. जेरुसलेम येथील ओमारची मशीद यानेंच बांधली. याचेंही वर्णन मूळ पुस्तकांत बरेंच आलें आहे.

**काबा**—मुसलमानांना पवित्र वाटणारें मक्का येथील मंदिर. त्यांतील 'काळा दगड' प्रसिद्ध आहे.

**कोपर्निकस्**—इ. स. १४७३–५२. पोलंडमधील प्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ. ग्रहांच्या स्थिति-गतीसंबंधीं संशोधन केलें.

**गिबन**—१७३७ ते १७९४. महान् इंग्लिश इतिहासकार. Rise and Fall of Roman Empire या प्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता. नष्ट साम्राज्याचीं चटकदार वर्णनें करून त्यानें आपलें लेखन आदर्श करून ठेविलें आहे.

**गॅलिलीओ**—१५६४ मध्यें जन्म. विज्ञान व खगोलशास्त्राचा पाया यानें घातला.

**चासरोज**—इराणांतील दोन सुप्रसिद्ध शूर राजांचें नांव. पहिला सुमारें इ. स. ५३१ व दुसरा ५९१ मध्यें होऊन गेला.

**जॅकोबाईट**—इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स याचे अनुयायी.

**ज्युलिअस सीझर**—ख्रि. पू. १०२. इतिहासांतील अत्यंत प्रभावी व्यक्ति. रोमन साम्राज्यांतील सर्वाधिकारी. सेनापति म्हणून त्याची योग्यता नेपोलियनच्या बरोबरीची आहे. Greatest of Dictators असें याचें वर्णन करतात. कर्मयोग्याची बुद्धि, कलावंताची भावना व विधायक द्रष्ट्याचा कल्पनाविलास या त्रिगुणांचा सुंदर मिलाफ त्याचे ठिकाणीं झाला होता. त्याचाच मित्र ब्रूटस् यानें त्याचा वध केला.

**झोरो आस्टर अगर जरदुष्ट्र**—पारशी धर्माचा संस्थापक.

**ट्र्ज्यन**—रोमचा बादशाहा. इ. स. ५३ ते ११७. रोमच्या साम्राज्याची व्यवस्था त्याच्या वेळीं अत्यंत चांगली होती असें म्हणतात.

**टॉलमीज**—इजिप्तमधील अनेक राजांचीं नांवें. १४ राजे या नांवाचे होते. एक राजा भूगोलवेत्ता होता.

**ड्रेपर**—इ. स. १८११–८२. अमेरिकन शास्त्रज्ञ. इंग्लंडमधून अमेरिकेंत गेला.

**डॉनॅटिस्ट**—कार्थेजच्या विशपचे अनुयायी. स्वतःच्या पंथापासून फुटून वेगळे झालेले लोक.

**दमास्कस**—सीरियांतील एक सुप्रसिद्ध शहर.

**नेस्टरियन**— फरान्सच्या पश्चिमेकडील साम्राज्यांतील लोक.

**प्लेटो**—प्राचीन तत्त्वज्ञानी व लेखक. त्याचें Republic नांवाचें पुस्तक प्रसिद्ध आहे. ख्रि. पूर्वी ३४७ मध्यें मृत्यु.

**फॅरोआज**—द्वीपकल्प. पूर्वी अलेक्झँड्रिया या बेटाच्या ठिकाणीं होतें.

**बर्बर**—सोमाली लँडमधील लोकांस हें नांव होतें.

**बायझंटाईन**—सध्यां कॉन्स्टँटिनोपल आहे त्याच्या आसपासच्या प्रदेशास बायझंटाईन असें नांव होतें. तेथील लोकांचें जें साम्राज्य त्यास बायझंटाइनचें साम्राज्य असें म्हणत असत.

**बुखारा**—मध्य आशियांतील राष्ट्रांचें मुख्य शहर. सध्यां तेथें सोव्हिएट सरकार आहे.

**महंमद**—मानवी इतिहासांत क्रांति घडवून आणणाऱ्या महान् धर्माचा संस्थापक. इ. स. ५७० मध्यें कोरेश टोळींतील मध्यम स्थितीच्या कुटुंबांत त्याचा जन्म झाला. खदिज्या या श्रीमंत–वयानें त्याच्यापेक्षां १५ वर्षें मोठी–अशा एका व्यापारी स्त्रीबरोबर त्यानें विवाह केला. इ. सन ६१६ मध्यें धर्मोपदेशक म्हणून प्रथम प्रकट होतांच लोकांत खळबळ उडाली. त्याला साक्षात्कार झाल्याचें व नवीन धर्मसंस्थापनेचें कार्य आपणावर आलें आहे असें तो सांगत असे. आरंभीं मक्केमध्यें त्याला यश कमी मिळालें. परंतु मदिनेच्या लोकांनीं आपणा-

मध्यें असलेल्या भांडणाचा शेवट करण्यासाठीं त्यास बोलाविलें. मक्केहून तो १६ जून ६२२ या दिवशीं पळून गेला. याच दिवसापासून महंमदाच्या संवत्सराच्या गणनेस प्रारंभ होतो. त्याच्या तत्त्वज्ञानाची भरपूर माहिती देणारें एक प्रकरण पुस्तकांत आहेच.

**मॅसिडोनिया**—ग्रीसच्या उत्तरेच्या प्रदेशाचें प्राचीन नांव.

**मॅजी**—इराणांतील पुरोहित वर्गापैकीं एका ज़ातीचें नांव. शहाणे लोक अशा अर्थीं हा शब्द रूढ आहे.

**मोझेस**—बायबलांतील एक व्यक्ति. त्याचा उल्लेख कुराणांतही आढळतो.

**युक्लिड**—ख्रि. पू. ३००. सुप्रसिद्ध ग्रीक गणिती.

**रेनॉन**—फ्रेंच इतिहासकार व तत्त्वज्ञानी.

**रेनोडॉट**—इ. स. १५८६–१६५३. फ्रेंच इतिहासकार.

**विसिगॉथ**—पश्चिम भागाच्या गॉथ लोकांना हें नामाभिधान आहे.

**हेजिरा**—महंमद संवत्सराचें नांव. सुरुवात १६ जून ६२२ पासून.

**व्होल्टेअर**—१६९४–१७०८. फ्रेंच तत्त्वज्ञ. सुप्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांतीला ज्या अनेकांच्या लिखाणानें चेतना मिळाली त्यांपैकीं प्रमुख. बुद्धिवादाचा पुरस्कर्ता. ५२ लहानमोठीं पुस्तकें लिहिलीं. ' तो राजांचा उपहासही करी व त्यांची खुशामतही करी, ही त्याची मनोवृत्ति या त्याच्या वर्णनांत चांगलीच प्रतिबिंबित होते.

**ह्युमबोल्ट**—इ. स. १७६९–१८५९. जर्मन शास्त्रज्ञ.

# अर्धचंद्रावरील

# कांहीं निवडक अभिप्राय

एकंदरींत श्री. सप्रे यांची कविता ' एक्स्ट्रा स्ट्रांग ' पेपर-मिंटासारखी गोड, तिखट व गुणकारी आहे. —**केसरी**

छोटया पण अतिशय मार्मिक कल्पना थोडक्यांत काव्यमय स्वरूपांत व्यक्त करणें हें त्यांचें वैशिष्य आहे. यशस्वी विडंबन हा त्यांच्या प्रतिभेचा आणखी एक पैलू आहे. —**प्रकाश-मुंबई**

यांची जगाकडे पाहण्याची दृष्टि चिकित्साखोर असल्या-मुळें त्यांचें निरीक्षण मार्मिक व अभिप्राय बोंचक असतात.

—**ज्ञानप्रकाश**

विचारगर्भ, मार्मिक, विनोदप्रचुर, उपरोधपूर्ण असा हा काव्य संग्रह मराठी काव्यवाङमयांत आपलें स्वतंत्र वैशिष्टय प्रगट करणारा आहे. —**चित्रमयजगत्**

विनोद, व्यंगार्थ व विविधता यांनीं पूर्ण असून तरुण मनाचा सहज अवखळपणा यांत आहे. तसाच गंभीर आणि खोल विचाराचा संथपणाही आहे. —**तरुण भारत**

मोजक्या शब्दांत कल्पनेचा विलास दाखविण्याची त्यांची हातोटी अपूर्व अशीच आहे. —**त्रिकाळ**

सूक्ष्म अवलोकन, मार्मिक किंवा क्वचित् मर्मभेदी उप-रोध व विनोद हें त्यांचें वैशिष्टय आहे. —**सकाळ**

यांच्या **विनोदी** व **विडंबनात्मक** कवितांना **कल्पनेची** जोड मिळाल्यानें यांतील चुटके खुमासदार झाले आहेत. पण ज्या ठिकाणीं विडंबनापेक्षां उपरोध प्रखर होतो अशीं अनेक स्थळें या संग्रहांत आहेत. —**वि. स. खांडेकर, ज्योत्स्ना**

महाराष्ट्राचे आवडते लेखक

## दे. भ. साने गुरुजी, एम्.ए. यांचे

# प्रकाशित ग्रंथ

| | रु. आ. |
|---|---|
| १ श्यामची आई | १—० |
| २ श्याम खंड १ ला | १—० |
| ३ धडपडणारीं मुलें | १—० |
| ४ जीवनकलह (श्याम खंड २) | १—० |
| ५ भारतीय संस्कृति | १—८ |
| ६ सोन्या मारुति ? | ०—१२ |
| ७ विश्राम | ०—१२ |
| ८ ना. गोखले चरित्र | २—० |

| | |
|---|---|
| १ अर्धचंद्र : कवि पंडित सप्रे, बी.ए. | ०—१२ |
| २ इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य : ले.—कॉ. रॉय | ०—१२ |
| ३ जीवनाचा पाया : ले.—बा. कृ. गळगली | |

( ऑगस्टमध्यें प्रसिद्ध होईल. )

दर्यार्णव कोपर्डेकर, 'प्रकाश मंडळ'

५२९ सदाशिव पेठ, पुणें २.

अर्थ हा जीवनाचा पाया आहे काय ?

या प्रश्नाची

मार्मिक चर्चा करणारी, सामाजिक व राजकीय घटनांचा
मानसशास्त्रदृष्टया उलगडा करून दाखविणारी,

आणि

वाचकांचें हृदय हालवून सोडणारी,

नितांतरमणीय कादंबरी

# जीवनाचा पाया

लौकरच प्रसिद्ध होईल.

लेखक
बा. कृ. गलगली

प्रस्तावना
वि. स. खांडेकर

प्रकाश मंडळ
५२९ सदाशिव, पुणें २.